म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
दा. क्र. ५४७९



# जवाहरलाल नेहरू

IRBK-0105475

केशव भिकाजी ढवळे

लेखक – आपटे गुरुजी

मूल्य सव्वा रुपया

4805

# पंडित जवाहरलाल नेहरू

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. ५८४२५ नों. दि. ..........
वि. चा. ची. ...लेखक... ..........

आपटेगुरुजी, येवलें

अच्युतराव पटवर्धनांच्या प्रस्तावनेसह

[ दुसरी आवृत्ति ]

ठाणे ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम २८८९६
विभाग का. वा.
क्रमांक १०९८
नों. दि. ३१/३/६९
वाचनालय शाखा

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

मूल्य सव्वा रुपया

IRBK-0105475
IRBK-0105475

सर्वाधिकार प्रकाशकाधीन

पहिली आवृत्ति : १९३९
दुसरी आवृत्ति : १९५६

मुद्रक : बा. ग. ढवळे, कर्नाटक मुद्रणालय, चिराबाजार, मुंबई २
प्रकाशक : केशव भिकाजी ढवळे, कर्नाटक हाउस, चिराबाजार, मुंबई २

# प्रस्तावना

******************************

माझे मित्र श्री. आपटे गुरुजी ह्यांनीं लिहिलेल्या पंडित जवाहरलाल नेहरूंच्या ह्या अल्प चरित्रास प्रस्तावना लिहिण्याचें काम माझ्याकडे आलें आहे. खरोखरी पंडितजींच्या चरित्रास कोणत्याही प्रस्तावनेची आवश्यकता नाहीं व चरित्रनायकाप्रमाणें चरित्र-लेखकही महाराष्ट्राच्या सुपरिचयाचे आहेत. १९२० च्या असहकारितेच्या राष्ट्रीय आंदोलनांत राष्ट्रीय शिक्षणाच्या पवित्र कार्यास वाहून घेऊन आज जवळ जवळ वीस वर्षें ज्यांनीं आपलें शक्तिसर्वस्व राष्ट्रसेवेला वाहिलेलें आहे अशा थोर कार्यकर्त्यांपैकीं येवलें येथील श्री. आपटे गुरुजी हे एक आहेत. त्यांची भाषाशैली व निरूपण सुबोध व रसाळ आहे. लहान मुलांच्या संस्कारक्षम मनाला लहान लहान गोष्टी सांगून कसें जागें करावें व त्यांच्या आकांक्षा उद्दीपित करून देशसेवेचें ध्येय त्यांच्यापुढें कसें निर्माण करावें ही गोष्ट राष्ट्रीय शाळेंतील आमच्या आचार्यवर्गाला फारच उत्तम साधली होती. विभूतिपूजनाच्या तारुण्यसुलभ वृत्तीचा ओघ आपल्या देशांतील राष्ट्रीय सभेच्या नेत्यांच्या कार्याबद्दल खरी आस्था व जिव्हाळा निर्माण करण्याकडे लावण्याचा राष्ट्रीय शाळेंतील आचार्यांनीं यशस्वी प्रयत्न केला आहे.

पंडितजींचें विभूतिमत्व स्वयंसिद्ध आहे. थोर विभूतींचीं अल्प चरित्रें लिहिणें फार कठीण असतें. त्यांच्या कार्याचा व विचारांचा विस्तार इतका प्रचंड असतो कीं तो संक्षेपानें निरूपण करणें अत्यंत बिकट असतें. परंतु श्री. आपटे गुरुजी ह्यांनीं ह्या ग्रंथामध्यें पंडितजींच्या चारित्र्याचें चटकदार व संक्षिप्त वर्णन मोठ्या कौशल्यानें केलें आहे. कांहीं प्रसंगीं संवादरूपाचा उपयोग केल्यामुळें निरूपण हृदयंगम झालें आहे. पंडितजींचें आत्मचरित्र अंतर्मुख दृष्टीनें लिहिलें गेलें असल्यामुळें त्यांचे गुणविशेष व्हावे तसे प्रकर्षानें त्या आत्मचरित्रांत व्यक्त झालेले नाहींत. ह्या अल्प चरित्रामध्यें ही जाणीव लेखकानें भरून काढली आहे.

हिंदी राजकारणाच्या विचारापासून शालेय शिक्षणक्रम सर्वस्वीं अलिप्त ठेवण्याचें धोरण कॉंग्रेसच्या कारभारांत आतां सोडून देण्यांत येऊं लागलें आहे. ह्या अनुकूल परिस्थितीचा फायदा घेऊन शिक्षण संस्था हें पुस्तक तरुण विद्यार्थीवर्गास पोहोंचविण्याच्या कामीं अवश्य सहकार्य करतील अशी मला आशा आहे.

**********************************************

पंडित जवाहरलालजींचा बराच निकट परिचय होण्याचें भाग्य मला लाभलें आहे व त्यामुळें मींच ह्या पुस्तकाला चार प्रस्ताविक शब्द लिहावे अशी गुरुजींची इच्छा मींही आनंदानें मान्य केली. जवाहरलालजींच्या सहज शब्दांत व कृतींत आत्मविश्वासाची जी चमक असते, त्यामुळें ते प्रकृतीनें एकतंत्री हुकुमशाह असावेत असा सकृत्दर्शनीं समज होतो. परंतु वस्तुस्थिति त्याच्या अगदीं उलट आहे. बहुमत आपल्या विरुद्ध आहे व आपलें मत तर ठामपणें बहुमताशीं जुळत नाहीं अशी जाणीव असतांनाही समाजप्रगतीचा शाश्वत मार्ग लोकशाहीचा आहे असा पूर्ण भरंवसा असल्यामुळें बहुमताला आदरपूर्वक मान वांकवून, आपणाला अमान्य वाटणारा बहुमताचा निर्णय अत्यंत: धडाडीनें व परिश्रमपूर्वक पार पाडण्याचें दिव्य त्यांनीं वेळोवेळीं केलेलें मीं पाहिलें आहे. त्यांची बरोबरी करणारी दुसरी एकही व्यक्ति मला अजून आढळलेली नाहीं असें मी नम्रपणें सांगूं इच्छितों. ह्या त्यांच्या विशिष्ट धोरणाचें मर्म न समजणारे लोक 'जवाहरलाल कितीही जहाल असले तरी गांधीजींच्या पुढें त्यांचें चालत नाहीं' असा निकाल देऊन मोकळे होतात. परंतु लोकशाहीच्या कार्यपद्धतीबद्दल आदरभाव ठेवून व आपल्या मतभेदाची प्रामाणिक जाणीव देत राहून बहुमताचे निर्णय मान्य करण्याचा अलौकिक गुण हाच आज सर्वत्र गाजत असलेल्या साम्राज्यविरोधी एकजुटीचा आत्मा आहे हें सत्य फारच थोड्या लोकांना समजलें आहे.

पं. नेहरू वीर पुरुष आहेत. उच्च शिक्षणसंस्कृतीचें तेज त्यांच्या आचारविचारांवर नेहमीं तळपत असतें. परंतु हे सर्व गुण केवळ वडिलार्जित परिस्थितीनें आले आहेत असें मानणें चुकीचें होईल. नेपोलियनची एक अशी उक्ति आहे कीं, "योग्य संधि मिळणें हें जरी लढाईच्या अर्ध्या यशाइतकें महत्त्वाचें असलें, तरी त्या संधीचा वेळेवर उपयोग करून घेण्यांतच विजयश्रीचें मर्म आहे." जवाहरलालजींच्या असाधारण कर्तबगारीमध्यें नैसर्गिक गुणाइतकाच परिश्रमाचाही भाग आहे हें विसरतां कामा नये.

"आपल्याला पटेल त्या कार्याला आपली असेल नसेल ती सर्व शक्ति वाहाणें, व समाजप्रगतीच्या विश्वरूप साक्षात्कारांत आपला मीपणा विसरणें ह्यांत जीवनाचा उच्चतम आनंद आहे," ह्या बर्नार्ड शॉच्या विचाराची चालती बोलती मूर्ति म्हणजे जवाहरलालजींचें धीरोदात्त चरित्र आहे असें मला वाटतें. त्यांच्या अपूर्व व्यक्तिमत्वाची जाणीव उत्साही व आशावादी युवकवर्गाला करून देण्याचा श्री. आपटे गुरुजींचा उद्देश उत्तम प्रकारें यशस्वी होवो अशी मी आशा करतों.

अहमदनगर, १ जानेवारी १९३९ —अच्युत पटवर्धन

# लेखकाचे चार शब्द

**********************************

कांहीं महिन्यांपूर्वी श्री. रामभाऊ भोगे मनमाड स्टेशनवर भेटले असतां म्हणाले, "विद्यार्थ्यांकरितां पं. जवाहरलालजींचें चरित्र लिहून देतां का ?" "देतों," असें मी उत्तर देऊन गेलों खरा, पण घरीं आल्यावर हिंदी राजकारणाच्या गुंतागुंतीनें भरलेलें असें पंडितजींचें चरित्र विद्यार्थ्यांना सहज समजेल असें कसें लिहायचें असा प्रश्न पडला. शेवटीं प्रयत्न करून पाहाण्याकरितां पंडितजींच्या सुप्रसिद्ध **आत्मचरित्राला** वाट पुसत लेखणी हातीं घेतली व हें चरित्र लिहून काढलें. तरी पण **आत्मचरित्राची** ही संक्षिप्त आवृत्ति नव्हे. कारण पंडितजींचें आत्मचरित्र हें पुष्कळसें "आत्मसंशोधन" आहे व तो विषय यथार्थपणें आकलन होण्याला बुद्धि बरीच परिपक्व व्हावी लागते. ह्या चरित्रांत पंडितजींच्या देशभक्तीचा ठसा विद्यार्थ्यांच्या मनावर उठविण्याचा प्रयत्न केला आहे.

हें चरित्र लिहून झाल्यावर त्याची सुवाच्य प्रत करण्याच्या कामीं सार्वजनिक कार्यांतले माझे सहकारी श्री. ल. ब. कुलकर्णी ह्यांनीं हार्दिक साह्य दिलें. अगदीं लहान वयांत पोक्त मंडळीबरोबर वर्किंग कमिटींत बसण्याचा ज्यांना मान मिळाला होता, त्या श्री. अच्युतराव पटवर्धनांनीं, मीं इच्छा प्रदर्शित करतांच, प्रस्तावना लिहून देण्याचें मान्य केलें व वर सांगितल्याप्रमाणें ह्या पुस्तकाचे प्रकाशक श्री. रामभाऊ भोगे ह्यांनीं पंडितजींच्या थोर जीवनाशीं कांहीं काळ एकरूप होण्याची मला संधि दिली ह्याबद्दल मी वरील तिघा सुहृदांचा आभारी आहें.

सरतेशेवटीं ज्यांच्याकरितां हें पुस्तक लिहिलें त्या भावी पिढीच्या हातून **पूर्ण स्वराज्याचे** आजच्या पिढीचे संकल्प अंगप्रत्यंगांनीं पूर्ण होवोत अशी इच्छा प्रदर्शित करून हें अल्प निवेदन पुरें करतों.

विनय–मंदिर, येवलें
स्वातंत्र्यदिन, १९३९

**—पां. श्री. आपटे**

# अनुक्रमणिका


१. उपोद्घात ... ... ७
२. कुलवृत्तान्त ... .... ९
३. बालपण व विद्याभ्यास ... ... १२
४. इंग्लंडची यात्रा व विद्याभ्यास ... १७
५. तगमग ... ... २१
६. राजकारणांत प्रवेश ... ... २७
७. किसानांमध्यें परिभ्रमण ... ... ३१
८. असहकारिता ... ... ३५
९. नगरपालिकेचे अध्यक्ष ... ... ४६
१०. आमिष ... ... ४९
११. थोरांचीं दुःखें .... ... ५१
१२. युरोपची यात्रा .... .... ५६
१३. पुनरागमन व राष्ट्राचें पुनरुत्थान ... ६०
१४. सायमन कमिशन — सर्वपक्षीय परिषद ६३
१५. आवडतें काम ... .... ७१
१६. भारतीयुद्धाचें उद्योगपर्व ... ... ७३
१७. स्वतंत्र्ययज्ञाचें होमकुंड : १ ... ... ७९
१८. स्वातंत्र्ययज्ञाचें होमकुंड : २ ... ... ८५
१९. लंकेची सफर ... ... ८९
२०. पुनश्च हरिः ॐ ... .... ९२
२१. स्वातंत्र्ययज्ञ — सत्र दुसरें — पूर्णाहुति ... ९६
२२ व्यक्ति ... ... १००
२३. ग्रंथरचना ... ... १०५
२४. स्फुट विचार ... ... १०९
२५. उपसंहार ... ... ११५

## प्रकरण पहिलें

# उपोद्घात

अनुक्रम 2-8-१९६९ विभाग वाचा: क्रमांक 9068 नों. दि. 3/9/3/69

******************************

पंडित जवाहरलाल नेहरू ह्यांचें नांव हिंदुस्थानांत आज सर्वतोमुखीं झालेलें आहे. हिंदुस्थानाबाहेरही ते हिंदी स्वातंत्र्ययुद्धांतील आघाडीचे वीर म्हणून गणले जातात. हिंदुस्थानला द्यावयाच्या स्वराज्याच्या हप्त्यासंबंधीं वाटाघाट अगर बोलणेंचालणें करायचें झालें तर पंडिजींचा विचार घेतल्याशिवाय भागावयाचें नाहीं असें ब्रिटिश मुत्सद्द्यांनाही वाटत असतें. हिंदी राष्ट्राचे एकमेव पुढारी जे महात्मा गांधी, ते जवाहरलाल ह्यांना आपले मानसपुत्र समजतात व आपलें राजकीय धोरण आंखतांना पुष्कळदा त्यांचा सल्ला घेतात. हिंदी तरुणांच्या आकांक्षा आज जवाहरलालच्या मुखांतून नेहमीं बाहेर पडत असल्यामुळें, पन्नाशीच्या घरांत ते आले असूनही पंडितजींची गणना, नवजवानांत अजूनही होते. हिंदी राष्ट्राचा इतिहास घडविणारी लोकोत्तर व्यक्ति म्हणून भावी इतिहासकार जवाहरलाल ह्यांचा निर्देश हिंदी राष्ट्राच्या इतिहासांत केल्याशिवाय राहाणार नाहींत.

थोरांचीं चरित्रें तरुण पिढीला मार्गदर्शक होऊन त्यांना त्यापासून कार्यस्फूर्ति मिळत असते. भावी पिढीच्या आयुष्याला इष्ट वळण लागावें म्हणून आपल्या राष्ट्रांतील थोर लोकांचीं पुण्यपावन चरित्रें लिहून तीं भावी पिढीच्या हातीं देणें हें राष्ट्राच्या शिक्षणाची काळजी वाहाणारांचें आद्य कर्तव्य आहे.

थोरपण हें केवळ बाहुबलांत नाहीं, तें बुद्धिमंताच्या नानाविध पैलूंत नाहीं, तें शूराच्या नुसत्या छातींत नाहीं किंवा धनवंताच्या केवळ धनसंचयांत नाहीं. केवळ वरील विविध गुणांची जोड करून थोरपण अंगीं येतें, तर अकबराऐवजीं अवरंगजेबाचीच इतिहासांत थोर म्हणून कीर्ति गाजली असती, शिवाजी महाराजांऐवजीं हैदरखानाचाच उत्सव आज सर्वत्र सुरू झाला असता, बुद्धिमान् टिळकांच्याऐवजीं हायकोर्ट जजांचीं आसनें ज्यांनीं विराजमान केलीं त्यांच्याच पुण्यतिथी हिंदुस्थानांत साजऱ्या झालेल्या आपणांला दिसल्या असत्या. मनुष्य

आपल्या गुणांचा उपयोग कसा करतो ह्यावर त्याची थोरवी अवलंबून असते. लो. टिळकांनीं केसरीमध्यें अनेक पुरुषांचे मृत्युलेख लिहिले, त्या लेखांत त्या पुरुषांच्या विविध गुणांच्या स्तुतीवर भर न देतां त्या पुरुषांनीं **आपल्या गुणांचा उपयोग राष्ट्राकरितां कसा केला** ह्यावरच कटाक्ष ठेवून भावी पिढीला मार्ग दाखविला आहे.

जगतांत आपणाला जे थोर पुरुष आढळतात ते एकदम थोर होऊन जन्माला येत नाहींत. वटवृक्षाचें बीज किती लहान असतें बरें! त्या लहान बीजांतून प्रथम जोरदार अंकुर बाहेर पडतो. नंतर ऊन, हवा, पाऊस खाऊन अनेक झंजावातांशीं टक्कर देऊन तो मोठा होत जातो, व शेवटीं प्रचंड शाखापल्लवांनीं विभूषित होऊन पक्षी, पशु व मानव ह्या सर्वांचें आश्रयस्थान होतो. थोर पुरुषांत वटवृक्षासारखें मोठेपणाचें लहानसें बीज असतें. त्या बीजाची वाढ ते लोक अनेक वर्षें कष्ट सोसून जेव्हां करतात तेव्हांच गुणश्री त्यांना माळ घालते. बुद्धीचे गुण मिळवीत असतांना साहस व धैर्य ह्या गुणांची जर जोपासना झाली नाहीं तर कोणताही मतिमान पुरुष आदराला पात्र होत नाहीं. धैर्यादि गुणांना त्यागवृत्तीची जोड मिळाली कीं मनुष्याची जिकडे तिकडे " भलारे भला " म्हणून वाहवा होते.

पूर्ण स्वातंत्र्य आमच्यापासून दिल्लीप्रमाणें थोडें बहुत दूर असेल, इतर देशांत वैभवाचा सूर्य उगवला आहे, तर आमची अजून त्या दिशेनें पहांटही झालेली नाहीं, इतर राष्ट्रांच्याप्रमाणें आमचा बहुजनसमाज सुसंघटित व अन्यायप्रतिकार-क्षम बनलेला नसेल, पण एक गोष्ट निश्चित आहे ती ही कीं हिंदवी राष्ट्राला आज पहिल्या प्रतीचे बुद्धिमान, कार्यकुशल, धैर्यशील व त्यागी नेते लाभले आहेत. आमच्या प्रगतीच्या आगगाडीचे डबे पाहिजे तसे अजून सिद्ध झाले नसले, तरी त्यांचीं एंजिनें मात्र उत्तमांतील उत्तम, गतिमान असून, अनेक संयमांच्या ब्रेकांनीं तीं सुसज्ज अशीं आहेत. स्वातंत्र्याच्या पार्श्वभूमीमुळें येणारा उठाव आमच्या पुढाऱ्यांच्या पाठीमागें नसल्यामुळें कांहींच्या डोळ्यांत त्यांची थोरवी पूर्णपणें आज भरत नसेल, पण इतिहास पुढें अशी साक्ष देईल कीं विसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत इतर देशांपेक्षां सर्वश्रेष्ठ पुरुष हिंदी राष्ट्रांतच उत्पन्न झाले होते.

अशा थोर पुरुषांच्या श्रेणींत ज्यांचा फार मोठा दर्जा गणला जातो त्या पंडितजींच्या पुण्यपावन चरित्राच्या गंगौघांत आपणाला आतां प्रवेश करावयाचा

*****************************************************

आहे. ह्या प्रकरणांत मनुष्याच्या थोरपणाची जी मीमांसा केलेली आहे व कसोटी सांगितली आहे, त्या कसोटीला उतरणारें पंडितजींचें जीवन कसें आहे, हें आपणाला एक एक प्रकरण वाचतां वाचतां कळून येईल. ह्या चरित्रसरोवरांत प्रवेश करावा अशी विनंती करतों.

## प्रकरण दुसरें

# कुलवृत्तान्त

******************************

पुष्कळ वाचकांस वाचून आश्चर्य वाटेल कीं, पंडित जवाहरलालजींचें मूळ आडनांव **नेहरू** नसून **कौल** असें आहे. दिल्लीचा बादशहा फरुखसियर ह्यानें सन १७१६ च्या सुमारास काश्मिरास भेट दिली. त्या वेळीं बादशहाची मर्जी पंडितजींचे पूर्वज जे राजकौल ह्यांजवर बसली व त्यांना एका कालव्याच्या कांठीं राहात्या घरासह जहागीर मिळाली. कालव्याला हिंदीमध्यें नहर असा शब्द आहे. तेव्हां नहराच्या कांठीं राहाणारे ते नेहरू असें नांव त्यांच्या घराण्याला पुढें पडलें.

१८५७ च्या स्वातंत्र्यसंग्रामांत नेहरू कुटुंब निराश्रित बनून आग्र्याकडे वस्तीकरितां गेलें. तेथेंच आपल्या चरित्रनायकाच्या थोर पित्याचा जन्म १८६१ मध्यें झाला. पंडित मोतीलालजींचें शिक्षण-संगोपन सर्व कांहीं त्यांचे वडील बंधु नंदलालजी ह्यांनीं केलें. ह्या दोघा भावांच्या प्रेमांत भ्रातृप्रेम, पितृवात्सल्य आणि पितृभक्ति ह्या सर्व भावनांचें क्वचित् आढळणारें मिश्रण झालेलें आढळून येईल. पंडित मोतीलालजींची मातुःश्री मोठ्या तोऱ्याची आणि करारी स्वभावाची बाई म्हणून तिकडील भागांत प्रसिद्ध होती.

वडील बंधु आग्र्याहून अलाहाबादेस राहाण्यास गेल्यावर, मोतीलालजींचें शिक्षणही अलाहाबादेसच झालें. प्रथम त्यांनीं पर्शियन व अरबी भाषेचा चांगला अभ्यास केला. पुढें इंग्रजी शिक्षणाची महति कळल्यावर ते इंग्रजी शिकून बी. ए. च्या वर्गापर्यंत पोहोंचले. विद्यालयांत त्यांची ख्याति अभ्यासू विद्यार्थी म्हणून मुळींच नव्हती. अत्यंत खोडकर विद्यार्थी म्हणून ते प्रसिद्ध होते.

त्यांच्या व्रात्यपणामुळेंच त्यांची बी. ए. ची परीक्षाही उतरली नाहीं. पूर्ववयांत ते ग्रॅज्युएट झाले नाहींत, तरी धकाधकीच्या मामल्यांत त्यांनीं आपली देहयष्टि चांगली कमावून घेऊन ' शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् ' हें वचन सार्थ केलें होतें. बी. ए. ची परीक्षा उतरत नाहीं असें पाहून पंडितजी वकिलीकडे वळले. कायद्याच्या परीक्षेंत तर त्यांनीं सुवर्णपदकेंही मिळविलीं. ज्यांत आपली गति अप्रतिहतपणें चालते तो धंदा हातीं आल्यावर परिश्रम उत्साहानें करण्याचें त्यांना भरतें आलें. त्यांनीं इतर व्यावहारिक गोष्टी एका बाजूस सारल्या, सर्व लक्ष आपल्या धंद्याकडे केंद्रित केलें. आपल्या पक्षकाराचे कागद त्यांनीं रात्रीं जागून नीट पाहावेत. त्यांतील महत्त्वाच्या मुद्द्यांचें टिपण करावें. कायद्याचीं पुस्तकें चाळून त्यांतून आपल्या पक्षाला उपयोगीं पडतील अशीं कलमें व खटल्याचे दाखले उतरून ठेवावेत. इतकी तयारी झाल्यावर आपल्या खटल्याची मांडणी कशी करावयाची ह्याचा रात्रीं पडल्या पडल्या विचार करावा. अशा पूर्वतयारीनें किती वकील कोर्टांत जात असतील बरें ? कोर्टांतील त्यांचा पोषाख नीटनेटका असे. त्यांचें बोलणेंचालणें रुबाबदार असल्यामुळें समोरच्या माणसांवर त्यांची छाप सहज पडे. कोर्टांत आपली बाजू मांडण्याकरितां ते उभे राहिले म्हणजे अशा ऐटीनें प्रारंभ करीत कीं आपलें म्हणणें कोर्टानें मानलेंच पाहिजे. हळूहळू आपल्या मुद्देसूद बोलण्यानें कोर्टाचें मन ते आपल्या अंकित करून घेत व पुढें पुढें जो जो मुद्दा ते मांडीत व जे जे आधार दाखवीत ते ते कोर्टाला पटून खटला त्यांच्यासारखा होण्याला विलंब लागत नसे. उपजत गुणाला भरपूर कष्टाची जोड मिळाल्यामुळें त्यांचें नांव यशस्वी कायदेपंडित म्हणून गाजण्यास विलंब लागला नाहीं. यशाच्या पाठोपाठ संपत्तीचा झराही त्यांच्या घराकडे वळला.

मोतिलालजींनीं हां हां म्हणतां आपली मासिक मिळकत हजारों रुपयांवर नेली. एका वेळीं तर त्यांचें मासिक उत्पन्न तीस चाळीस हजारांपर्यंत गेलेलें होतें. पैसे मिळवून बँकेचें धन करण्यांत समाधान मानणारे मोतिलालजी नव्हते. जीवनांतील नानाविध ऐषआराम भोगावयाची त्यांची मनीषा होती. अलाहाबादमध्यें त्यांनीं लवकरच एक फार मोठें घर खरेदी करून आनंदभुवन ह्या नांवाला साजेशा सुखसोयी त्यांत करून घेतल्या. अलाहाबादमध्यें मोतिलालजी हे लवकरच बादशाही थाटाच्या जीवनक्रमाविषयीं प्रसिद्ध पावले. कोणाही कलावंताच्या कलेचा परामर्ष तेथें घेतला जावयाचा. कलेप्रमाणेंच त्यांना नाना विद्यांचीही आवड होती. त्यांनीं इंग्रजी, पर्शियन व हिंदी ह्या भाषांतील उत्तमोत्तम ग्रंथ जमा केले होते. जें जें म्हणून गुणश्रेष्ठ असेल, त्याला त्याला मोतिलालजींच्या गृहीं स्थान मिळावयाचें हें ठरलेलें असे. चार

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

मंडळींतील गृहस्थ ते असल्यामुळें त्यांच्याकडे भिन्न भिन्न कार्यांतील लोक नेहमीं आकर्षिले जात. मंडळींत बसून हसत खेळत ते नानाविध विषयांवर चर्चा करीत. पण कोर्टांत असोत, पंडितांच्या मेळ्यांत बसोत अगर आपल्या खास खेळीमेळींतील मित्रमंडळींत रमून जावोत, प्रत्येक ठिकाणीं त्यांचाच वरचष्मा असावयाचा. जेथें त्यांचें तेज पडणें शक्य नव्हतें तेथें ते जातच नसत. आपलें पंचायतन जमवावें, त्यांत हास्यविनोद करीत, कांहीं उच्च चर्चा करीत फुरसतीचा वेळ घालविण्याचा त्यांचा स्वभाव होता. व्यायाम आणि शारीरिक खेळ ह्यांची त्यांस शेवटपर्यंत आवड होती. शरीर मजबूत करून निरोगी राखावें, जीवनांतील नानाविध उपभोग भोगावेत व दीर्घोद्योग करून यथेच्छ पैसा मिळवावा अशा तऱ्हेचा जीवनक्रम पंडित जवाहरलालजींच्या पित्याचा होता. बाहेरून पाहाणारांस मोतीलालजी एक बुद्धिमान, विलासी गृहस्थ दिसत, पण ह्या विलासी स्वभावाच्या आवरणांत एक मोठा गुण दडलेला होता. तो म्हणजे **विलक्षण मानीपणा.** जेथें जाईन तेथें सर्वश्रेष्ठ म्हणूनच मी वावरेन अशी त्यांची वृत्ति असल्यामुळें सामाजिक जीवनांत त्याला घमेंडखोरपणाचें स्वरूप प्राप्त झालें होतें. सामान्य बुद्धीच्या माणसाला ते तुच्छ लेखीत. दारिद्र्य हें निर्बुद्धतेचें, ऐदीपणाचें लक्षण आहे असें ते समजत. केलेल्या उद्योगांत त्यांना नेहमीं यश येऊन, संपत्ति मिळत गेल्यामुळें त्यांचीं अशीं मतें बनणें साहजिकच होतें. पुढें पुढें हिंदी राजकारणांत खोल शिरून, हिंदी लोकांच्या दारिद्र्याचीं खरीं कारणें पारतंत्र्याच्या पोटांत दडलेलीं आहेत हें त्यांच्या ध्यानीं आल्यावर, मग मात्र त्यांची गरिबांबद्दलची तुच्छवृत्ति पूर्वीप्रमाणें राहिली नाहीं. **जो मानीपणा सामाजिक बाबतींत चढेलपणा म्हणून ठरला, तोच त्यांचा मानधन स्वभाव ते राजकारणांत उतरल्यावर राष्ट्राला उपकारक झाला.** कांहीं लोकांचा मानीपणा संकटें आलीं नाहींत तोंवर टिकून असतो, पण संकटांनीं गर्दी केली कीं ते लाचार बनतात. त्यांतले पंडित मोतिलालजी नव्हते. राजकारणाच्या आखाड्यांत उतरल्यावर ब्रिटिश सरकारकडून आपल्या राष्ट्राचा जो पदोपदीं अपमान होती तो त्यांस सहन न होऊन सरकारशीं दोन हात करण्याचा जेव्हां प्रसंग आला त्या वेळीं विलासी जीवनाचा त्याग करून त्यांनीं कष्टाचें जीवन पत्करलें. **हिंदुस्थान जोंपर्यंत स्वतंत्र झाला नाहीं तोंपर्यंत कोणाही हिंदी माणसाला उंच मान करून चालणें शक्य नाहीं.** राष्ट्राच्या मोठेपणांत त्यांतील व्यक्तींचा मोठेपणा सांठविलेला असतो, हें ध्यानीं येतांच [illegible] त्यावरून

ना. दि. 5913 ... नालय शाखा

राख उडून तो तेजस्वी व दाहक व्हावा त्याप्रमाणें मोतिलालजींची स्थिति झाली. आपल्यापुरतेंच पाहाण्याची त्यांची वृत्ति नाहींशी होऊन ते राष्ट्राचे पुढारी जे एकदा बनले ते शेवटपर्यंत तसेच राहिले.

अशा संस्कारी, उद्योगी व मानधन कुलांत पंडित जवाहरलालजींचा जन्म १४ नोव्हेंबर १८८९ रोजीं झाला.

## प्रकरण तिसरें

# बालपण व विद्याभ्यास

पं. मोतिलालजींनीं वकिली सुरू केल्यावर त्यांना पुष्कळ दिवसांनीं एक अपत्य झालें. काश्मिरी घराणीं रूपसौंदर्याकरितां व केतकीसारख्या गौरवर्णाकरितां प्रसिद्ध आहेत. मोतिलालजींच्या पत्नी सौ. स्वरूपाराणी ह्या नाजूक बांध्याच्या, ठेंगण्या-ठुसक्या व नांवाप्रमाणेंच रूपानें लाखांत बायको म्हणावयास हरकत नाहीं अशा होत्या. पं. मोतीलालजी हे उंच बांध्याचे, धष्टपुष्ट, मर्दानी सौंदर्यानें विलसणारे दिसत असत. ह्यामुळें त्यांचें बालक असाधारण सुंदर व सुदृढ असें व्हावें ह्यांत नवल नाहीं.

पहिलेंच अपत्य, त्यांत मुलगा, घरांत श्रीमंतीचा ओघ वाहातो आहे, बाप हाताचा खर्चिक आहे, मग त्या बालकाचे लाड किती प्रकारें झाले असतील ह्याची कल्पनाच करावी. स्वरूपाराणी ह्यांनीं एका व्याख्यानांत म्हटल्याप्रमाणें जवाहरलालजींना पुष्पशय्येंत वाढविलेलें आहे. पं. मोतिलालजी हे युरोपियन संस्कृतीचे चहाते असत व त्यांच्या पत्नी स्वरूपाराणी ह्यांना आपली जुनी हिंदी संस्कृति प्रिय वाटे. ह्यामुळें दोघांनीं आपापल्या प्रकारें मुलाला वळण लावण्याचा प्रयत्न केला. तारुण्यांतील पहिलें बालक, मग त्या बालकाच्या लीला पाहाण्यांत आईबाप स्वतःला कृतार्थ मानीत ह्यांत नवल काय ? जेथें जेथें मुलगा काठीचा घोडा करून दुडदुडा धावत फिरे तेथें तेथें त्यांची दृष्टि वळावी. पं. मोतिलालजींचा वभाव धीट व धाडशी असल्यामुळें मुलगा उन्हांत इकडे तिकडे नाचूं बागडूं

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

लागला तर ते त्याजकडे सकौतुक पाहात, तर त्यांच्या पत्नीचा जीव मुलगा जरा दृष्टिआड झाला, कोठें शिडीमाळ्यावर चढला कीं खालींवर होई. मग पतिपत्नींत मुलावरून थोडा प्रेमकलह व्हावा. पं. जवाहरलालजी दिसण्यांत जरा नाजूक होते, तरी हाडाचे चिवट व प्रकृतीचे निरोगी असल्यामुळें मुलाच्या प्रकृतीची काळजी त्यांच्या पितरांना वाहण्याचें कारण पडलें नाहीं.

मुलाच्या बुद्धीचा हळूहळू विकास होत जाईल अशीं युरोपियन तऱ्हेचीं खेळणीं मुलापुढें नित्य येऊन पडत. घरच्या तलावांत बापानें मुलाला घेऊन जलविहार करावा. मुलाला घोड्यावर चांगलें बसतां यावें म्हणून त्याकरितां जातिवंत अरबी घोडा बाळगण्यांत आला होता. घरांत पं. मोतिलालजींनीं एक युरोपियन 'गव्हर्नेस' आणून ठेवून तिच्याकडे मुलाचें संगोपन सोपविलें होतें. ह्या सुशिक्षित बाईच्या सहवासांत पं. जवाहरलालजींना इंग्रजी सहजसुंदर असें बोलतां येऊं लागलें. युरोपियन तऱ्हेच्या रीतीभाती त्यांना समजूं लागल्या. पं. मोतिलालजींनीं मुलाला शाळेंत कधींच पाठविलें नाहीं. ते म्हणत, "हिंदी शाळा म्हणजे सर्व तऱ्हेनें कुचकामी आहेत. तेथील उपकरणें रद्दी, शिक्षणपद्धति गचाळ व शिक्षक तर इस्से जादा. असल्या भिकार शाळेंत पाठवून, माझ्या मुलाला मी घाणेरडें शिक्षण कधींही देणार नाहीं. स्फटिकाप्रमाणें निर्मळ, अमृततुल्य असें गंगोदक मुलाला आणून देण्याचें सामर्थ्य मजमध्यें असतां गांवच्या गटाराचें पाणी मुलाला पाजण्याइतका मी मूर्ख नाहीं." मुलगा जरा मोठा झाल्यावर फर्डिनँड टी ब्रुक्स ह्या विद्वान् इंग्रज गृहस्थाच्या स्वाधीन त्याला करण्यांत आलें. ह्या गृहस्थाला पं. मोतिलालजींनीं आपल्या घरींच कांहीं वर्षें ठेविलें होतें. हा गृहस्थ मोठा सात्त्विक व विद्वान् होता. ह्याच्या संगतीनें पंडितजींना लहानपणांतच वाचनाची खूप गोडी लागली. इतिहास, काव्य व शास्त्र ह्या विषयांत पंडितजींचा लौकरच चांगला प्रवेश झाला. मि. ब्रुक्स ह्यांच्या सहवासामुळें हिंदु धर्मांतील तत्त्वज्ञानाबद्दल पं. जवाहरलालजींचा आदरभाव जो एकदा वाढला आहे तो अजून कायम आहे. ह्या काळांतच त्यांनीं उपनिषदें व गीता वाचून टाकिली. पंडितजींच्या चुलतीचा पुराणग्रंथांचा अभ्यास दांडगा होता. तिच्याजवळ बसून पुराणांतील कथा बालजवाहरलाल आदरानें व कुतूहलानें ऐकत. सद्ग्रंथांच्या वाचनाबरोबर वडील मंडळीबद्दल आदरभाव ठेवून त्यांच्याशीं आपली वागणूक विनयाची ठेवण्याचें शिक्षण त्यांस कोवळ्या वयांतच मिळालें आहे.

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

पं. जवाहरलालजी आपल्या आत्मचरित्रांत लिहितात कीं, "वडिलांबद्दल मला निस्सीम आदर वाटे. ते म्हणजे शक्ति, शौर्य व बुद्धिमत्ता ह्यांचे साक्षात् पुतळे आहेत अशी माझी कल्पना होती. मनांतल्या मनांत दडवून ठेविलेली माझी आशा म्हणजे मी मोठेपणीं वडिलांप्रमाणें व्हावें." वडिलांच्या तापट व उग्र स्वभावामुळें छोटे पंडित नेहमीं घाबरून जात व त्यांच्यासमोर उभे राहाण्यास सहसा धजत नसत. वडील जितके कडक तितके अंतःकरणाचे प्रेमळही असत. एकदा छोट्या पंडितजींनीं बालस्वभावानुरूप वडिलांचें एक फाउंटन पेन लांबविलें. पुढें चौकशीच्या वेळीं वडील रागावतील म्हणून नाकबूल झाले. मुलानें फाउंटन पेन घेतलें म्हणून बापाला राग आला नाहीं. कारण आपल्या लाडक्या मुलाकरितां एक सोडून चार तसल्या जिनसा त्यांनीं विकत आणल्या असत्या. पण आपला मुलगा खोटें बोलतो आहे हें पाहातांच पं. मोतिलालजी रागानें लाल झाले. त्यांनीं मुलाला पुढें बोलावून धाक दाखवून गुन्हा कबूल करायला लाविलें. छोटे पंडितजी त्या नारसिंह अवतारापुढें थरथर कांपूं लागले. "होय, मी खोटें बोललों," एवढे शब्द मुलाच्या तोंडून निघण्याबरोबर कर्दनकाळ बापानें हातीं छडी घेऊन आपल्या कोवळ्या मुलाला गुराप्रमाणें झोडपून काढलें. मार सहन होईना, तेव्हां तें कोवळें बालक बापाच्या हातून निसटून धावत धावत जाऊन आईला बिलगलें. मुलाला पोटाशीं घेऊन, इतर वेळीं नवऱ्यापुढें शब्द न बोलणाऱ्या स्वरूपाराणी पतीच्या अंगावर ओरडून म्हणाल्या, "पोराचा जीव का घ्यायचा आहे? पोर आहे, घेतलें असेल फाउंटन पेन." पं. मोतिलालजी ह्यावर म्हणतात, "त्याला खोटें बोलल्याबद्दल ही शिक्षा करीत आहें. ह्या वाईट खोडीचा लहानपणींच नायनाट झाला पाहिजे."

स्वरूपाराणी मुलाचा कैवार घेऊन म्हणाल्या, "तुम्ही इतके रागानें बोलतां कीं मुलें घाबरून जातात व नाकबूल होतात. जरा प्रेमानें विचारलें असतेंत तर नसतें कां चाललें? मुलाच्या पाठीचें कातडें निघालें आहे, त्याची कांहीं शुद्ध! बाप आहांत का कोण आहांत?"

पत्नीच्या ह्या सात्त्विक दटावणीनें पं. मोतिलालजींच्या रागाचा पारा अर्थात् खालीं आला. मुलाला आपण भलतीच शिक्षा केली हें त्यांच्या ध्यानीं येतांच डॉक्टरला लगेच :बोलावणें गेलें. मुलाच्या पाठीचे वण बरे होईपर्यंत पं. मोतिलालजी स्वतः मलमपट्टी करण्यांत लक्ष घालीत. त्या वेळीं स्वरूपाराणी एखादे वेळीं टोला देत, "मारतांना शुद्ध कोठें गेली होती!" पत्नीचा तो सकारण

टोला स्वाभिमानी व तापट मोतिलालजी मुकाट्यानें सहन करीत. ह्या कडक शिक्षेचा मुलावर कांहीं वाईट परिणाम झाला नाहीं. "आपला बाप आपल्याला चांगलें वळण लावण्यासाठीं शिक्षा जरी करतो, तरी शिक्षेमुळें झालेलें दुःख निवारण करण्याची काळजीही तितकीच घेतो; आपल्यावर आपल्या बापाचें निरतिशय प्रेम आहे; तेव्हां आईनें वडिलांना टोंचून न बोलतां क्षमाच करावी," असे विचार त्या वयांत पं. जवाहरलालजींच्या मनांत येत.

मातुःश्रीप्रमाणें विश्वासाचें दुसरें एक स्थान पंडितजींना लहानपणींच लाभलें होतें. तें म्हणजे मुन्शी मुबारक अल्ली. पं. मोतिलालजींचे हे पूर्वीचे शिक्षक. पंडितजी त्यांच्याजवळ गप्पा मारण्यास नेहमीं जात. अरेबियन नाईट्स् किंवा अशाच अद्भुतरम्य कथा मुन्शीसाहेब आजोबाच्या प्रेमानें सांगत. लहानपणीं मुलांना गोष्टी सांगणारा मनुष्य किती प्रिय असतो हें वाचकांनीं स्वानुभवानें ठरवावें. मुन्शीजी जवाहरलालजींची करमणूकच करीत असें नव्हे, तर मुलगा कांहीं कारणानें दुःखीकष्टी झाला, तर त्याच्या पाठीवरून हात फिरवून त्याचें शांतवनही करीत. ह्या थोर पुरुषाची स्मृति पंडितजींनीं एखाद्या ठेव्याप्रमाणें जतन करून ठेविली आहे.

बाल जवाहरलालजींचा स्वभाव लहानपणीं मोठा भावनाप्रधान व संस्कारक्षम असे. बोअर लोक स्वातंत्र्यासाठीं इंग्रजांशीं लढून जिवाचें रान करीत आहेत ही बातमी ऐकली कीं बोअर लोकांना जय यावा अशी ते इच्छा करीत. एखादे वेळीं बोअर लोकांचा जय झाला कीं ह्यांना हर्ष व्हावा, दुसऱ्या वेळीं इंग्रजांच्या सरशीची बातमी त्यांच्या कानीं पडली कीं, "देवा, बोअर लोकांना यश दे," अशी ते प्रार्थना करीत. रूसो-जपानी युद्धाच्या वेळीं जपानच्या जयाकडे बालपंडितजी आपुलकीच्या भावनें पाहात. घरांत वृत्तपत्रें मुबलक व वडिलांच्या दिवाणखान्यांत राजकारणाची चर्चा नेहमीं चालावयाची, ह्यामुळें रूसो-जपानी युद्धाचें रहस्य पंडितजींना लहान वयांत कळूं लागलें. "युरोपच्या दास्यशृंखलेंत एशिया सापडला आहे, त्यांतून मुक्त होण्याचा जपान प्रयत्न करीत आहे; त्यांत त्याला यश आलें, तर आज नाहीं उद्यां हिंदुस्थानच्या लोकांनीं प्रयत्न केला तर पुढचा रस्ता नीट झाल्यामुळें स्वातंत्र्ययुद्धांत आपल्यालाही यश मिळेल," असे विचार पंडितजींच्या मनांत चालावयाचे. तळमळ हा भाव जवाहरलालजींच्या स्वभावांत विशेष प्रमाणांत आहे. ते राजकारणाची चर्चा चहा पितां पितां

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

शिळोप्याच्या गप्पा म्हणून करीत नसत. हिंदुस्थान पारतंत्र्यांत आहे ह्याची जाणीव एकदा होतांच आपल्या मातृभूमीला स्वतंत्र कसें करतां येईल ह्याचा विचार ते उठतां बसतां करीत. अर्जुनाच्या निस्सीम कृष्णभक्तीची गोष्ट म्हणून पुराणिक सांगत असतात कीं, "अर्जुन झोंपेंत असला तरी त्याच्या केसांतून कृष्ण कृष्ण असा ध्वनि निघे." पं. जवाहरलालजींचे स्वातंत्र्याचे विचार जागृतींतच चालत असें नाहीं, तर त्यांना स्वप्नेंही तशींच पडत. हातीं तरवार घेऊन मी हिंदी स्वातंत्र्यासाठीं लढत आहें अशीं स्वप्नें त्यांना नेहमीं पडावीं.

मुलाला त्या काळांत मिळणारें उत्तमोत्तम शिक्षण देऊन आय. सी. एस्. करावा किंवा त्याला पसंत असेल तर वडिलोपार्जित वकिलीचा धंदा त्यानें स्वीकारावा; मुलानें आपणाप्रमाणेंच खूप पैसा मिळवून जगांतील नानाविध सौख्यांचा यथेच्छ उपभोग घ्यावा; असे विचार एकीकडे बापाचे चालत असतां, मुलाला हिंदी स्वातंत्र्ययुद्धाचीं स्वप्नें पडत असत. मुसलमानांची सेवा करून बडे जहागिरदार बनलेल्या शहाजीच्या घरांतच मुसलमानी अंमल पार झुगारून देण्याची कल्पना हृदयाशीं बाळगणारा शिवाजी अवतरला. आजही वैयक्तिक सौख्यावर दृष्टि ठेवणाऱ्या व इंग्रजांना सहसा विरोध न करणाऱ्या घराण्यांतच स्वातंत्र्ययुद्धाचीं स्वप्नें ज्याला पडत आहेत असा वीर जन्माला यावा हें केवढें आश्चर्य! आश्चर्य तर खरेंच, पण असेंच पुष्कळदा घडतें. आईबाप पुष्कळदा मुलावर चांगले संस्कार व्हावे म्हणून त्याच्या पुढें थोर लोकांचीं चरित्रें ठेवतात. मुलें जर भावनाप्रधान व सात्त्विक वृत्तीचीं असलीं तर त्यांना त्यागी, शूर व धाडशी पुरुषांप्रमाणें आपलें जीवन व्यतीत करावेंसें वाटूं लागतें. जगांतील सौख्याचा त्यांनीं अनुभव घेतलेला असतो, ह्यामुळें त्यांच्यांत असल्या सौख्याची हाव बिलकुल राहिलेली नसते. मग ते थोर पुरुषांच्याच जीवनाचें अनुकरण करूं पाहातात आणि आपणाला बापाच्या व मुलाच्या जीवनांत मोठा विरोध दिसतो. पारतंत्र्यांत पडलेल्या राष्ट्राला वर काढावयाचें म्हणजे त्यागाचा आदर्श सामान्य जनतेपुढें असावयास पाहिजे. गर्भश्रीमंतांनीं ऐषारामाचा त्याग केला म्हणजे सामान्य जनतेवर त्याचा फार मोठा परिणाम होतो. बुद्धाचें जीवनचरित्र ह्यामुळेंच आपल्या मनांत विशेष रीतीनें ठसतें. पूर्ववयांतील नेमस्तांतल्या नेमस्त बापाच्या पोटीं पूर्ण स्वातंत्र्याचे विचार घेऊन जवाहरलाल जन्माला आले हें देशाचें महद्भाग्य होय.

प्रकरण चौथें

# इंग्लंडची यात्रा व विद्याभ्यास

********************************

पंडित जवाहरलाल १४ वर्षांचे झाल्यावर मोतिलालजींनीं विचार केला कीं येथील हायस्कूल-कॉलेजमध्यें मुलाला शिक्षण देण्यापेक्षां त्याला जर विलायतेंत पाठविला तर त्याला अत्युत्तम शिक्षण मिळून त्याची दृष्टि व्यापक होईल. उत्तर हिंदुस्थानांतील श्रीमंत घराण्यांत आपल्या मुलांना कोवळ्या वयांतच शिक्षणासाठीं विलायतेला पाठविण्याची प्रथा होती. बाबू अरविंद घोष, कविसम्राट् रवींद्रनाथ ह्यांनीं कोवळ्या वयांतच विलायत पाहिली होती. एकुलत्या एक मुलाला इतकें दूर शिक्षणाकरितां पाठवावयाचें बापाच्या केवढें जिवावर आलें असेल ? परंतु शिक्षणाची आवड मोतिलालजींना इतकी जबरदस्त होती कीं त्यामुळें त्यांना पुत्रसहवासाचा मोह आवरतां आला. मोतीलालजींची कृति सर्वच लोकविलक्षण. मुलाला पुणें-मुंबईस ठेवावयाचें असलें, तर आपण फार तर स्टेशनपर्यंत पोंचवावयास जातों पण मोतिलालजी खर्चाचा वगैरे कांहीं एक विचार न करतां स्वरूपाराणींना बरोबर घेऊन मुलाला पोंचविण्याकरितां थेट विलायतेपर्यंत गेले. हॅरो येथील सुप्रसिद्ध शाळेंत मुलाला ठेवून हीं मातापितरें दुःखित अंतःकरणानें हिंदुस्थानांत परतलीं.

ह्या नवीन शाळेंत व अगदींच वेगळ्या वातावरणांत पं. जवाहरलालना प्रथम मुळींच करमेना. घरची वारंवार आठवण व्हावी. पण ही स्थिति त्यांनीं फार काळ टिकूं दिली नाहीं. त्यांनीं लवकरच मन आवरून नव्या वातावरणाशीं समरस होण्याचे ठरविलें. तेथील खेळांत ते हौसेनें भाग घेऊं लागले. हिंदुस्थानांत उत्तम शिक्षकाजवळ विविध विषयांचें शिक्षण त्यांचें झालेलें असल्यामुळें हॅरो येथील समवयस्क मुलांपेक्षां ते संस्कारांत कितीतरी पुढें गेले होते. परंतु त्यांना लॅटिन भाषा येत नव्हती. ह्यामुळें कांहीं दिवस खालच्या वर्गांत राहून त्या भाषेचें शिक्षण त्यांना घ्यावें लागलें. इतर मुलांबरोबर लॅटिन भाषेंतील त्यांची प्रगति पाहातांच जवाहरलालना एकदम वरच्या वर्गांत घेण्यांत आलें. हिंदुस्थानांत असें कधीं होईल का ? मुलाचे संस्कार कितीही उच्च असोत, विविध विषयांतील त्याची प्रगति

कितीही झालेली असो, एकेका यत्तेंत एक एक वर्ष काढल्याशिवाय त्याला गत्यंतर नसतें.

दोन वर्षें हॅरो येथें काढल्यावर पंडितजी केंब्रिजच्या विश्वविद्यालयांत गेले. दोन वर्षें तेथें अभ्यास केल्यावर बी. ए. ची परीक्षा मोठ्या सन्मानानें ते उत्तीर्ण झाले. ह्यानंतर काय करावयाचें हा मोठा प्रश्न होता. थोर लोकांच्या मुलांप्रमाणें आय्. सी. एस्. च्या परीक्षेला जाऊन बडी नोकरी पटकावयाची, परंतु पंडितजींचें वय त्या परीक्षेला बसण्याइतकें झालेलें नव्हतें. आणखी कांहीं काल इंग्लंडमध्यें काढावा तर घरची मंडळी मुलाला हिंदुस्थानांत आणण्यासाठीं अधीर झाली होती. शिवाय आय्. सी. एस्. ची परीक्षा उतरून कलेक्टर व्हावयाचें म्हणजे नोकरीनिमित्त अलाहाबादेपासून दूरच्या गांवीं जाऊन राहावें लागलें असतें, तेंही घरच्या मंडळींना पसंत नव्हतें. आय्. सी. एस्. चा नाद सुटण्याला हेंच शेवटचें कारण अखेरीस घडलें. पं. जवाहरलाल आय्. सी. एस्. झाले नाहींत, हें देशाचें भाग्य नव्हे काय ? ते बुद्धिमान व निरलस असल्यामुळें त्या नोकरींतही ते कमिशनरच्या जागेपर्यंत सहज जाऊन पोचले असते, पण परमेश्वराची इच्छा निराळी होती. आय्. सी. एस्. चा नाद सोडल्यावर दुसरा मार्ग म्हणजे बॅरिस्टरीचा होता. त्याच मार्गानें पं. जवाहरलालजींनीं जावयाचें ठरविलें व **इनर टेंपल** ह्या संस्थेंत तीन वर्षें राहून बॅरिस्टरीची पदवी संपादन केली.

विलायतेंत पंडितजींनीं एकंदर सात वर्षें काढलीं. ह्या कालांत त्यांनीं आपल्या बुद्धीला चौकसपणाचें वळण लाविलें. अंधश्रद्धेचा आश्रय न करतां बुद्धीच्या कसोटीवर प्रत्येक विचार पारखून घ्यावयाचा असा त्यांनीं निश्चय केला. कोणताही विषय आत्मसात् करावयाला लागणारी मेहनत करण्याची सवय त्यांनीं ह्या काळांतच स्वतःला लावून घेतली. इंग्लंडमध्यें सर्व लोक मोठे वक्तशीर असतात. ह्यामुळें पंडितजींनाही तें वळण लागून वेळच्यावेळीं कामें करण्याचा त्यांचा स्वभावच बनून गेला. उत्तमोत्तम ग्रंथांचें ह्या कालांत परिशीलन झाल्यामुळें व स्वभावांत विशेष रसिकता असल्यामुळें त्यांची लेखनशैली अभिजात वाङ्मयीन अवतरणांनीं विखुरलेली व हृदयाचा एकदम ठाव घेणारी अशी ह्या काळांतच तयार झाली.

हिंदुस्थानांतील शाळेंत अगर कॉलेजांत मोकळेपणानें राजकारणाची चर्चा करणें अशक्य असतें. " अगोदर अभ्यास करा, राजकारणाच्या नसत्या भानगडी

*************************************************

उगाच करूं नका," असा उपदेश मुलांना घरींदारीं होत असतो. कारण राजकारणाची चर्चा एकदा सुरू झाली कीं आपल्या दुःखाचें मूळ थेट पारतंत्र्याला जाऊन मिळतें. आपल्या दुःखाचें मूळ पारतंत्र्य, हें एकदा कळल्यावर पारतंत्र्य झुगारून देण्याचा विचार आपोआप उत्पन्न होतो. असें झालें कीं झालाच राजद्रोह. राजद्रोही मुलांच्या शाळेस सरकारी ग्रँट कशी मिळणार, राजद्रोही विचार बडबडणाऱ्या मुलांच्या बापांनीं सरकारी नोकरींत बढतीची आशा कशी धरावी, अगर तो वकील, डॉक्टर असल्यास राजमान्य व श्रीमंत लोकांचा उदार आश्रय त्यास कसा मिळणार ? पोलिसांचा ससेमिरा राजकारणांत तीव्र भाषा वापरणारांच्या मागें लवकरच सुरू होतो व मुलांच्या आयुष्यांतील बढतीचे मार्ग बंद होतात. ही अडचण इंग्लंडमध्यें नाहीं. तेथें भाषणस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य भरपूर आहे. ह्यामुळें ऑक्सफर्ड, केंब्रिज ह्या विद्यालयांत हिंदी विद्यार्थी मोकळ्या मनानें हिंदी राजकारणाची चर्चा करतात व तारुण्यसुलभ असे राजकीय जहाल विचार ह्या चर्चेतून बाहेर पडतात. पंडितजी विलायतेंत असतांना असल्या राजकीय चर्चेंत चांगला भाग घेत. १९०५ ते १९०७ ह्या काळांत हिंदुस्थानांत जी मोठी राजकीय चळवळ चालली होती त्यासंबंधींचे आपले विचार ते आपल्या वडिलांना वेळोवेळीं कळवीत.

हिंदुस्थानांत वंगभंग झाल्यावर राजकारणी पुरुषांत दोन तट पडले. एक टिळकप्रभृति जहाल लोकांचा व दुसरा गोखले आदिकरून नेमस्तांचा. इंग्रजांनां नमविण्याकरितां जहाल गटानें विलायती मालावर बहिष्कार घालण्याची जी जोराची चळवळ सुरू केली होती, तिच्याबद्दल विलायतेंतील तरुण विद्यार्थ्यांना सहानुभूति वाटे. पंडितजींनीं टिळकांची बाजू उचललेली मोतिलालजींना आवडत नसे. पुष्कळ वर्षेंपर्यंत मोतिलालजी राजकारणांत मुळींच पडत नसत. परंतु पुढें मित्रांच्या आग्रहामुळें ते नेमस्तांच्या गटांत खेचले गेले व अलाहाबाद प्रांतिक परिषदेचे अध्यक्षही झाले. ह्या काळांत मोतिलालजी हिंदुस्थानांतील टिळकप्रभृति जहाल लोकांवर खूप कोरडे ओढीत. कायद्याच्या व्यासंगांत त्यांचें जीवन खूप व्यतीत झाल्यामुळें कोणतीही चळवळ कायद्याच्या चौकटींत बसल्याशिवाय त्यांस पसंत पडत नसे. शिवाय ही जी जहालांची राजकीय चळवळ हिंदुस्थानांत चालली होती तिला धार्मिक पुनरुज्जीवनाचें वळण मिळत होतें, तें मोतिलालजींना पसंत नव्हतें. त्यांना इंग्रजी रीतीरिवाज, पाश्चात्य विचारसरणी पसंत असल्यामुळें हिंदी राजकीय चळवळीची दिशा इंग्रजी वळणावर गेल्याशिवाय आपल्या राष्ट्राचा

तरणोपाय नाहीं असें त्यांना वाटे. सामान्य हिंदी जीवनाशीं ते समरस होत नसल्यामुळें जहाल पुढाऱ्यांचे आचार, विचार व चळवळीचे प्रकार त्यांना नापसंत होऊन ते त्यावर आपल्या भाषणांत वर म्हटल्याप्रमाणें प्रहार करीत. वडिलांचें हें करणें छोट्या पंडितजींना नापसंत होऊन त्यांनीं आपल्या पत्रांत वडिलांना टोमणा मारला कीं, " तुमचीं भाषणें सरकारी गोटांत पसंत होऊन तुमचें वजन सरकारदरबारीं आतां वाढत जाणार." मोतिलालजींना पुत्राचें लिहिणें अर्थात् आवडलें नाहीं. आपले चिरंजीव वाहावत चालले असें वाटून ते त्यांना परत बोलवावयाचा विचार करूं लागले.

विलायतेंत असतांना ज्याप्रमाणें त्यांचीं राजकारणविषयक मतें उदार व पुरोगामी बनलीं त्याप्रमाणें सामाजिक व धार्मिक बाबतींतही त्यांचे विचार पूर्णपणें नवीन वळणाचे झाले. ह्या विचाराप्रमाणें त्यांच्या आचाराला स्वच्छंदी व अनैतिक वळण लागावयाला वेळ नव्हता. पण त्यांचा स्वभाव मूळचाच लाजाळू व संकोची ह्यामुळें विचाराप्रमाणें बेफाम आचरण त्यांच्याकडून घडलें नाहीं. शिवाय संसारांतील कलामय जीवनाकडे ते आकर्षित होत गेल्यामुळें हलक्या दर्जाच्या उपभोगांत ते दंग झाले नाहींत. शिवाय धाडसी जीवनाचा त्यांना हव्यास असल्यामुळें श्रीमंतीचे खेळ खेळत असतां ते कोणत्याही व्यसनाच्या आधीन होऊं शकले नाहींत. असें जरी होतें तरी लंडनमधील फॅशनेबल गृहस्थाप्रमाणें आपली राहाणी ठेवण्याचा तारुण्यसुलभ मोह त्यांस उत्पन्न होऊन ती इतकी खर्चाची झाली कीं मोतिलालजींसारख्या सढळ हातानें मुलाचे लाड पुरविणाऱ्या गृहस्थालाही खर्च आटोपतां घेण्याचा इषारा बॅरिस्टरीचा अभ्यास चालू असतां पंडितजींना द्यावा लागला.

आपली सप्तवार्षिक विलायतेंतील राहाणी व्यतीत करून पंडितजी हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर उतरले, त्या वेळीं आपल्याजवळ आढ्यतेखोरपणाशिवाय कांहीं वाखाणण्याजोगें नव्हतें असें पंडितजी आपल्या आत्मचरित्रांत मोकळ्या मनानें लिहितात. पण हें लिहिणें कांहीं अंशीं खरें होतें तर कांहीं अंशीं तें वस्तुस्थितीला धरून नव्हतें. नेहरू घराणेंच एकप्रकारें आढ्यतेखोर आहे. तें कोणाचा केव्हां पाणउतारा करील ह्याचा नेम नाहीं. उच्च जीवन व्यतीत केल्यामुळें व जगांतील उत्तमांतील उत्तम वस्तु, सृष्टीचे मनोहर देखावे व बुद्धीचें अपार वैभव त्यांनीं पाहिल्यामुळें आतां त्यांना आश्चर्यकारक, कौतुकास्पद असें सहसा कांहीं वाटतच

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

नाहीं. लोकांनीं पुढें केलेल्या भेटी सामान्य म्हणून त्या एकीकडे सारतील. कोणी अमुक देखावा पाहाण्यास चला म्हटलें तर त्यांत काय पाहाण्यासारखें आहे असें ते चटकन् बोलून जातील. नेहरू मंडळींत उत्तर हिंदुस्थानांतील आदब व मोहक भाषण करण्याची लकब नाहींच. त्यांच्या मनांत येतें तें तीं बोलून जातात. त्यांच्या बोलण्यावरून त्यांच्या मनाची खरी परीक्षा होत नाहीं. फणसाच्या फळाप्रमाणें वरती कांटे पण आंत गोड रसाचे गरे अशी त्यांची स्थिति आहे. बडेजावीपणांत सत्यनिष्ठा दडलेली आहे. विलासी जीवनांत अविरत उद्योग करण्याची बुद्धि व सामर्थ्य आहे, सबांधवांशीं तुच्छतेची वागणूक ठेवीत असतां त्यांच्याकरितां आयुष्याचा होम करण्याची ह्या घराण्यानें तयारी दाखविलेली आहे. विलासी असून उद्योगी, घमेंडखोर असून प्रेमळ, वैभवशाली असून त्यागी अशा भिन्न भिन्न गुणांनीं अधिष्ठित असें नेहरू घराणें आहे. आपली बुद्धि, शक्ति व संपत्ति विलायतेहून आल्यावरच पंडित जवाहरलाल ह्यांनीं राष्ट्रसेवेस अर्पण केली तेव्हां उत्तम गुणांचा संग्रह करूनच ते इंग्लंडच्या वातावरणांतून आले होते ह्यांत संशय नाहीं.

## प्रकरण पांचवें

# तगमग

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

विलायतेंत सात वर्षें घालवून तारुण्याच्या ऐन उमेदींत पं. जवाहरलाल हिंदुस्थानांत परत आले. कांहीं महिने कुटुंबीय मंडळींत हौसेमौजेंत घालविल्यावर त्यांनीं आपला वडिलोपार्जित धंदा अलाहाबादेस सुरू केला. पं. मोतिलालजींप्रमाणेंच ते आपला धंदा मन लावून करीत असत. त्यामुळें त्यांची प्राप्तिही नांवजण्याजोगी जरी नसली तरी बरी होऊं लागली होती. पं. मोतिलालजींचें व्यक्तिमत्व, त्यांचें अनुभविक खोल ज्ञान व अफाट प्राप्ति ह्यांच्यापुढें मुलाचा उद्योग बराच फिका दिसे. नवीन वकिलाला जुन्याचें अनेकांगी वैभव एकदम कसें प्राप्त होणार ? बापाची सर मुलाला येणार नाहीं, मोतीलालजींचा रुबाबच न्यारा, अशी टीका लोकांत सुरू होऊं लागली नाहीं तोंच छोट्या पंडितजींचें लक्ष आपल्या धंद्या-

********************************************

वरून उडालें. त्यांना वकिलीचा धंदा आवडत होता, पण वकीलमंडळींच्या आयुष्य-क्रमाचा त्यांस लवकरच तिटकारा येऊं लागला. पुष्कळसे वकील डबल ग्रॅज्युएट होते, परंतु धंद्यांत बरी प्राप्ति होऊन संसाराचें गाडें सुरळित चालू लागल्यावर ही मंडळी आपला फुरसतीचा वेळ क्लबमध्यें बसून पत्ते कुटण्यांत अगर बिलीयर्ड खेळण्यांत घालवीत. त्यांच्या चर्चेचे विषय म्हणजे अधिकाऱ्यांच्या खाजगी आयुष्यांतील बारीकसारीक गोष्टी, अधिकाऱ्यांच्या नेमणुका गॅझेटमध्यें पाहून त्या ध्यानांत ठेवणें हीच त्यांची बौद्धिक करामत व चटोर कादंबऱ्यांचें वाचन हाच त्यांचा मोठा व्यासंग. पंडितजी त्या वेळीं तरुण होते, नव्या रक्तामुळें हिंदुस्थानांत प्रत्यहीं घडणाऱ्या जुलमाच्या वार्ता ऐकून ते अस्वस्थ होत. आपण पारतंत्र्यांत आहोंत म्हणून हा अपमान सहन करण्याचा प्रसंग पदोपदीं येतो. तरी हें पारतंत्र्य कसेंही करून झुगारून दिलेंच पाहिजे, असा निश्चय ते आपल्या मनाशीं करीत. पारतंत्र्य झुगारून द्यावयाचें म्हटलें तरी सुरुवात कशी करावयाची हाही विचार त्यांच्यापुढें दत्त म्हणून उभा राही. पं. मोतिलालजींचें उठणें बसणें नेमस्त मंडळींत, त्यामुळें नेमस्त राजकारणाकडे प्रथम त्यांचें चित्त वळलें. तेजस्वी तरुणाला तें निस्तेज राजकारण, सरकारी अधिकाऱ्यांचा कल पाहून वागण्याबोलण्याची तऱ्हा, कसची पसंत पडते? "आधीं करावें उदरंभरण। यथेष्ट मिळवावें धन। क्वचित बोलावें राजकारण। आचरूंच नये।" हा महामंत्र त्या काळच्या बहुतेक नेमस्त राजकीय पुढाऱ्यांना पाठ होता व त्याचेंच तें अनुष्ठान वर्षानुवर्षें करीत. सरकारी जुलमाबद्दल ह्या नेमस्तांना कमी राग येत होता असें नाहीं. सरकारी जुलूम, अरेरावी व अन्याय पाहून त्यांस राग यावा, मनांतल्या मनांत त्यांनीं खूप जळफळावें, आपल्या मित्रमंडळींच्या अड्ड्यांत बसून इंग्रजी भाषेचा अवलंब करून त्यांनीं आपला त्वेष व्यक्त करावा, फार फार तर सभा भरवून सरकारची अमुक अमुक गोष्ट आम्हांला पसंत नाहीं एवढें म्हटलें कीं मवाळ राजकारणाचें घोडें गंगेंत न्हालें. त्या वेळचे नेमस्त राजकीय पुढारी हल्लींच्या कर्तृत्ववान व पराक्रमी कॉंग्रेस नेत्यांपेक्षां मोठे रुबाबदार दिसत, त्यांचें वक्तृत्वही असाधारण असे. सभेमध्यें उभे राहून सरकारी राज्यपद्धतीवर ते टीका करूं लागले म्हणजे असा कांहीं आवेश दाखवीत कीं सरकारनें त्यांचें म्हणणें जर ऐकलें नाहीं तर उद्यां हे हातीं तरवार घेऊन उठणार. पण ह्या बाहेरील रुबाबांत व जोरदार भाषेंत त्यागवृत्तीचा लवलेश नसल्यामुळें हें सर्व बोलणें व डोलणें लवकरच फोल झालेलें दिसलें. अन्यायाचा प्रत्यक्ष प्रतिकार करण्याची त्यांच्यांत

*************************************************

ताकद नव्हती. बंड करण्याचे विचार त्यांच्या मनांत येत नसत असें नाहीं. पण ते दूरदर्शी असल्यामुळें पुढची अनर्थपरंपरा त्यांस दिसूं लागली. सरकारशीं दोन हात करावयाचे म्हणजे सर्व तऱ्हेची झीज सोसावयाचा प्रसंग आला असता. धंदा बुडवूनच्या बुडवून देहदंडही सोसावा लागला असता. पण हें सर्व करण्याला जी मनाची तीव्र भूमिका लागते, ती त्यांपैकीं कोणांतही दिसत नसे. पंडितजी आपल्याशींच म्हणत, " जर आपल्याला स्वातंत्र्य पाहिजे तर त्याकरितां पडेल ती किंमत नको का द्यायला ? " हा विचार मनांत येतांच त्यांच्या नजरेसमोर लो. टिळक येत. टिळकांनीं अन्यायाचा प्रतिकार करीत असतां अनेकदा देहदंड भोगला होता. तसेंच आपण केलें पाहिजे असेंही ते आपल्या मनाशीं म्हणत. कधीं कधीं बंगाली बंधूंप्रमाणें सशस्त्र क्रांतीचे विचारही त्यांच्या मनांत येऊन जात. अशा वेळीं देशाभिमानाची भावना खूप वर चढून देशस्वातंत्र्याकरितां आपलें कुटुंब, सौख्य, आरामशीर जीवन, फार काय सर्वस्वाचा होमही करण्यास ते मनानें तयार होत. देहदंडाची त्यांस क्षिति वाटत नव्हती. पण प्रश्न एवढाच होता कीं, जो त्याग आपण करणार, तो विचारपूर्वक व्हावा व देशकारणीं लावावा. पंडितजींचें वर्णन एके ठिकाणीं असे केलेलें आहे कीं, " A young man in hurry, " म्हणजे कोणतीही गोष्ट झटपट करून टाकण्याची ज्याला घाई झालेली आहे, असा तरुण पुरुष. हें वर्णन अगदीं यथार्थ आहे. पं. जवाहरलाल आपणाला नेहमींच धांदलींत दिसतात, स्वस्थता अशी त्या जीवाला माहितच नाहीं. भावनाप्रधान निधड्या छातीचा त्यागी पुरुष जर धांदल्या असला तर त्याच्या हातून अविचाराच्या गोष्टी घडल्यावांचून राहाणार नाहींत. पण पं. जवाहरलाल ह्यांच्या हातून अशा गोष्टी घडल्या नाहींत ह्याचें कारण ते कार्याला लागले म्हणजे तें पूर्ण करण्याची त्यांना जशी घाई सुटते तशी कार्यपद्धतीचा विचार करतांना कधींच सुटत नाहीं. आपलें धोरण आंखतांना ते त्या धोरणाचा अनेक अंगांनीं विचार करतात व नंतर पुढें पाऊल टाकतात. ह्यामुळेंच एकदां पुढें टाकलेलें पाऊल त्यांस मागें घेण्याचा प्रसंग येत नाहीं. वर सांगितल्याप्रमाणें हिंदुस्थान स्वतंत्र कसा करावा ह्या विचाराचें चक्र त्यांच्या मनांत सुरू झालें म्हणजे त्यांच्या जहाल विचारांना मित्रमंडळींत वाचा फुटे. पुढें पुढें त्यांच्या जहाल विचारांना परिणत स्वरूप जसजसें येऊं लागलें तसतसें ते आपले विचार आपल्या नेमस्त पण निश्चयी पित्यासमोर बोलून दाखविण्यास कचरेनासे झाले. नेमस्त राजकारणावर म्हणजे पर्यायानें आपल्याच पित्याच्या राजकीय नेमस्त धोरणावर

मुलगा टीका करूं लागला, म्हणजे तापट मोतिलालजी जहाल विचारांचा निषेध करीत. पुढें पुढें पितापुत्र सामान्य चर्चेच्या मर्यादा ओलांडून एकमेकांच्या विचारांवर प्रहार करूं लागले, म्हणजे बापाला वाटे हा कालचा मुलगा आपला अपमान करतो. वादाचा भर ओसरल्यावर पितृभक्त पुत्राला आपण वादाची मर्यादा ओलांडली असें वाटून पश्चात्ताप व्हावा. तरी पण कांहीं तरी प्रसंग निघून पुनः पुनः राजकारणावरून पितापुत्रांचे वाद सुरू होत. जेवणाच्या वेळीं वाद निघून त्याला तीव्र स्वरूप येऊं लागलें कीं स्वरूपाराणीनें थोडें रागानें दोघांना म्हणावें कीं, "तुमचें हें राजकारण बाहेरच्या दिवाणखान्यांतच ठेवा, येथें सुखानें जेवा कसें." मातेचें वचन ऐकून रागानें लाल झाले असतांनाही संयम करून छोटे पंडितजी आपल्याकडून चर्चा बंद करीत. पण मोतिलालजींचा तोंडाचा पट्टा तसाच चालू राही. प्रत्युत्तर न मिळाल्यामुळें अर्थातच वाद बंद पडे. कधीं कधीं पितापुत्र जोराजोरानें बोलूं लागले म्हणजे छोट्या बहिणीनें मध्येंच येऊन आपल्या भावाच्या तोंडावर हात ठेवावा व भांडूं नका असें आपल्या बोबड्या शब्दांत म्हणावें. तिची ती गोड कृति पाहून सर्वांनाच एकदम हसूं यावें व विवादाच्या ठिणग्या त्या मधुर आनंदाच्या दंवांत विझून जाव्या.

आपला मुलगा उद्धट बनत चालला आहे असें मनांत येऊन मोतिलालजींना राग येई. लाडक्या जवाहरकरितां ते वाटेल तें करण्यास तयार असत. पैशाची त्यांस दिक्कत नव्हती, पण पुत्रावर गाढ प्रेम असूनही त्यांचा मानी स्वभाव आपल्या मुलाकडून नेमस्त राजकारणाची हेटाळणी करून घेण्यास तयार नव्हता. पुष्कळ वेळां त्यांना असें भय वाटे कीं हा भावनाप्रधान मुलगा उतावीळपणानें क्रांतिकारकांच्या गटांत जाऊन जिवाचें बरें वाईट तर तो करून घेणार नाहीं ना? मुलाची समजूत कशी पाडावी अशा अडचणींत ते सांपडले म्हणजे त्यांनीं आपल्या पत्नीला म्हणावें, "हें पाहा आपले चिरंजीव, जरा वाहवत चालले आहेत. त्याला दोन शब्द सांगून ताळ्यावर आणा. मजपेक्षां तुमच्याशींच तो मनमोकळेपणानें बोलतो. आईचे शब्द मुलगा खात्रीनें ऐकेल." सर्व बाबतींत वरचढपणा गाजविण्याची संवय असलेले आपले पतिराज हताश होऊन आपल्याकडे आलेले पाहून स्वरूपाराणींना क्षणभर सात्विक अहंकार उत्पन्न व्हावा व त्यांनीं मनांत म्हणावें, "जेथें पिता हात टेकतो तेथें मातेचा अधिकार चालतो." पतीला उपदेश करण्याची ही कधीं न मिळणारी संधि साधून स्वरूपाराणी म्हणत,

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

" तुम्ही किनै मुलाशीं थोडें प्रेमानें घेत नाहीं. जेथें तेथें आपलाच हेका चालवितां. ह्या अल्लड वयांत मुलें थोडींशीं अशींच वागतात. तुम्हीं काय आपल्या वडील बंधूंशीं भांडायला कमी केलेंत ? माझा जवाहर मानी असला तरी मोठा प्रेमळ व हळव्या मनाचा आहे. उठल्यासुटल्या तरुणांना शिव्या देऊन कसें भागेल ? त्यांनाही कांहीं मान असतोच." आपण जेथें हात टेकले तेथें आईच यशस्वी होईल हें मानवी स्वभावाची उत्तम पारख असलेले मोतिलालजी जाणून होते. म्हणून पत्नीचें कधीं न चालू देणारे मोतिलालजी, अशा वेळीं तिचे शब्द निमूटपणें ऐकून घेत. नवविचारांनीं डोक्यांत कल्लोळ उठविल्यामुळें कावराबावरा झालेल्या आपल्या पुत्राकडे आईनें यावें व म्हणावें, 'देख जवाहर, मला तुमचें राजकारण कळत नाहीं पण तूं आपल्या पित्याचा अपमान अलिकडे करतोस तें मला आवडत नाहीं. अरे, ते तुझ्यापेक्षां कितीतरी मोठे आहेत ह्याची जाणीव ठेव." हे मातेचे शब्द ऐकतांच जवाहरलाल सद्गदित होऊन म्हणत, " मा, दादाजींची योग्यता मी पुरी पुरी जाणत नाहीं का ? मला माझे वडील हे शक्ति, बुद्धि व कर्तबगारी ह्यांचे आदर्श वाटतात. पण मी काय करूं ? देशाची खराब हालत मला सहन होत नाहीं. ह्या नेमस्तांनीं हिंदुस्थानला काय स्वतंत्र करावें ! हिंदुस्थान स्वतंत्र नाहीं, तोंपर्यंत हें **आनंदभवन** मला दुःखभवन वाटतें आहे. दादाजी जर मनांत आणतील, तर इंग्रजांशीं जोराचा सामना देऊन आपल्या देशाला आझाद करतील. मी त्यांचा अपमान कसा करीन ? त्यांनीं नेमस्त पक्ष सोडावा व जहाल राजकारणांत भाग घ्यावा, म्हणून मी इतकें तीव्रतेनें बोलतों. त्यांत जर कमीजास्त शब्द निघून गेला, तर तूं मला क्षमा केली पाहिजे. माझें अंतःकरण तुला माहीत आहे." असें म्हणून पंडितजींनीं सजल नेत्रांनीं मातेकडे पाहावें व त्या प्रेमळ माउलीनें आपल्या पदरानें त्यांचे डोळे पुसून म्हणावें, " सर्व कांहीं ठीक होईल. परमेश्वरावर भरंवसा ठेव, तोच तुझें डोकें ठिकाणावर आणील."

आपल्या सुसंगत विचारसरणीला कांहीं तरी उत्तर दिलेलें पाहून व 'परमेश्वरावर भरंवसा ठेव' हे तिच्या तोंडचे शब्द ऐकून जवाहरलाल थोडें कुत्सितपणें मृदुस्मित करीत व तें पाहून ती श्रद्धावान् माऊली म्हणे, " तुम्ही आज हसा, पण एक वेळ मजप्रमाणें परमेश्वरावर भरंवसा ठेवून त्याची करुणा भाकाल."

अशा ह्या तगमगीच्या काळांतच पंडितजींचा विवाह दिल्लीस झाला. एखाद्या संस्थानिकाकडे लग्न निघालें आहे असा थाट आपल्या लाडक्या व एकुलत्या

**************************************************
एक पुत्राच्या लग्नांत पं. मोतिलालजींनीं ठेविला होता. रूप, विद्या, गुणसंपन्न वराला सर्व प्रकारें अनुरूप अशीच पत्नी मिळाली. विवाहानंतर वधूवरांनीं हिंदुस्थानचें नंदनवन जें काश्मीर त्या प्रदेशांत कांहीं काळ घालविला. पंडितजी आपल्या आत्मचरित्रांत लिहितात कीं, "हा काळ माझा फारच सुखाचा गेला. काश्मिरांत जाण्याचा मोह मला अजूनही होतो." अनुरूप तरुण भार्येच्या प्रथम सहवासाच्या कालांत पुरुषाचें ध्येय दृष्टिआड होऊन प्रथम वयांत केलेलें मनोरथ मन्मथशरांनीं पुष्कळांचे ढासळून पडतात. अशा कठिण प्रसंगांत आपली मान उंच राखून आपलें ध्येय दृष्टिआड होऊं न देणारे जवाहरलाल-सारखे थोडेच पुरुष. विवाह होतांच पतीला आपल्या पूर्ण अंकित करून टाकण्याची सामान्य बायकांची कोण खटपट चालते. मग कमलेनें आपल्या पतीला सर्वस्वी अंकित करून घेण्याची महत्त्वाकांक्षा धरली असल्यास नवल काय ? कमलादेवींना लवकरच आढळून आलें कीं, आपला पती आपल्याबरोबर हसतो, खेळतो, आपली सेवा करण्यास सदैव तत्पर असतो, तरी त्याचें खरें चित्त कोठें तरी दुसरीकडेच गुंतलेलें आहे. प्रथम तिला नेहमींचाच संशय येऊन तिचें मानी मन मत्सरग्रस्त व्हावें. पण पुढें पुढें जसजसा अधिक परिचय होत गेला, तसतसें तिच्या ध्यानांत येऊं लागलें कीं आपल्या पतीनें देशसेवा नांवाची एक स्त्री अगोदरच वरलेली आहे व तिजवरच त्याचें खरें प्रेम आहे. प्रथम प्रथम पतीचे विचार कमलादेवींना पसंत पडतच असें नाहीं. पतीचे विचार आवडूं लागून त्यांत त्या ज्या समरस झाल्या, तो काळ अजून दूर होता.

अशा रीतीनें पं. जवाहरलालजींच्या हृदयाची कालवाकालव होत असतां बाहेर हिंदुस्थानांत काय घडत होतें व त्यांत ह्या मान्यवर पितापुत्रांनीं कोणता भाग उचलला तें आपण पुढील प्रकरणांत पाहूं.

## प्रकरण सहावें

# राजकारणांत प्रवेश

****************************

पंडित जवाहरलाल ह्यांचें वर्णन एका राजकारणी पुरुषानें, "Physical son and political father of Motilal" असें केलें आहे. त्याच्या म्हणण्याचा आशय असा कीं जवाहरलाल मोतिलालजींचे पुत्र असले तरी राजकीय जन्माचा विचार *केला तर मोतिलालजींच्या राजकीय परिवर्तनाला त्यांचा मुलगाच कारण* झालेला आहे. पं. जवाहरलाल वडिलांशीं नेहमीं विनयाची वागणूक ठेवीत. राजकीय चर्चा एखाद्या कमिटींत चालू असली म्हणजे बापापुढें हातपाय ताणून अगर खुर्चीवर रेलून ते बसत नसत. तासन्‌तास ते वडिलांच्या खुर्चीजवळ विनयानें उभे राहायचे. पण हा विनय रीतिभातिपुरताच दृष्टीस पडायचा. राजकीय धोरणाचा विचार एकदा सुरू झाला म्हणजे जवाहरलालसारखे स्पष्टवक्ते पुत्र जगांत फारच थोडे आढळतील. राजकारणांत प्रवेश केल्यापासून ह्या गुणी पुत्रानें आपल्या नेमस्त बापाला जहाल राजकारणांत ओढून त्याशीं त्यांना समरस करण्याचा फार मोठा प्रयत्न केला. पंडितजींची ही कर्तबगारी कांहीं सामान्य नव्हती. मोतिलालजींची मूळची वृत्ति अत्यंत व्यवहारी, त्यांत ती कायद्याच्या प्रांगणांत वावरलेली, आणि विलासीपणाकडे तिचा नेहमीं झुकता कल. ह्या तीन गोष्टी मोतिलालजींच्या ठिकाणीं एकत्रित झाल्यामुळें, जहाल राजकारणांत मोतिलालजी कधीं पडतील असें स्वप्न त्यांच्या निकटवर्ती स्नेही मंडळींना पडणें शक्य नव्हतें. पण कादंबऱ्यांत ज्या अद्भुत गोष्टी घडलेल्या दिसत नाहींत त्या मानवी व्यवहारांत घडलेल्या आढळून येतात. मोतिलालजींचें राजकीय परिवर्तन पाहाण्याजोगें होतें.

प्रथम तर ते कोणत्याच राजकारणांत पडत नव्हते. पुढें धंदा स्थिर झाला, ऐषआराम यथेच्छ भोगून झाला, विकारी तारुण्याचे दिवस ओसरून विचारशक्तीची वाढ झाली, त्यांतच कांहीं मित्रांच्या आग्रहानें, कांहीं जी प्रतिष्ठा त्यांना लाभली होती त्या प्रतिष्ठेच्या अनुषंगानें ते नेमस्त राजकारणांत प्रथम ओढले गेले.

महायुद्धाच्या काळीं स्वयंनिर्णयाचें तत्त्व पुढें येऊन त्यामुळें हिंदी लोकांच्या राजकीय आकांक्षा बऱ्याच वाढल्या. ह्या आकांक्षांना मूर्त स्वरूप देण्यासाठीं हिंदुस्थानांत त्या वेळीं दोन महान् व्यक्तींनीं एकच उद्देश नजरेसमोर ठेवून प्रचंड उद्योग केले. सुप्रसिद्ध ॲनी बिझंटबाई ह्या वेळेपावेतों धर्मकारण :व शिक्षण ह्यांतच काम करीत होत्या. ब्रिटिश साम्राज्याचा घटक राहून हिंदुस्थानला अंतर्गत राज्यकारभारांत पूर्ण स्वातंत्र्य दिलें पाहिजे अशा मताच्या त्या होत्या. म्हणून त्यांनीं ' इंडियन होमरूल लीग ' ह्या नांवाची संस्था काढून तिच्यामार्फत स्वराज्याची चळवळ देशांत सुरू केली. बिझंटबाई म्हणजे मूर्तिमंत चळवळ. कोणताही उद्योग त्यांनीं एकदा हातीं घेतला कीं त्या स्वतः क्षणाची विश्रांति घेत नसत किंवा अनुयायांना उसंत मिळूं देत नसत. इंग्रजी सुशिक्षितांवर त्यांच्या भाषणाची विलक्षण छाप पडे, ह्यामुळें नेमस्त राजकारणी पुरुष युरोपियन बाईच्या आश्रयामुळें थोडे धीट होऊन, होमरूल लीगचे भराभर सभासद झाले. पं. मोतिलालजींनीं आपलें नांव लवकरच बिझंट होमरूल लीगमध्यें दाखल केलें. बिझंटबाईचें लेखन तेजस्वी असलें तरी राजनिष्ठेच्या पावित्र्यावरून तिच्या सर्व हालचाली होत. ह्यामुळें नेमस्तांना बिझंटबाईच्या पक्षांत राहाणें सुरक्षित वाटे. तेजस्वी भाषा बोलण्याला त्या वेळीं नेमस्त अधीर झाले होते, पण त्यामुळें येणाऱ्या आपदा त्यांना नको होत्या. ह्या आंगचोर वृत्तीमुळेंच बिझंट होमरूल लीग त्यांनीं पसंत केली ह्यांत नवल नाहीं.

ह्याच वेळीं दक्षिणेंत लो. टिळकांनीं दुसरी एक होमरूल लीग काढून स्वराज्याचे दौरे सुरू केले. लो. टिळक म्हणजे सरकारचे कट्टे शत्रु म्हणून प्रसिद्ध असत. त्यांचें लेखन बिझंटबाईपेक्षां जास्त तीव्र होतें असें नाहीं. पण त्यांचें कार्य व विचार बहुजनसमाजापर्यंत जाऊन पोहोंचत, ह्यामुळें त्यांत पाहातां पाहातां तेज उत्पन्न होई व मग सरकार घाबरून जाई. लो. टिळक हे नेमस्त पुढाऱ्यांप्रमाणेंच कायदेपंडित होते. ह्यामुळें ते आपलीं भाषणें व लेख कायद्याच्या चाकोरीच्या बाहेर सहसा जाऊं देत नसत. पण ते पडले एका वेळीं स्वराज्य उपभोगिलेल्या मराठ्यांचे वंशज. त्यांच्या आजानेंच स्वराज्य पाहिलें होतें. तेव्हां ते जरी वसाहतीच्या स्वराज्याची भाषा बोलत, तरी लोक त्यांतून पूर्ण स्वातंत्र्याचाच बोध घेत. ही गोष्ट नेमस्तांना व सरकारला लागली. ह्यामुळें नेमस्त टिळकांपासून दूर दूर राहात. लो. टिळकांच्या काय किंवा बिझंटच्या काय होमरूल लीगचा उद्देश एकच होता. पण टिळकांच्या नांवानें चाललेल्या संस्थेबद्दल जी भीति

******************************************

नेमस्तांना वाटे, ती बिझंटबाईच्या संस्थेंत राहून वाटत नसे. अशा स्थितींत तरुण पंडित जवाहरलालनीं दोन्ही संस्थांत आपलें नांव दाखल केलें. ह्याचा अर्थ स्पष्ट झाला कीं स्वराज्य संपादन करतांना छोटे पंडित भीतीला धुडकावून लावणार.

बिझंटबाईचा पवित्रा राजनिष्ठेचा असला तरी तिच्या अविरत उद्योगामुळें तिचें कार्यतेज चढूं लागलें व नेमस्तही त्यामुळें उगाच फुरफुरूं लागले. ह्या नेमस्तांना भेडसाविण्यासाठीं सरकारनें बिझंटबाईना एकदम अटक केली आणि मग काय —

तदितर खग भेणें वेगळाले पळाले ।
उपवन-जल-केली जे कराया मिळाले ॥
स्वजन गवसला जो त्याजपाशीं न येतो ।
कठिण समय येतां, कोण कामास येतो ॥

लो. टिळकांचें राजकारण गैरमुत्सद्देगिरीचें व बिझंटबाईचें कार्य मनपसंत म्हणणारे नेमस्त, आपलीं नांवें बिझंट होमरूल लीगमधून भराभर काढून घेऊं लागले. ह्याच वेळीं पं. मोतिलालजी अंतःकरणानें मवाळ का जहाल ह्याचा निर्णय झाला. खात्री पटल्याशिवाय ह्यांचें हट्टी मन एखाद्या कार्यांत प्रथम पडत नसे. पण अंतस्थ झोंबाचा निकाल लागून पाऊल एकदा पुढें पडलें कीं तें ठाम. मग मागें फिरण्याची भाषा नाहीं. बिझंट प्रकरणापासून त्यांचें नेमस्त मित्रमंडळ एक एक पाऊल मागें पडूं लागलें व मोतीलालजी जहाल राजकारणाकडे अधिक अधिक झुकूं लागले, तों पंजाबच्या हत्याकांडाचें १९१९ साल उजाडलें आणि पूर्वीच्या पेशाशीं त्यांना निगडित करणारे संबंध सपकन तुटून गांधीजींनीं सुरू केलेल्या नव्या चळवळींत पं. जवाहरलालबरोबर त्यांनीं उडी घेतली.

महायुद्धानंतर देशांत स्वातंत्र्याची जी प्रचंड चळवळ सुरू झाली होती, ती नेस्तनाबूत करण्याकरितां लोकमताला न जुमानतां, नागरिकांच्या हक्कावर गदा आणणारा रौलट कायदा सरकारनें पास केला. ह्या कायद्यानें ज्याचा थोडा तरी संशय येईल त्याची उचलबांगडी करण्याचा अधिकार सरकारला मिळाला होता. त्याचप्रमाणें सरकारी कृत्यावर थोडी जरी टीका आली तरी मुद्रणस्वातंत्र्याची गळचेपी ह्या कायद्याप्रमाणें सरकारला करतां येत होती. शिवाय संघस्वातंत्र्य व भाषणस्वातंत्र्य लोकांना म्हणून ह्या कायद्यानें टेविलेंच नव्हतें. हा कायदा इतका

***********************************************

कडक होता कीं नेमस्तांतील नेमस्त पुढाऱ्यांवर सरकारची तोहमत यावयास विलंब लागता ना.

हा कायदा लोकमताला पायाखालीं तुडवून कौन्सिलमध्यें पास करून घेण्यांत आल्यावर सर्व देशभर प्रचंड चळवळ झाली व त्यांतच ठिकठिकाणीं दंगे झाले. हे दंगे थांबविण्याचें निमित्त करून जनतेला दहशत बसविण्याकरितां अमृतसरच्या जालियनवाला बागेमध्यें लोकांना फसवून नेऊन त्यांची नाहक कत्तल केली गेली. त्यामुळें लोकांचा क्षोभ अधिकच भडकला. सरकारबरोबरच कॉंग्रेसनें एक स्वतंत्र चौकशी कमिटी नेमली. त्यांत न्यायमूर्ति जयकर, पं. मोतिलाल, देशबन्धू दास, पं. जवाहरलाल व म. गांधी होते. ह्या चौकशींत सरकारच्या दुष्टपणाचें व जुलमाचें नागडें स्वरूप पं. मोतिलालजीप्रभृतींना प्रथमच दिसलें. मग काय, पं. मोतिलालजी चिडून गेले. जवाहरलाल अस्वस्थ झाले व महात्माजी पेटले. ' सरकारकडून घोर अन्याय झाला आहे, तेव्हां रिपोर्ट कडक करून सरकारजवळ अधिकांत अधिक मागण्या कराव्यात, " असें पं. मोतिलालजींचें म्हणणें पडलें. पण महात्माजी म्हणत, " आपली मागणी बेताची असावी. सर्व जगाला आपली मागणी रास्त वाटावी इतकी ती थोडी असावी. अशाही मागण्यांना सरकारकडून नकार मिळाला म्हणजे आपण करावयाची चळवळ मात्र मागणीच्या दसपट तीव्र असावी. तीव्रपणा मागणीपेक्षां कृतींत असावा. " ही म. गांधींची विचारसरणी पं. मोतिलालप्रभृतींना मुळींच पटली नाहीं. पण शेवटीं पुष्कळ खल झाल्यावर महात्माजींचें म्हणणें पं. मोतिलालजींनीं मान्य केलें व रिपोर्ट लिहिला गेला. ह्या वेळेपासून म. गांधीजींची छाप पितापुत्रावर दिवसेंदिवस अधिक पडत गेली.

## प्रकरण सातवें

# किसानांमध्यें परिभ्रमण

******** **********************

१९२० च्या मे महिन्यांत पंडितजींच्या मातोश्री व पत्नी कमलाबाई ह्या आजारी पडल्या. अलाहाबादेस मे महिना कडक उष्णतेचा असतो. अशा स्थितींत थंड हवेच्या ठिकाणीं जाऊन राहाण्याची श्रीमंतांची वहिवाट आहे. इकडे ज्याप्रमाणें महाबळेश्वर त्याप्रमाणें तिकडे मसूरी हें ठिकाण हिमालयाच्या मध्यभागीं असून अति थंड व वनश्रीच्या देखाव्यानें मोठें रम्य झालेलें आहे. नेहरू कुटुंब विश्रांतीसाठीं मसुरीला मधून मधून जाऊन राहात असे. ह्या वहिवाटीप्रमाणें पंडितजी मातोश्रीला व पत्नीला घेऊन तेथें गेले व सेव्हॉय नांवाच्या अति श्रीमंत हॉटेलमध्यें जाऊन उतरले. इकडील भागांत मोठमोठे अधिकारी, परराष्ट्रीय मंत्री, राजेरजवाडे ज्याप्रमाणें ताजमहाल हॉटेलमध्यें उतरतात, त्याप्रमाणें सामाजिक दर्जा ज्यांचा अतिशय उच्च समजला जातो व ज्यांची ऐपत रोजचे माणशीं २०।२५ रु. खर्च करण्याची असते असेच लोक सेव्हॉय हॉटेलमध्यें उतरत असत. नेहरू कुटुंब हॉटेलच्या एका विभागांत राहिलें होतें व दुसऱ्या विभागांत अफगाणिस्तानचे वकील येऊन उतरले होते. पोलिसांची नजर नेहरू कुटुंब व अफगाण वकील ह्यांच्यावर सारखी असे. त्यांना वाटे अफगाण वकील व कॉंग्रेसचे पुढारी कांहीं संगनमत करून ब्रिटिशांच्या विरुद्ध कट करतील, पण वस्तुस्थिति अशी होती कीं अफगाण वकिलांना नेहरू कुटुंब आपल्याच हॉटेलमध्यें उतरलें आहे ह्याची कल्पनाही नव्हती व पंडित जवाहरलालजींना अफगाण वकील आपल्यापासून चार हातांवर येऊन राहिले आहेत ह्याची दाद नव्हती. जो तो आपल्याच मंडळींत दंग असे. राजकारणावर तर राहूंच द्या, पण ज्यांचा नुसता नमस्कारचमत्कारसुद्धा झाला नाहीं ते रात्रीं अपरात्रीं एकत्र जमून ब्रिटिश साम्राज्याला सुरुंग लावण्याचा व्यूह रचीत असतील, ह्या नसत्या भीतीनें सरकारकडून असा हुकूम आला कीं, "आपण अफगाण वकिलातीशीं कांहीं संबंध ठेवणार नाहीं अशी लेखी हमी पंडित जवाहरलालनीं द्यावी." पंडितजींनीं उत्तर दिलें कीं "तशी हमी लिहून देण्याचें मला कारण दिसत नाहीं."

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

कायदेभंग करून मसूरीलाच राहाण्याचा हट्ट पंडितजींनीं न धरतां हुकुमांत लिहिल्याप्रमाणें ते मसूरी सोडून अलाहाबादला आले. आजारी आईला सोडून अलाहाबादला एकटेंच येणें पंडितजींच्या कितीतरी जिवावर आलें, पण मानहानी, लेखी हमी देऊन, पत्करण्यापेक्षां मातेला व पत्नीला सोडून जाणें त्यांना अधिक इष्ट वाटलें. वडिलांना ही गोष्ट कळतांच त्यांनीं संयुक्त प्रांताच्या गव्हर्नरना तावडतोब लिहिलें कीं, " असला मूर्खपणाचा हुकूम आपण सोडाल असें मला वाटत नाहीं. सिमल्याच्या कोणातरी फाजील, हुषार अधिकाऱ्याची ही शक्कल असावी. " गव्हर्नरचें तावडतोब उत्तर आलें कीं, " हुकूम कोणत्याही प्रकारें त्रासदायक नव्हता आणि लेखी हमी लिहून देण्यांत पंडित जवाहरलालची मानहानी झाली असती असेंही नाहीं. " वडिलांनीं प्रत्युत्तरांत आपला मतभेद व्यक्त केला व कळविलें कीं, " हुकूम जाणूनबुजून मोडण्याची इच्छा नाहीं, पण आईची अथवा पत्नीची प्रकृति बिघडली असेल तर हुकुमाची पर्वा न करतां मी मसुरीला गेल्यावांचून राहाणार नाहीं. " मोतिलालजींनीं असा खणखणीत जबाब लिहून, त्यांच्या पत्नीची प्रकृति थोड्याच दिवसांत जास्त बिघडली, तेव्हां हुकुमाची पर्वा न करितां ते जवाहरलालला घेऊन मसूरीला निघाले. पंडितजी घरांतून बाहेर पडतात तोंच हुकूम मागें घेतल्याची बातमी सरकारनें त्यांना कळविली. ' धिटाई खाई मिठाई ' हीच गोष्ट खरी.

पंडित जवाहरलालजींना आपल्या पित्याबद्दल विशेष आदर वाटे तो उगीच नाहीं. त्यांचें नेमस्त राजकारण भीतीच्या पोटीं निर्माण झालेलें नव्हतें. सरकारचे अन्यायी हुकूम धीटपणें मोडण्याचें सामर्थ्य व तेज मोतिलालजींमध्यें कसें होतें तें ह्या वेळीं चांगलेंच निदर्शनास आलें.

मसुरीहून सरकारी हुकुमानें पंडितजी अलाहाबादेस येऊन राहिल्यावर ते परत पुन्हा मसुरीला जाण्यास निघेपर्यंतचा काळ दोन महिन्यांचा होता. ह्या काळांत पंडितजींचा संबंध अचानकपणें संयुक्त प्रांतांतील शेतकरी समाजाशीं आला. ह्या काळांत ते किसान मंडळींत पुष्कळ फिरले, वावरले. ह्यामुळें शेतकरी जीवनाची व त्यांच्या हलाखीची त्यांना कल्पना येऊन शेतकरी चळवळीकडे त्यांचें चित्त इतकें आकर्षिलें गेलें कीं, सर्व कार्यापेक्षां किसानांच्या उद्धाराचा प्रश्न त्यांस अधिक महत्त्वाचा वाटूं लागला. १९२० च्या जून महिन्यांत संयुक्त प्रांतांतील प्रतापगडच्या अगदीं आंतल्या भागांतून २०० किसान ५० मैलांची

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

वाट तुडवीत अलाहाबादेस आले. तेथील प्रमुख राजकीय पुढाऱ्यांची गांठ घेऊन आपली दु:खद कहाणी त्यांस सांगावी असा त्यांचा उद्देश होता. पंडितजींना ही बातमी कळतांच त्यांना भेटण्याकरितां चार मित्र बरोबर घेऊन ते यमुनेच्या घाटावर गेले. तालुकदाराकडून होणारी अतिरिक्त पिळवणूक व अमानुष छळ वगैरेसंबंधीं आपलीं गाऱ्हाणीं किसान मंडळींच्या पुढाऱ्यांनीं पंडितजींना सांगितलीं. “ आमच्या संगतीं चला, विचारपूस प्रत्यक्ष करा, आम्ही येथें गाऱ्हाणीं सांगण्यास आलों म्हणून तालुकदार आमचा सूड घेतील, त्यापासून आम्हांला वांचवा ” असेंही त्यांनीं पंडित नेहरूंना विनविलें. येत नाहीं असें म्हणण्याची ह्या मंडळींनीं सोयच ठेविली नाहीं. किसान मंडळींनीं गराडा देऊन पंडित जवाहरलालना खरोखरीच घट्ट धरून ठेविलें.

पंडित जवाहरलाल म्हणतात, “ तीन दिवस मी खेड्यांत राहिलों. नंतर अलाहाबादेस परतलों. ह्या दिवसांत मी खूप हिंडलों, शेतकऱ्यांबरोबर जेवलों, खाल्लों, मातीच्या खोपटांत त्यांच्याबरोबर बसलों उठलों, प्रहरचे प्रहर त्यांच्याबरोबर चर्चा केली, लहानमोठ्या सभांतून पुष्कळ व्याख्यानें दिलीं. उन्हामुळें अंग भाजून निघे, डोळ्यांपुढें अंधेरी येई. डोळ्यांना लहानसा टॉवेल गुंडाळून रखरखीत उन्हांतून सर्व दिवस मला भटकावें लागे. कोणत्याही तऱ्हेचा फारसा त्रास न होतां कडक उन्हाळा आपल्याला सहन करतां येतो व त्यामुळें काम सुकर होतें हें पाहून मला आनंद वाटे. अलाहाबादेस आल्यावर आपला काळवंडलेला चेहरा आरशांत पाहिल्यावर मला आनंदच वाटला. ”

ही मंडळी किसानांत गेली त्या वेळीं कांहीं वरदान घेऊन हे लोक आले आहेत, असें शेतकऱ्यांस वाटलें. त्यांच्या दारिद्र्याकडे व दु:खाकडे पाहिलें कीं पंडितजींचें मन दु:खानें व लज्जेनें भरून जाई. नग्न, उपाशी, पिळलेल्या व गांजलेल्या हिंदुस्थानचें चित्र नव्यानेंच पंडितजींच्या समोर उभें राहिलें व आपल्यावर ह्या लोकांची श्रद्धा पाहून मनाला एका नव्या जबाबदारीची त्यांना जाणीव झाली. सर्व दिवसभर राबून किसान जें पिकवील तें त्यांच्यापाशीं राहात नसे. श्रमाचें त्यांना मिळणारें फळ म्हणजे लाथाबुक्क्या, शिवीगाळ व वीतभर खोल गेलेलें पोट.

प्रतापगडच्या टापूंत पंडितजींच्या आगमनानें चैतन्याचें वारें एकदम संचारलें. विद्युत्प्रवाह तारांमधून सोडल्यावर ठिकठिकाणचे दिवे ज्याप्रमाणें लागतात

सभोवतालच्या प्रदेश एकदम प्रकाशित करतात, त्याप्रमाणें पंडितजींचें आगमन हजारों अंतःकरणांना उज्वलित करण्यास कारणीभूत झालें. खेडोपाडीं लोकांची विलक्षण लगबग सुरू झाली. थोडी सूचना दिली कीं पुरे, लोकांचे थवेच्या थवे व्याख्यानाकरितां जमत. एक खेडें दुसऱ्याला, दुसरें तिसऱ्याला वर्दी देई व सर्व माणसें खेड्याबाहेर पडत व सभास्थानाकडे स्त्रीपुरुषांची रीघ लागे. त्यांतून तांतडीची सभा असली म्हणजे 'सीताराम' अशी आरोळी दिली कीं सर्व दिशांना ती निनादत जाई व खेड्यांतून तिला प्रत्युत्तर मिळून लोक धावतच सभेस येत. स्त्रीपुरुषांच्या अंगावर लक्तरें असलीं तरी त्यांच्या चेहऱ्यावर उत्साहाच्या लहरी उमटलेल्या दिसत व कांहींतरी चमत्कार घडून येणार असून त्यांचीं दुःखें नष्ट होणार आहेत अशी आशा त्यांच्या डोळ्यांत चमकत राही.

हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांच्या हालांचें नागडें स्वरूप आजपर्यंत दिसलें आहे पुष्कळांना, पण त्याचा परिणाम होऊन पोटांत आग व मस्तकांत कळ उठली काय ती गांधीजी, जवाहरलाल, टिळक अशांसारख्या मोजक्या लोकांच्याच. समाजांत सत्ता, श्रीमंती व विद्या जेथें एकत्रित नांदते तेथें लोककल्याणकारक बुद्धिही वसते, अशी समजूत अज्ञ गरीब जनतेची असते. म्हणून ते ह्या श्रीमंत सत्ताधाऱ्यांना आपले पुढारी, मार्गदर्शक, उद्धारक व देवदूत समजतात. परंतु जेवढें चकाकतें तेवढें सोनें नव्हे ही म्हण प्रत्ययास येऊन त्या गरीब बिचाऱ्यांची निराशाच होते. पंडित जवाहरलाल जेव्हां किसानांत गेले तेव्हां किसानांना देवदूतच आपल्यांत आला असें वाटलें. ती विद्या, तें ऐश्वर्य, तें राजबिंडें शरीर पाहून पुनश्च श्रीकृष्ण आपणांत अवतरला म्हणून ते हर्षभरित झाले. कृष्णाप्रमाणें ते किसानांच्या झोपडींत राहात, भाकर तुकडा जो मिळे तो त्यांच्यांत बसून आनंदानें भक्षण करीत, मोटार टाकून देऊन आड-रस्त्यांत डोक्याला फडकें बांधून उन्हातान्हांतून त्यांच्याबरोबर हिंडत व रात्रीं एखाद्या गरीब शेतकऱ्याच्या झोंपडींत त्याचीच घोंगडी अंथरायला घेऊन झोपत. हें सर्व जेव्हां किसानांनीं पाहिलें तेव्हां त्यांच्या डोळ्यांत आशेचे किरण चमकले असल्यास नवल काय !

समाजांत विद्या व वैभव ज्यांना प्राप्त झालें आहे त्यांच्यावर पुढारीपणाची जबाबदारी नकळत व पुष्कळदा अनिच्छेनें येते, पण आपली पुढारीपणाची

************************************************

जबाबदारी ओळखणारे पंडित जवाहरलालप्रमाणें फार थोडेच लोक आहेत. जनतेला जी कार्यस्फूर्ति मिळते ती त्यागी पण गरीब पुरुषापासून क्वचितच. समाजांतील वैभवशाली घराण्यांनीं त्याग केला म्हणजेच सामान्य लोक त्यापासून स्फूर्ति व बोध घेतात. नेहरू घराण्याचा लौकिक, विद्या व वैभव आणि समाजांतील वजन सर्व हिंदुस्थानभर पसरलेला आहे. ह्यामुळेंच त्यांच्या प्रत्येक त्यागाच्या गोष्टीला राष्ट्रोन्नतीच्या दृष्टीनें फार महत्त्व आहे. हें पंडित जवाहरलाल ह्यांनीं ओळखून व त्याप्रमाणें आपलें वर्तन ठेवून हिंदुस्थानांत जागृति उत्पन्न केली आहे. आपली योग्यता, समाजांतील स्थान हें बरोबर ओळखून जवाहरलाल वागत असल्यामुळें ते नांवाप्रमाणें खरोखरच पंडित ह्या पदवीस शोभत आहेत.

## प्रकरण आठवें

# असहकारिता

*****************************

अमृतसर येथें जालियनवाला बागेंत ब्रिटिश सरकारच्या सैन्यानें हिंदी प्रजेची १९१९ सालीं जी अमानुष कत्तल केली त्यामुळें हिंदी पुढाऱ्यांचा ब्रिटिश राजनीतीवरील विश्वास उडाला. पण ह्या अन्यायाचें परिमार्जन होत नाहीं तोंपर्यंत आपण स्वस्थ बसतां कामा नये अशी आंच लागली फक्त गांधीजींनाच. इतर मंडळींना राग पुष्कळ आला, ते मनाशीं तडफडले, पण आपल्या दुबळेपणाची जाणीव होऊन ते गप्प बसण्याच्या बेतांत होते. पंजाब हत्याकांडाच्या रिपोर्टांत इतरांपेक्षां सौम्य भाषा वापरण्याचा व किमान मागणी करण्याचा हट्ट धरणारे महात्मा गांधी हे आचरण करण्याचे वेळीं इतके गरम झाले कीं ज्वलत्जहाल भाषणें करणारे वक्तेही त्यांच्या भाषणानें व कार्यक्रमानें भेदरून गेले. ह्या वेळीं जवाहरलालजी पुढारीपणानें राजकारणांत मिरवत नव्हते. पंजाब प्रकरणाची चौकशी करण्यास कॉंग्रेसनें जी एक कमिटी नेमली होती त्या कमिटीवर देशबंधु दास ह्यांचे चिटणीस म्हणून ते काम करीत होते.

सरकारनें पंजाबांत हिंदी प्रजेची जी अकारण कत्तल करून त्याबद्दल यत्किंचितही पश्चात्ताप दाखविण्याचें जेव्हां नाकारलें, तेव्हां ब्रिटिश सरकारला

************************************************************

गांधीजींनीं सैतानी सरकार म्हणून संबोधलें. सैतानाशीं सहकारानें वागणें पाप, म्हणून हिंदी राष्ट्रानें ह्यापुढें सरकारशीं असहकार करावा, असा गांधीजींनीं कॅांग्रेसमध्यें आग्रह धरला. हा असहकार कौन्सिलें, कोर्टें व शाळा ह्या तीन ठिकाणीं सरकारच्या इज्जतीच्या जागा म्हणून—करायचा होता. ह्या कार्यक्रमाला हिंदी पुढाऱ्यांची संमति हवी तशी मिळेना. देशबंधु दास म्हणत, "कौन्सिल ही लढण्याची जागा आहे. तेव्हां ती माऱ्याची जागा आपण काबीज करून कौन्सिलें ओस पाडूं." ह्यावर महात्माजी म्हणत, "बहिष्काराची चळवळ खेड्याला जशी समजेल तशी निवडून जाऊन कौन्सिलें ओस पाडण्याची चळवळःत्यांना कळणार नाहीं." हिंदी पुढाऱ्यांना महात्माजींचा कार्यक्रम जरी पटत नव्हता, रुचत नव्हता, तरी बहुजनसमाजाला तो आवडत असल्यामुळें नागपूरच्या कॅांग्रेसमध्यें पुढाऱ्यांचा पाठिंबा जनतेबरोबर महात्मा गांधींना मिळाला.

कोर्टांचा बहिष्कार, हा दास-नेहरूंसारख्या मोठ्या वैभवशाली वकिलांना विचार करण्याचाच प्रश्न होता. त्यांच्या जीवनांत ह्या बहिष्कारानें क्रांति होणार होती. नेहरूंची प्राप्ति ह्या वेळीं मासिक तीस-चाळीस हजार असे. एवढ्या प्राप्तीवर पाणी एकदम सोडायचें म्हणजे त्यांच्या सरदारी राहाणीला आळा आलाच. आजपर्यंत लागलेली चैनीची संवय साठाव्या वर्षी टाकून देणें किती कठिण गोष्ट होती बरें! पण राष्ट्राच्या हितार्थ त्यांनीं तेंही करायचें ठरविलें. सुप्रसिद्ध श्रीमंत घराण्यांचें उत्पन्न कमी झालें तरी खर्चाला आळा घालणें कठिण जात असतें. लागलेल्या संवयी एकदम सुटत नसतात व घेतलेल्या जबाबदाऱ्या मानी स्वभावामुळें एकदम टाकतां येत नाहींत. राजकारणांत पडल्यामुळें अखिल हिंदुस्थानांत प्रसिद्धि होऊन पाहुण्यांची रीघ कमी न होतां वाढत असते, प्रवास व टपाल ह्यांच्या खर्चाला सुमार राहात नाहीं. नांव ऐकून देणग्या मागायला अनेक संस्था व व्यक्ति येत असतातच. शिवाय तडी तापसी संन्यासी भंडावून सोडतात तें वेगळेंच. अशा ह्या स्थितीला त्यागवृत्तीच्या जोरावर पितापुत्रांनीं तोंड द्यावयाचें ठरविलें.

म. गांधींच्या सहवासामुळें वैभवशाली नेहरू कुटुंब चारुदत्ताप्रमाणें गरीब झालेलें पाहून एकानें गमतीनें म्हटलें कीं, "वैराग्याला मिठी मारली तर अंगाला राखच लागायची." तसेंच झालें. पंडितजींनीं स्वतःची मोटार लवकरच काढून टाकली. बंगल्याभोवतालच्या बगीचाचें वैभव जाऊन पुष्पकरंडकांचें

**********************************************

जीर्णोद्यान बनूं लागलें. इतरही खर्च हळूहळू आटोक्यांत आणावे लागले. पण पितापुत्रांनीं ह्या नव्या परिस्थितींत आनंदच मानला. पं. मोतिलालजींना हें नवें जीवन व नवी राहाणी जाचली नाहीं असें नाहीं. पण ह्या वेळीं ते मनाशीं म्हणत, "देहा दुःख होतां, देह रडे रडो । राष्ट्रभक्ति घडो निश्चयो हा ।। मना दुःख होतां, मन रडे रडो । देशसेवा घडो निश्चयो हा ।।" वृद्ध पंडितांची अशी जरी स्थिति होती तरी नव्या दमाचे व साध्या राहाणीचे हौशी जवाहरलाल नव्या परिस्थितींत आनंदच मानीत.

असहकारिता म्हणजे हायकोर्टांत न जाणें, एवढेंच निष्क्रिय कार्य ह्या मंडळीपुढें नव्हतें. कॅांग्रेसचा कार्यक्रम लोकांना समजावून देण्याकरितां, समाजाच्या तळापर्यंत जाऊन पोहोंचण्यासाठीं लहनथोर पुढाऱ्यांना त्या वेळीं प्रचंड चळवळ करावी लागली व ती करीत असतां सरकारशीं झुंज ओघानेंच आली. ही झुंज खेळत असतां पं. जवाहरलालजींना तुरुंगवासाची परंपरा अनुभवावी लागली. १९१९ सालीं रौलट ॲक्ट, लोकमत बेगुमानपणें पायाखालीं तुडवून सरकारनें पास केला म्हणून म. गांधींनीं त्याला तोंड देण्यासाठीं सत्याग्रह सभा स्थापन करून कांहीं ठराविक कायदे मोडण्याचें ठरविलें. जुलमी सरकारच्या अमानुष कृत्यांना तोंड देण्याचा परिणामकारक मार्ग पंडित जवाहरलालजींना आतांपर्यंत सापडलेला नव्हता. तो सत्याग्रह सभेच्या घोषणेनें सापडून त्यांना कल्पनातीत हर्ष झाला. युद्धप्रिय जवाहरलालजींनीं सत्याग्रह सभेंत नांव नोंदविण्याचें ठरविलें. सत्याग्रह सभेंत नांव नोंदविणें म्हणजे एखाद्या जॉली टेनिस क्लबांत नांव घालणें नव्हतें. तें एक सतीचें वाणच घेणें होतें. सत्याग्रह सभेंत नांव देणें ह्याचा अर्थ उघड होता कीं छोटे पंडितजी कोणता तरी कायदा मोडून तुरुंगवास पत्करणार. आपल्या स्वतःच्या उत्साहाच्या वृत्तींत दंग असतां पं. जवाहरलालजींना ही गोष्ट सोपी वाटली. केवळ स्वर्गद्वार आपणाला उघडें झालें असें वाटलें पण ते जेव्हां नांव नोंदविण्याच्या मार्गानें पुढें सरकूं लागले त्या वेळीं मायेच्या जबर पाशानें आपण 'गलिव्हर' प्रमाणें जखडले गेलों असून हालचाल करण्यास असमर्थ आहोंत असा त्यांस प्रत्यय आला. वाचकहो, आजच्या काळाचा विचार करूं नका. आज तुरुंगवासाचें भय कोणालाही विशेषसें राहिलेलें नाहीं. आपण १९२१ सालच्या काळाचा विचार करीत आहोंत. त्या वेळीं तुरुंगवासाचा अनुभव फारच थोड्यांना होता. श्रीमंत घराण्यांना तुरुंग म्हणजे प्रत्यक्ष मृत्यूची खाईच वाटे. अशा काळांत अत्यंत लाडांत वाढलेला

**************************************************

एकुलता एक मुलगा मातेचा जीव कीं प्राण, घराण्याचा तेजस्वी कुलदीपक तुरुंगांत जाण्यास तयार होणें, म्हणजे नेहरू घराण्यांत केवढा हलकल्लोळ माजणार होता — मोतिलालजींना वृद्धपणांत तो एक विजेचा जबरदस्त धक्का होता — स्वरूपाराणीचें काळीज चिरलें जाणार होतें — कोमलांगी कमलेचें हृदय दुभंग होणार होतें — रामचंद्राचा वनवासाचा निश्चय ऐकून जी दुःखछाया सूर्यवंशांत पसरली तीच गत आज दशरथाच्या वाड्याशीं स्पर्धा करणाऱ्या आनंदभवनांत झाली. जवाहरलाल अशा प्रसंगीं कोणाचेंच ऐकून माघार घेणार नाहींत हें उघडच होतें. त्यांना धाक काय तो वडिलांचा. जवाहरलालजींनीं आपलें तोंड चुकविण्याचा सारखा प्रयत्न करावा. जेवणाला वडिलांबरोबर येऊंच नये. आपली प्रेमळ माऊली व लाडकी पत्नी ह्या आपल्या अश्रूंनीं, मायेच्या बोलांनीं आपल्या हृदयाला विरघळविण्याचा प्रयत्न करतील म्हणून त्यांनीं घरांत थोडें तुसडेपणानें वागावें. झोपावयाला घरीं उशिरांच यावें किंवा लेखनाचें काम काढून त्यांत इतकें मग्न व्हावें कीं कमलादेवींना त्यांच्याशीं बोलणें काढण्याचा धीरच होऊं नये. सासूनें सुनेला हताश होऊन म्हणावें, " तूं त्याला कांहींच सांगत नाहींस असें कसें ? तुम्हीं एवढ्या शिकलेल्या मुली आणि नवरा तुमच्या हातांत नाहीं." ह्यावर त्या कमलेनें करुणस्वरानें म्हणावें, "मला बोलण्याची संधि तरी ते देतात का ? आपण वडीलपणाच्या नात्यानें कांहीं सांगून पाहावें." " होय, माझें ऐकायला बसला आहे ? अग साऱ्या मुलखाचा तो हट्टी. माझा त्याला कधींच धाक लागला नाहीं. वडिलांनाच काय तो थोडा वचकतो एवढेंच. बाकी त्यांनींही त्याला खूप लाडावून ठेविला आहे, " स्वरूपाराणींनीं सुनेला म्हणावें.

पुत्राच्या चिंतेंत अलीकडे काळ घालविणाऱ्या वृद्ध मोतिलालजींच्या कानांवर हा संवाद सहजगत्या पडला म्हणजे ते म्हणत, " जेथें बापाचें चालत नाहीं तेथें आईचें व त्यापेक्षांही बायकोचें चालतें, नाहीं का कमल ?" कमलादेवींनीं ह्या भाषणानें लाजून कांहींच उत्तर देऊं नये. पण 'दादाजी, तुम्हींच ह्यांतून कांहीं मार्ग काढा' अशा अर्थाच्या नजरेनें त्यांच्याकडे पाहावें. मग मोतिलालजी म्हणत, " तो गुजराथचा मांत्रिक आहे ना, त्यालाच आतां बोलावितों, म्हणजे त्यालाच हा हट्टी मुलगा बधला तर बधेल."

महात्माजींना लगेच तार गेली. पांडवांच्या हाकेसरशीं श्रीकृष्णाची जशी लगबग व्हावी तशी स्थिति गांधीजींची ह्या वेळीं झाली. कसाबसा एक शर्ट

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

अंगांत घालून व घाईघाईनें डोक्यावर गांधी टोपी ठेवून व हातीं खादीचा पंचा घेऊन अहमदाबादेहून गांधीजी निघाले ते थेट अलाहाबादेस आले. महात्माजी ज्या रात्रीं येणार होते ती रात्र पितापुत्रांनीं आपापल्या शयनमंदिरांत जागून काढली. सत्याग्रह सभेंत नांव दाखल करून तुरुंगवास पत्करण्याचा सल्ला महात्माजींनीं जर दिला तर माझ्या जवाहरची काय स्थिति होईल ह्याचा विचार करीत तो शुद्ध प्रेमळ पिता रात्र घालवीत होता. पलंगावरून उतरून त्यांनीं भूमीवर शयन केलेलें होतें. स्वरूपाराणीनें ही स्थिति जेव्हां पाहिली तेव्हां त्यांना केवढा तरी धक्का बसला. दशरथाप्रमाणें सात गाद्यांवर झोपणारा हा राजा आज जमिनीवर पडलेला पाहून त्यांना उठवून विचारलें, "आपण झोपेंत पलंगावरून पडलांत कीं काय, का झीट आली ?"

ह्यावर मोतिलालजी गंभीर आवाजांत म्हणाले, "नाहीं. मी सावध आहें. माझा जवाहर जर तुरुंगांत गेला तर त्याची स्थिति कशी होईल ह्याचा मी अनुभव घेत आहें." हें भाषण ऐकून स्वरूपाराणीच्या हृदयाचा बांध फुटावा व त्यांत मोतिलालजींचे अश्रू मिळून गंगायमुनांचा संगम व्हावा इतक्यांत गांधीजी आले. मोतिलालजींनीं त्यांच्याशीं पुष्कळ वाद केला. जवाहरलालजींनीं आपली बाजू जोरानें मांडली. एका बाजूला मोतिलालजी व दुसऱ्या बाजूला जवाहरलालजी आपापल्या प्रकारें गांधींजींना विनंति करीत आहेत. मध्यें गांधीजी स्थितप्रज्ञाच्या निश्चयानें पण श्रीकृष्णाच्या प्रेमळपणानें दोघांचें म्हणणें शांतपणें ऐकून घेत आहेत, दूरवर दारांत कोनाकोपऱ्यांत उभ्या राहून माहात्माजी काय निर्णय देतात ह्या गोष्टींकडे घरांतील स्त्रिया कांहींशा काळजीनें व कांहींशा उत्सुकतेनें पाहात आहेत असें चित्र जर कोणी रेखाटलें तर तें किती बरें आकर्षक होईल ?

दोघांचें म्हणणें ऐकून गांधीजींनीं निर्णय दिला कीं, जवाहरलालनें इतक्यांत सत्याग्रह सभेंत दाखल होऊं नये. विजेचे दिवे एकदम लागून शहरांत पसरलेला गडद अंधःकार क्षणांत नाहींसा होऊन जिकडे तिकडे प्रसन्नता पसरावी त्याप्रमाणें आज गांधीजींचा निर्णय ऐकून आनंदभवनांत जिकडे तिकडे चैतन्य खेळूं लागलें. गांधीजींना म्हातारीनें दुवा दिला. कमलेनें प्रसन्न वदन दाखविलें व मोतिलालजींनीं स्मित केलें. पण इकडे जवाहरलाल फुरंगटले. मागें महाराष्ट्रांत पटवर्धन घराण्यांत लहान मुलांना लढाईला नेतां येत नाहीं म्हणून वडील

***************************************************

मंडळींनीं सांगितलें कीं तीं जशीं धुसपुसत तशी स्थिति आज जवाहरलालजींची झाली. त्यांनीं चेहरा लाल केला. कपाळाला आंठ्या घातल्या, पुस्तकांची थोडी आदळआपट केली. तें पाहून त्यांच्या बहिणीनें 'एका माणसाची कशी झाली' म्हणून त्यांच्याकडे पाहून हसावें. आज गांधीजींनीं जवाहरलालनें सत्याग्रह सभेंत नांव नोंदवूं नये म्हणून जो सल्ला दिला तो केवळ मोतिलालजींच्या भिडेनें. पण त्याच वेळीं त्यांना हेंही दिसत होतें कीं, 'फळ पिकत आलें आहे, तेव्हां घाई कशाला करा ?' मोतिलालजींच्या कलानें महात्माजींनीं थोडें आज घेतलें, त्याचा परिणाम त्या मान्यवर देशभक्तावर चांगलाच झाला. ह्यापुढें नेहरू घराण्याचीं पावलें देहदंडाच्या मार्गानें भराभर पुढें पडत गेलीं व त्यांत पितापुत्र, मायलेकी, नणंदभावजया, सासू-सुना कोणीही मागें राहिलीं नाहींत. ह्यामुळें जवाहरलालजींना सत्याग्रह सभेंत जाऊं न देण्याचा मोतिलालजींच्या प्रथमच्या हट्टाला यत्किंचितही कमीपणा आला नाहीं. उलट हा प्रसंग विविध भावनांच्या छटांनीं अधिकच खुलून दिसतो.

ह्या कालाचें वर्णन करतांना पंडितजी आपल्या आत्मचरित्रांत लिहितात, "१९२१ साल म्हणजे आमच्या दृष्टीनें अपूर्व असें होतें. राष्ट्राभिमान, राजकारण, धर्मभावना, कडवेपणा व अध्यात्मभाव ह्या सर्वांचें अपूर्व मिश्रण ह्या सालांत पाहावयास मिळालें. ह्या वेळीं आमच्या भावना जळजळीत पण मिश्र स्वरूपाच्या होत्या. कार्याच्या उन्मादाची पकड आमच्या मनावर घट्ट बसलेली होती. जनतेंत उत्पन्न झालेली विलक्षण अशी स्वाभिमानाची वृत्ति पाहून आम्हांला आत्मविश्वास वाटूं लागला. मी चळवळींत समरस झालों होतों. इतर सर्व संबंध मीं सोडून दिलेले होते. आवडीचीं पुस्तकें, मित्र व पुष्कळशीं नित्य न लागणारीं वृत्तपत्रें ह्यांकडे मी पाहातसुद्धा नसे. पुस्तकांच्या साहाय्यानें जागतिक उलाढालीशीं संबंध ठेवण्याचा माझा पूर्वी क्रम होता, पण तो आतां बंद झाला. कचेरींत, बैठकींत, सभांतून माझा वेळ जाई. जनतेच्या भावनांशीं समरस होत असतां, जनमतावर प्रभाव गाजवीत असतां जो एक रोमांचकारी अनुभव येतो त्याची गोडी मला ह्या वेळीं लागली. शहरी जनता व शेतकरी ह्यांतील फरक ध्यानीं आला. सभेंतील धक्काबुक्की अंगवळणीं पडली."

असहकारितेच्या पहिल्या अमदानींत धरपकड सर्वत्र चालू होतीच, पण त्याला उग्र स्वरूप प्रिन्स ऑफ वेल्सच्या स्वागतावर बहिष्कार घालण्याचें ठरविलें त्या

वेळीं आलें. हिंदुस्थानचा बादशहा विलायतेंत राहातो, तेव्हां त्याचा परिचय हिंदी प्रजेस आयुष्यांत एकदा तरी यावा म्हणून व्हिक्टोरिया राणीनें युवराज एडवर्ड ह्यांना हिंदुस्थानांत पाठविलें होतें. एडवर्ड बादशाह झाल्यावर आपल्या जॉर्ज नांवाच्या पुत्रास १९०५ सालीं हिंदुस्थानांत रवाना करून त्यांनीं मातेचा कित्ता गिरविला होता. ह्या परंपरेस अनुसरून जॉर्ज बादशाहानें युवराज एडवर्डना १९२१ सालीं हिंदुस्थानांत पाठविण्याचें ठरविलें होतें. रौलट ॲक्ट व पंजाबचें हत्याकांड ह्या गोष्टींनीं हिंदी लोकांत जो असंतोष पसरला होता तो राजपुत्राच्या मधुर वाणीनें व सुखद दर्शनानें उपशमेल अशी भोळी समजूत जॉर्ज बादशाहा व त्यांचे मंत्रीं ह्यांनीं करून घेतली होती. कॅांग्रेसनें जाहीर केलें कीं, "ब्रिटिश सरकारचा व आमचा लढा चालू असतां राजपुत्राला मध्यें घालून ह्या लढ्याचा उपशम ब्रिटिश मुत्सद्दी करूं पाहातील तर युवराजाच्या स्वागतावरच आम्ही बहिष्कार घालून आमचा असंतोष व्यक्त केल्याशिवाय राहाणार नाहीं." ब्रिटिश मुत्सद्द्यांना हिंदी प्रक्षोभाची खरी कल्पनाच आली नाहीं. नाहींतर त्यांनीं युवराजांना हिंदुस्थानांत पाठविण्याचें धाडसच केलें नसतें. ब्रिटिश लोकांना कल्पना नव्हती एवढा हा बहिष्कार यशस्वी झाला. युवराजांनीं मोठमोठ्या शहरांना भेट द्यावी पण लष्करी शिपायांशिवाय कोणीच त्यांच्या स्वागतास जाऊं नये. जेथें जेथें युवराज जात तेथें तेथें कडकडीत हरताळ पडून मोठमोठ्या सुंदर शहरांना स्मशानाचें रूप प्राप्त होई. ब्रिटिश सत्तेचा केवढा हा अपमान! सरकार ह्यामुळें साहजिकच चिडलें. संयुक्त प्रांतांत स्वयंसेवक दल बेकायदेशीर म्हणून सरकारनें ठरवून दडपशाहीला सुरुवात केली. कॅांग्रेसनें ह्याला उत्तर म्हणून स्वयंसेवकांचीं नांवें प्रसिद्ध करण्याचा सपाटा चालविला व त्यांत थोरथोर पुढाऱ्यांनीं नांवें दाखल करून सरकारला आव्हान दिलें. ह्या यादीच्या अग्रभागीं पंडित मोतिलालजींचें नांव झळकत होतें. पेला कांठोकांठ भरला होता. प्रत्येक क्षणाला पकड वारंट येण्याची वाट आनंदभवनांत पाहिली जात होती. तोंच एक दिवस दुपारीं त्या मान्यवर पिता-पुत्रांच्या नांवांचीं 'वारंटें' घेऊन शिपायी आले व त्यांनीं आनंदभुवनाला गराडा दिला.

पंडित जवाहरलाल ह्या वेळीं कॅांग्रेस कचेरींत होते. कारकुनानें लगबगीनें येऊन त्यांना ही गोष्ट कळविली, पण जणूं काय ही मामुली गोष्ट समजून त्यांनीं आपलें काम प्रथम पुरें केलें व मग ते घरीं गेले. तुरुंगाचा ज्या वेळीं मुळींच

**************************************************

अनुभव नाहीं त्या वेळीं इतकी समता राखणारे लो. टिळकांच्या मागून नेहरूच दिसतात. पोलिस आले काय गेले काय, आम्हांला त्याचें कांहींच नाहीं, असें आपल्या मुद्रेनें दाखवून कारकुनाला आपल्या घरच्या किल्ल्या पंडितजींनीं दिल्या व फर्माविलें कीं, "घरीं जा व पोलिसांना कागदपत्राच्या खोल्या दाखवा." लिहीत असलेलें पत्र शांतपणें पुरें करून नंतर ते घरीं गेले. अपरिचित प्रसंग दत्त म्हणून उभा राहिला म्हणजे मनाची समता स्वाभाविकपणें ढळूं लागते, अशाच वेळीं थोर पुरुष ही पर्वणी समजून मन स्थिर ठेवण्याचा अभ्यास करीत असतात. पटाईत सायकलस्वार ज्याप्रमाणें गर्दींत अगर खडबडीत रस्त्यावरून गाडी नेत असतां सहज जाणारा तोल सावधानतेनें सांवरतो, त्याप्रमाणें धीरोदात्त पुरुष आपल्या मनाचा तोल सांभाळीत असतात. लो. टिळक म्हणत, "मजवर संकट कधीं येईल व माझी परीक्षा कशी उतरेल ह्याचा ध्यास लागला पाहिजे." ही परीक्षा दुसरी कसली नसून कोणत्याही संकटांत मनाची समता राखण्याचीच होय.

पोलिसांनीं घराची झडती पुष्कळ वेळ घेतली व नंतर अलाहाबादेच्या ह्या मान्यवर नेत्यांना अटक केली. दोघांनाही निरनिराळ्या आरोपांवरून शिक्षा झाल्या. प्रिन्स ऑफ वेल्सच्या स्वागतावर अलाहाबादेस बहिष्कार पडूं नये म्हणून सरकारनें बापलेकांवर खटले भरून दोघांना तुरुंगांत डांबून ठेविलें, पण ह्या कृत्यानें बहिष्कार अधिकच उग्र झाला व हें प्रकरण सरकारच्या अंगाशीं आलें. तुरुंगांत ह्या पितापुत्रांना एक खोली देण्यांत आली होती. बाहेर चळवळ जोरांत असली कीं, तुरुंगाचे नियम आपोआप ढिले होतात व बाहेर काम थंडावलें कीं केवढाही थोर पुढारी असला तरी त्याचें तुरुंगांतील जिणें कडक जेल कायद्यांमुळें अपमानाचें होऊन बसतें. तुरुंगांतील अन्न ह्या मंडळींना जरी बेचव वाटत होतें, तरी त्यांत घरच्या अन्नाची भर घालण्याची परवानगी ह्या विशेष वर्गीतील कैद्यांना असल्यामुळें अन्नाचा त्रास नेहरू मंडळींना झाला नाहीं. आप्तेष्टांच्या गांठीभेटी बऱ्याच वेळां व मनमोकळेपणें तुरुंगांत प्रथम घेतां येत, पण पुढें चळवळ थंडावल्यावर निरनिराळ्या बराकींतून हिंडण्याची परवानगी जी होती ती बंद झाली, भेटीही महिन्यांतून एकदांच मिळूं लागल्या. जवाहरलालजी सकाळीं लवकर उठून आपली कोठडी झाडून स्वच्छ करीत. नंतर वडिलांचे व आपले कपडे धूत. व्यायामासाठीं बराकीभोवतीं पळत. कधीं कधीं मोटा ओढीत व भाजीपाल्याला पाणी देत. सूतही खूप कातीत व निरक्षर कैद्यांना मधून मधून शिकवीत. बाहेर जोंपर्यंत वातावरण गरम होतें

तोंपर्यंत कैद्यांच्या उत्साहास भरती येई. रोज नवे कैदी आंत आले म्हणजे आपलें बळ वाढलें असें सत्याग्रहींस वाटे. पुढें चौरीचुरा प्रकरणामुळें गांधींनीं चळवळ मागें घेतली. ही बातमी ऐकतांच जिकडे तिकडे नैनी तुरुंगांत खिन्नता पसरली. राजकारणी कैदी गोंधळून गेले व पितापुत्र रागावले. अशा ह्या काळांत एकाएकीं हायकोर्टाच्या फेरतपासणींत जवाहरलालजींचा गुन्हा नाशाबित होऊन त्यांना एकाएकीं सोडून देण्यांत आलें.

ह्याच वेळीं म. गांधी ह्यांना अटक होऊन त्यांचा खटला अहमदाबादेस चालणार होता. सुटका होतांच जवाहरलाल गांधीजींना भेटण्यासाठीं साबरमतीस गेले. खटल्याच्या वेळीं ते तेथें हजर होते. ह्या प्रसंगासंबंधीं पंडितजी लिहितात "तो प्रसंग चिरस्मरणीय होता. गांधींनीं कोर्टाला उद्देशून केलेलें भाषण चित्ताला हलवून टाकणारें होतें. आम्ही परत फिरलों त्या वेळीं त्यांतील अर्थपूर्ण वाक्यें व ठसठशित कल्पनाशक्ति ह्यांचीं चित्रें आमच्या डोक्यांत तरळत होतीं."

अलाहाबादेस आल्यावर अनेक मित्र व सहकारी तुरुंगांत पडलेले पाहून पंडितजींना एकएकटें वाटूं लागलें व मनाला उल्हास वाटेना. पण कर्तव्य हें करायलाच हवें म्हणून कॉंग्रेस कमिट्या जेथें सुरळीत चालत नव्हत्या तेथें त्या त्यांनीं सुरू केल्या. नंतर परदेशी कपडा व माल ह्यांच्या बहिष्कारांत त्यांनीं लक्ष घातलें. अलाहाबादेच्या कापड व्यापाऱ्यांनीं परदेशी कापडाची आयात न करण्याचें अभिवचन दिलें, पण अनेक व्यापाऱ्यांनीं नियमाचा भंग केला. निषेध करून त्याला आळा बसेना म्हणून शेवटीं निरोधन करण्याचें ठरविलें. निरोधनाची कुणकुण लागतांच दंड भरला जाऊन पुन्हा आणभाक झाली व दंडाचे पैसे व्यापारी मंडळाकडे जमा झाले.

परदेशी कापडाचा बहिष्कार सरकारला नेहमींच जाचतो, कारण त्याचा परिणाम मँचेस्टरच्या गिरण्यांवर होऊन ब्रिटिश मिल मजूर उपाशी राहातो व त्याचा जाब भारतमंत्र्यांना पार्लमेंटमध्यें विचारण्यांत येतो. ह्या बहिष्काराच्या चळवळीमुळें अधिकारी संतापले व पंडितजींवर त्यांनीं खटला भरला व कोर्टानें त्यांना एक वर्ष नऊ महिन्यांची शिक्षा दिली. पहिल्या सुटकेनंतर हा प्रसंग सहा आठवड्यांतच आला.

***************************************

# दुसरा तुरुंगवास

पहिला तुरुंगवास अल्पकालाचा होता. बाहेर चळवळ जोरांत होती. सरकार सत्याग्रहाच्या नवीन चळवळीनें गोंधळांत पडलेलें होतें. ह्यामुळें तो बंदिवास सुखांतल्या दुःखाप्रमाणें मनाला न जाचणारा होता. परंतु दुसऱ्या तुरुंगवासाच्या वेळीं गांधीजींनीं चळवळ मागें घेतलेली होती व सरकार जोरांत होतें. लोकांचा उत्साह ओसरत होता व तुरुंगांतील नियम कडक होत होते. चार सहा महिन्यांची शिक्षा असली तर तो काल मनुष्याचा सहज निघून जातो. त्यापेक्षां वर्षांची शिक्षा कैद्याला जाचते. दोन वर्षांचा बंदिवास राजबंदींना निरस व कंटाळवाणा होतो. ए किंवा बी क्लासांतील कैद्याला बऱ्यापैकीं अन्न मिळतें हें ऐकून सुखांत गादीवर लोळणारे लोक कधींकधीं म्हणतात कीं, "मग कांहीं तुरुंग कठिण नाहीं." एका हायस्कूलचे प्रिन्सिपॉल आपल्या विद्यार्थ्यांना राजबंदीच्या जीवनाची टवाळी करण्याच्या उद्देशानें म्हणाले होते कीं, "आपल्याला जर असें अन्न मिळेल व वाचायला भरपूर सांपडेल तर तुरुंगवास आपण जन्मभर काढूं." हायस्कूलच्या व्यासपीठावर खुर्चीवर असल्या गप्पा मारावयला काय होतें ? जोंपर्यंत मनुष्यानें तुरुंगवासाचा अनुभव घेतला नाहीं तोंपर्यंत असलें बाष्कळपणाचें बोलणें परवडतें. पुढारी लोकांना बहुतकरून इतर कैद्यांपासून स्वतंत्र आवारांत ठेवीत असल्यामुळें त्यांच्या साध्या शिक्षेलाही एकांतवासाच्या कठिण शिक्षेचें स्वरूप येतें. तोच वॉचमन, तोच वॉर्डर नेहमीं जवळ असायचा, तेच तेच अधिकारी विचारपूस करण्यासाठीं येऊन सर्व प्रश्नांस नकार देऊन जायचे. राणीच्या बागेंत कोंडलेल्या वाघसिंहांस पाहावयास आपण ज्या बुद्धीनें जातों त्या बुद्धीनें बहुतेक बाहेरचे व्हिजिटर पुढारी-कैद्यांना पाहावयाला येत असतात. परदेशी कापडांनीं नटलेलीं त्यांचीं शरीरें व युरोपियन अधिकाऱ्यांच्या पुढें लाळ घोटणारीं त्यांचीं मनें पाहिलीं म्हणजे ह्या 'व्हिजिटर' रूपी मनुष्यप्राण्याचें दर्शन नको असें वाटावयास लागतें. सत्याग्रही कैदीच त्यांच्याकडे तुच्छतेनें पाहातात असें नाहीं, तर इतर गुन्हेगार बंदिवानही ह्या व्हिजिटरांकडे तिरस्कारानें बघत असतात, व "तुमची कांहीं अडचण आहे का ?" असा कांहीं प्रश्न त्यांनीं विचारल्यास "आमच्या अडचणी दूर करण्याचें तुमच्यांत सामर्थ्य तरी आहे का ?" असा उलट सवाल करतांना आढळतात. देशस्वातंत्र्याकरितां वाटेल ती गोष्ट मनुष्य सहन करायला तयार असला, तरी तेथील अन्न बेचव म्हणून खाल्लें जात नाहीं ही

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

गोष्ट खरीच आहे. अन्न सोडलें तरी लहानसान गोष्टींची खरी किंमत मनुष्याला तुरुंगांतच कळते. लहान मुलांचें हसणें खिदळणें, फार काय सांगावें त्यांचें तें रडणें देखील ऐकावयाला लांब मुदतीचा कैदी आतुर असतो. स्त्रियांचा आवाज कानीं न पडल्यामुळें चुकल्या चुकल्यासारखें वाटत असतें. कुत्रीं, घोडीं, गायी, म्हशी पाहाव्याशा वाटतात. सूर्यास्त व सूर्योदय व त्या वेळचे आकाशांतील देखावे पुन्हा केव्हां पाहीन असें दीर्घकालीन कैदीजीवनाला होऊन जातें. तेंच तेंच ठरीव साच्याचें व पद्धतीचें अन्न मनुष्यास पुढें पुढें दृष्टीसमोर नकोसें होतें. पोटांत भरण्याला कांहीं तरी हवें म्हणून मनुष्य एक अर्धी भाकरी शेवटीं खातोच. दीर्घकालीन तुरुंगवास संपवून बंदिगृहाच्या दिंडींतून एकांतांत राहिलेला कैदी बाहेर आला कीं त्याचे डोळे दिपतात, विस्तीर्ण मैदान पाहून तो गोंधळतो. नवजीवनाचा आस्वाद घेतांना, जुने नवे मित्र भेटतांना, नातेवाइकांच्या प्रेमळ सहवासांत काल काढतांना त्याला थोडासा उन्माद चढतो. अशा तऱ्हेच्या जीवनाचा अनुभव पंडितजींनीं १९२२ सालीं घेतला. ह्या वेळीं सुद्धा शिक्षेची मुदत संपण्यापूर्वींच त्यांची सुटका झाली. ह्या वेळीं कॉंग्रेसचे पुढारी कौन्सिलांत शिरले होते, लोकांत फेर नाफेर वाद माजला होता. त्यांत आणखी भर पडण्याकरितां उरले सुरले सत्याग्रही कैदी सोडणें सरकारला हितावह झालें.

## फेर नाफेर वाद

असहकारितेचें, विशेषतः कौन्सिल बहिष्काराचें तत्त्व हिंदुस्थानांतील बहुतेक पुढाऱ्यांनीं गांधीजींच्या भिडेनें स्वीकारलें होतें. जोंपर्यंत चळवळ जोरांत होती तोंपर्यंत त्याविरुद्ध बोलण्यास कोणी फारसे धजत नव्हते, पण चौरीचुराच्या दंग्यानंतर गांधीजींनीं चढाऊ चळवळ एकदम थांबवून विधायक कार्यक्रमावर सर्व भर दिला. कारण ज्या अहिंसेवर त्यांची चळवळ आधारलेली होती तिला चौरीचुऱ्याच्या दंग्यांत बराच मोठा धक्का बसला. सरकारशीं लढत घेतांना अहिंसेचा पवित्रा चुकल्याबरोबर लहान थोर पुढारी अगर सामान्य जनता काय म्हणेल इकडे न पाहातां त्यांनीं एकदम चढाऊ चळवळ बंद केली. त्याबरोबर बहुतेक पुढारी रागावले. पंडित जवाहरलालसुद्धा चिडले. चढाऊ चळवळ थांबल्याबरोबर लढाईचे इतर मार्ग पुढाऱ्यांस दिसूं लागले. देशबंधु दास पहिल्यापासूनच कौन्सिलमध्यें जाऊन सरकारशीं दोन हात करण्याच्या मताचे होते. त्यांना पंडित मोतिलाल जाऊन मिळाले. दोघांनीं मिळून एक बलवत्तर

***********************************************

असा स्वराज्य पक्ष स्थापन केला. म. गांधींचे कट्टे अनुयायी जे होते ते म्हणत कीं ' कौन्सिल में जाना हराम है, ' हें जें एकदा म्हटलें त्याप्रमाणें आपण वागलें पाहिजे, निदान कौन्सिलवादाचा प्रश्न गांधीजी तुरुंगांत असतांना तरी कोणी काढूं नये." ह्याप्रमाणें कॉंग्रेसवाल्यांत फेर नाफेर असे दोन पक्ष होऊन खूपच वाद रंगला. सरकारशीं झुंजण्यासाठीं तयार केलेलीं वाक्शस्त्रें स्वजनांवरच पडूं लागलीं. अशा ह्या धुमश्चक्रीच्या काळांत पंडितजींची तुरुंगांतून सुटका झाली. ते पहिल्यापासूनच कौन्सिलप्रवेशाच्या अगदीं विरुद्ध होते. शिवाय फेर नाफेर पक्षांतील दोष त्यांना दिसत होते. म्हणून ते स्वतः ह्या वादापासून दूर राहिले. दासबाबूंनीं स्वराज्य पक्षांत त्यांना ओढण्याचा खूप प्रयत्न करून पाहिला, पण आश्चर्याची व मोतिलालजींच्या स्वभावाची निदर्शक अशी गोष्ट म्हणजे स्वतःला स्वराज्य पक्षाविषयीं अत्यंत तळमळ वाटत असूनही त्यांनीं मुलाला आपल्या पक्षाकडे ओढण्याचा आग्रह धरला नाहीं व थोर मन करून त्यांनीं आपल्या पुत्राला ह्याबाबत पूर्ण स्वातंत्र्य दिलें.

दोन विरोधी गटांत सख्य निर्माण करण्याचा प्रयत्न कांहीं लोक करीत होते, त्यांतच छोटे पंडितजी जाऊन मिळाले. कॉंग्रेसचें नित्याचें काम ते करीत होतेच, पण त्यांत सहेतुकता फारशी नव्हती. अशा स्थितींत जवाहरलालजींना एक नवीनच कार्यक्षेत्र मिळालें.

### प्रकरण नववें

## नगरपालिकेचे अध्यक्ष

******************************

महात्मा गांधी तुरुंगांत पडले होते, फेर नाफेर पक्ष एकमेकांवर धूळफेक करीत होता. फेर नाफेर वादांत ज्यांना पडण्याची इच्छा नव्हती असे पं. जवाहरलालसारखे लोक उदास झाले होते. कॉंग्रेसच्या वाढलेल्या शक्तीला आवरण्याची आज कोणांत ताकद उरली नव्हती. अशा ह्या औदासिन्याच्या काळांत अचानकपणें नगरपालिकेच्या अध्यक्षपदाची माळ पंडितजींच्या गळ्यांत पडली.

********************************************

हें काम आपणांस मिळावें म्हणून त्यांनीं कोणतीही खटपट केली नव्हती. अंगावर एकदा जबाबदारी येऊन पडल्यावर मग मात्र त्यांनीं त्यांत खूपच मन घातलें. कॉंग्रेस चिटणिसाचें काम संभाळून हें काम करायचें म्हणजे पंडितजींना पंधरा पंधरा तास खपावें लागे. हें काम ते मोठ्या हौसेनें प्रथम करीत असत. आपलें नगर स्वच्छतेच्या व आरोग्याच्या दृष्टीनें आदर्श करून दाखविण्याची महत्त्वाकांक्षा कोणा तडफदार युरोपियन शहरें पाहून आलेल्या मनुष्याला वाटणार नाहीं? पं. जवाहरलालजींनीं तरुणाच्या उत्साहानें हें काम हातीं घेतलें. भव्य योजना आंखल्या पण वर्षाच्या शेवटीं, हल्लींचा म्युनिसिपल कायदा बदलल्याशिवाय नगरपालिकेची सुधारणा करणें अशक्य आहे, अशी त्यांनीं मनाशीं खूणगांठ बांधली.

म्युनिसिपल कायद्याच्या संकुचित कक्षेंत सध्यांच्या कायद्याच्या चौकटींत उभें राहून कांहीं सुधारणा करूं म्हटलें, म्युनिसिपल कारभार राष्ट्रीय वळणावर नेऊं म्हटलें, तर सरकार पदोपदीं आडवें येतें. राष्ट्रीय निशाण म्युनिसिपल इमारतीवर लावावें, तर कमिटीच बंद करून टाकण्याचा सरकार धाक घाली. राष्ट्रीय वृत्तीला पोषक अशीं पुस्तकें कमिटीच्या शाळेंत लावावीं, तर तिकडून सरकार त्याला अडचण आणी. कमिटीमध्यें निस्पृह, तडफदार अशा गुणी लोकांची भरती करतांना सरकार त्यांचीं राजकीय मतें तपासून मगच त्यांना कायम करण्याची परवानगी देई. गरीब वस्तींत चांगले रस्ते करावेत, पाणी मुबलक सोडावें, दिवे भरपूर लावावे, तर युरोपियन व हिंदी श्रीमंत लोकांच्या वस्तींतल्या सुखसोयी थोड्याफार कमी होणारच. आपल्या सुखांत यत्किंचितही अंतर पडलें तर श्रीमंत लोक संघटना करून गिल्ला करीत व गरीब लोक दारिद्र्यामुळें व संघटनेच्या अभावामुळें उदासीन राहात. ह्यामुळें सर्वांना सारख्या सुखसोयी करून देण्याची अध्यक्षांची महत्त्वाकांक्षा बाजूला राहिली. नगरसुधारणेच्या दृष्टीनें उपयुक्त अशी एखादी नवी योजना आंखावी तर त्याला पैसा पाहिजे. हा पैसा श्रीमंत वस्तीवरच जास्त कर आकारून उभा करतां येतो. पण ह्या श्रीमंतांची जूट पट्टी वाढवूं देत नसे. सामान्यतः हिंदी नागरिक आपल्या हक्कांविषयीं उदासीन असतो, त्यामुळें नित्य घडणाऱ्या अन्यायांचें परिमार्जन कमिटीकडून होत नाहीं. नगरपितेही निवडून येतांना जितके दक्ष असतात तितके नगराचा कारभार चालवितांना राहात नाहींत. ह्यामुळें कामांचा उरक पाडीत जाणें कठिण होऊन बसतें. मनुष्य जो कमिटींत जातो तो मानाकरितां, अधिकार गाजविण्यासाठीं जातो. सेवेची कल्पना त्याच्या ठिकाणीं क्वचितच असते. ह्यामुळें नगरकारभाराच्या महत्त्वाच्या गोष्टीकडे त्याचें दुर्लक्ष असतें. त्याला कमिटींत

******************************************

गेल्यावर दोन गोष्टी महत्त्वाच्या वाटतात. एक म्हणजे कमिटीच्या नोकरवर्गाची नेमणूक करणें व दुसरी गोष्ट म्हणजे देणग्या देणें. मनुष्याची लायकी पाहाण्यापेक्षां त्याची जात व नातें पाहून त्याला कोठल्याही नगरपालिकेंत नोकरी मिळत असते. देणग्या देतांना लायक कर्तबगार संस्थेला मदत मिळण्याऐवजीं ज्या संस्थांचा वशिला नगरपित्याकडे अधिक, त्या संस्थांना देणग्या मिळायच्या हें ठरलेलेंच असतें. त्यांत सुधारणा होण्याची पंडितजींना आशा दिसेना, म्हणून त्यानीं नगरसभेचा राजीनामा देण्याची तयारी केली, पण सहकाऱ्यांच्या आग्रहावरून पुढील वर्षाचें काम त्यांनीं रेटलें व शेवटीं अध्यक्षपदाची धुरा दुसऱ्या वर्षाच्या अंतीं त्यांनीं नाराजीनें खालीं ठेविली.

नगरपालिकेंत आपल्याला कांहीं एक सुधारणा करतां येत नाहीं हें पाहून पंडितजी जरी नाराज झाले होते, तरी त्यांचे सहकारी त्यांच्यावर खूष होते. सरकारनेंही त्यांच्या कामाची खूप प्रशंसा केली.पं. जवाहरलालसारखा हिंदुस्थानांतील अव्वल दर्जाचा कार्यकर्ता आपलें बुद्धिसर्वस्व खर्च करून पंधरा सोळा तास खपून, जर नगरपालिकेच्या कामांत रुपयांत दोन तीन आणेदेखील फळ पदरांत पाडूं शकला नाहीं, तर त्याची निराशा कां होऊं नये? पंडितजींनीं पाहिलें कीं ह्या असल्या कारभारांत आपली शक्ति वेचण्यांत अर्थ नाहीं. स्वराज्य-संपादनार्थ जे कष्ट करूं, ते आज ना उद्यां सार्थकीं तरी लागतील. स्वराज्य हातीं आल्यावर नगरपालिकेचा कायदा सुधारण्यास वेळ लागणार नाहीं व मग नगराध्यक्षाचें काम सुलभ होऊन त्याच्या हातून नगराची उत्तम सेवा होऊं शकेल. पंडितजींचा हा कयास कॉंग्रेसनें अधिकारस्वीकार करून म्युनिसिपल कायदे सुधारण्याची जी खटपट चालविली आहे त्यावरून बरोबर होता हें दिसून येतें.

आमच्या म्युनिसिपालिटीचे नगरपिते हे कार्यक्षम व जबाबदार नागरिक होण्याकरितां नव्या पिढीला नागरिकांच्या जबाबदारीचें शिक्षण बालपणापासूनच दिलें पाहिजे. असें झाल्याशिवाय म्युनिसिपल निवडणुकींत चांगले, कार्यक्षम नगरपिते निवडून येणार नाहींत असा बोध स्वतः घेऊन व जनतेस सांगून पंडितजी कमिटींतून बाहेर पडले.

## प्रकरण दहावें

# आमिष

******************************

दुसरा तुरुंगवास संपवून पंडितजी घरीं येतात तोंच त्यांच्या नांवाचें एक पत्र तेथील अलाहाबाद हायकोर्टाचे सरन्यायाधीश ग्रीमवुडसाहेब ह्यांचें आलें होतें. पत्राचा उद्देश स्नेहसंबंध वाढवावा असा होता. त्या पत्रानंतर साहेबमजकुरांची व पंडितजींची पुष्कळदा गांठभेट झाली. संभाषणाच्या ओघांत साहेब असे उद्गार काढीत कीं हिंदुस्थानांत येणारे युरोपियन लोक उच्च संस्कृतींत वाढलेल्या हिंदी गृहस्थांत मिळून मिसळून वागत नाहींत, ह्यामुळें हिंदी लोकांत युरोपियनां-बद्दल तिटकारा उत्पन्न होऊन इंग्लंड व हिंदुस्थान ह्या दोन देशांत विनाकारण वैरभाव वाढला आहे. साहेबमजकूर स्वतःच्या प्रेरणेनें पंडितजींच्या भेटीस आले होते का हिंदुस्थान सरकारच्या कारस्थानी खात्याकडून प्रेरणा मिळाल्यामुळें पं. जवाहरलालना आपल्या मोहजालांत पकडण्यास आले होते हें कळण्याला मार्ग नाहीं. हिंदुस्थानचा इंग्लंडशीं जो लढा आहे, त्याचें स्वरूप सर्वस्वीं आर्थिक आहे. तेव्हां हिंदी व युरोपियन लोक एका क्लबांत खेळते, नाचते, अगर जेवते, म्हणून तो कसा मिटणार ! हिंदुस्थानला नागवून इंग्लंड पुष्ट होत आहे, तें हिंदुस्थानला चालू द्यावयाचें नाहीं. ग्रीमवुडसारख्यांना हा लढा थांबविण्याची जर खरी कळकळ होती, तर त्यांनीं हिंदुस्थानाला राजकीय व आर्थिक स्वातंत्र्य देण्याला आपल्या स्वबांधवांस सांगितलें पाहिजे होतें. सुकलेल्या झाडाच्या पानांवर पाण्याचे चार थेंब टाकून का तें पुनश्च टवटवीत होणार ! मुळालाच भरपूर पाणी घातलें पाहिजे ही गोष्ट पंडितजींनींच जशी ओळखली होती, तशी ह्या न्यायाधिशांनीं एक तर ओळखली नव्हती किंवा तिकडे काना-डोळा करणें त्यांच्या राष्ट्रीय बाण्यास साजेसें होतें.

मधुर भाषणाच्या व उदार विचाराच्या लांबलचक गप्पा मारल्यावर ग्रीम-वुडसाहेबांनीं नेमस्तांची नालस्ती करण्यास सुरुवात करून ते म्हणाले, "हे मवाळ म्हणजे भेकड, दुबळे, संधिसाधु, चारित्र्यहीन, तेजोहीन असे आहेत. आम्हांला त्यांच्याविषयीं आदर आहे असें का तुम्हांला वाटतें ?" असे उद्गार

त्यांनीं काढून शेवटीं एके दिवशीं ते हळूच म्हणाले, "शिक्षणाचा प्रश्न देशांतील अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. क्रियास्वातंत्र्य असल्यावर शिक्षण-मंत्र्याला लाखों लोकांच्या भवितव्याला वळण देण्याची नामी संधि मिळणार आहे. आपल्या आयुष्यांत अशी सुवर्णसंधि एखाद्या वेळींच मिळते. समजा, तुमच्यासारखा बुद्धिमान, शीलवान, ध्येयवादी व कामें तडीस नेण्याची धमक असलेला पुरुष शिक्षणमंत्र्याच्या जागेवर जाऊन बसला तर काय चमत्कार घडून येणार नाहीं ? नुकतीच माझी गव्हर्नरांशीं भेट झाली, त्यावरून तुम्हांला तुमची योजना पार पाडण्याच्या कामीं पूर्ण स्वातंत्र्य देण्यांत येईल ह्यांत मला मुळींच शंका राहिली नाहीं."

त्या काळांत देशांतील थोर थोर पुढाऱ्यांना सरकारी जाळ्यांत पकडण्याचे कसे नाजूक हातानें प्रयत्न चालू होते हें ह्यावरून दिसून येतें. जहाल तरुणास मोहांत पाडील अशी शब्दयोजना बोलण्यांत करून श्रीमवुडसारखे मध्यस्थ आमचे मोहरे हां हां म्हणतां लांबवीत. सुदैव हिंदमातेचें कीं आमचे जवाहरलाल हे असल्या कोणत्याही मोहाला बळी पडले नाहींत. ते आपल्या आत्मचरित्रांत लिहितात कीं, "मंत्रीपद स्वीकारून सरकारशीं सहकार्य करावें ही कल्पनाच मला असह्य नव्हे किळसवाणी वाटते."

स्वातंत्र्ययुद्धाच्या काळांत पुष्कळ कर्तबगार माणसांना भरीव व विधायक काम करण्याची संधि मिळावी अशी इच्छा असली, तरी झगडे आणि विध्वंसक कार्ये ह्यांनीं भरलेलीं वाळवंटें तुडवून गेल्याशिवाय आम्हांला गत्यंतर नाहीं. बांधणी करण्याचें काम स्वातंत्र्य मिळाल्यावर आमच्या मुलांनातवंडांकडे येईल. हें आमच्या बुद्धिमान पुढाऱ्यांनीं लढाईच्या काळांत ओळखलें पाहिजे.

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय शाखा
ग्रं. क्र. ५४८५ ... दि .................
वि. प्रकरण अलीकडे ... ....................

# थोरांचीं दुःखें

****************************

**" सुंदर दारा स्थिर लक्ष्मी गृहिं, गुणवान सुतही ज्याला।**
**पुत्रापोटीं पुत्र होय तरि स्वर्गाधिक सुख त्याला ॥ "**

स्वरूपाराणीसारखी लावण्यसंपन्न व पतिपरायण पत्नी, वकिलींत बादशाही थाटाचें उत्पन्न व जवाहरलालसारखा अलौकिक गुणी व पितृभक्त पुत्र, त्या पुत्राला पुत्र नाहीं पण पुत्री प्राप्त झालेली, अशा स्थितींत पं. मोतीलालजी गृहसौख्याच्या आनंदांत पोहत होते. जवाहरलालजी हे मोतीलालजींचे एकुलतेएक पुत्र, तेव्हां त्यांना कमी काय होतें ? मुलाकरितां वाटेल तें करण्यास हा पुत्रवत्सल पिता नेहमीं सिद्ध असे. धेनु जशी वत्साच्या पाठीमागें धावत जाते, त्याप्रमाणें पुत्रप्रेमानें वेडे होऊन मोतीलालजी जवाहरलालांच्या मागोमाग जहाल राजकारणांत आले. अशा स्थितींत जवाहरलालजींची परिस्थिति कोणालाही हेवा वाटावी अशी होती. पण पं. जवाहरलालना असें वाटे कीं, आपल्या योगक्षेमासाठीं आपल्याला पित्यावर अवलंबून राहावें लागतें व ही गोष्ट आपणाला कमीपणा आणणारी आहे. ते वकिली करीत होते त्या वेळीं त्यांच्या स्वतःला खर्च करून उरेल इतका पैसा सहज मिळत होता. पण असहकारितेंत त्यांनीं जी वकिली सोडली ती कायमचीच. चोवीस तास ते सार्वजनिक कामाला वाहिलेले होते, त्यामुळें स्वतंत्र उत्पन्न मिळविण्याला त्यांना सवडच नव्हती. पण आपण आपल्या बापावर अवलंबून राहातों हा विचारच त्यांच्या मानी मनास सहन होत नव्हता. त्यांच्या मानिनी पत्नीलाही तसेंच वाटत असे. कांहींतरी करून आपण आपल्या खर्चापुरतें मिळविलें पाहिजे, असें पतिपत्नींनीं आपल्याशीं ठरविलें. प्रथम त्यांनीं आपल्या खर्चांत काटकसर केली. तेव्हां आईबापांस वाटलें कीं म. गांधींच्या संगतीनें हा साधा बनत चालला आहे इतकेंच. पंडितजी ओळखून होते कीं वडिलांना जर आपल्या मनांत चालू असलेले विचार कळले तर त्यांना मनस्वी दुःख होऊन ते उद्गारतील, " जवाहर, हें सर्व कोणाकरितां आहे ? " योग्य संधि येईपर्यंत आपल्या विचाराचा थांग मातापितरांना लागूं

**********************************************

द्यावयाचा नाहीं असें दोघांनीं विचारपूर्वक ठरविलें. पुढें एकदा कॉंग्रेसमध्यें सरचिटणिसांनीं पगार घ्यावा कीं नाहीं असा प्रश्न वादास निघाला, तेव्हां ही संधि योग्य आहे असें पाहून जवाहरलालजींनीं आपली विचारसरणी वर्किंग कमिटीपुढें स्पष्टपणें मांडली. ते म्हणाले, "तुम्हांला जर चोवीस तास राबणारा चिटणीस हवा तर तुम्ही पगार दिलाच पाहिजे. पगार द्यावयाचा नसेल तर ऐपतदार घराण्यांतील चिटणीस शोधण्याकडे तुमचें लक्ष लागून कोणीही गुणी मनुष्य तुम्ही केवळ पैशासाठीं मागें टाकाल." ह्या विचारसरणीला दुय्यम चिटणिसांनीं विरोध केला. पं. मोतिलाल म्हणाले, "चिटणीसांनीं पगार घेऊं नये असें मलाही वाटतें. जवाहरलाल, तुझ्यासंबंधीं म्हणशील तर तुझ्या संसाराला लागणारा वर्षाचा खर्च मीं चार दिवस काम केलें कीं मिळवूं शकेन." वडिलांपुढें जवाहरलालजींचें कांहींच चाललें नाहीं. पण आपण पराधीन, ही गोष्ट त्यांच्या मनाला बरेच दिवस बोंचतच राहिली.

सार्वजनिक काम फावल्या वेळांत करण्याची प्रथम प्रथा पडली. तेव्हां तें विनावेतन केलें जाणें युक्तच होतें. शेंकड्यांनीं नव्हे हजारांनीं पैसा मिळविणारांनीं सार्वजनिक काम विनावेतन केलें तर कॉंग्रेसच्या प्रथमावस्थेंत पाहिजेच होतें. पण आतां काळ बदलला आहे. कॉंग्रेसचें काम आतां इतकें वाढलें आहे कीं सवडीनें तें करूं म्हटलें तर आतां भागणार नाहीं. सर्वांचेच बाप कुठले श्रीमंत असणार ? तेव्हां सार्वजनिक काम करणारास वेतन देणें व त्यांनीं तें घेणें ह्यांत मुळींच कमीपणा नाहीं. पण अजून वेतन घेऊन सार्वजनिक काम केलें कीं, पोटार्थी देशभक्त, पगारी देशभक्त अशी त्यांची हेटाळणी होते. ह्यामुळें पुष्कळ सार्वजनिक कार्यकर्त्यांची कुचंबणा होत आहे. ह्यासाठीं जनतेनें पं. जवाहरलालजींची विचारसरणी नीट समजावून घेतली पाहिजे. इतर उद्योग करून ज्याला दरमहा दोनशें रुपये सहज मिळते, तो जर आपणाला ६०। ७० रुपयांत सार्वजनिक कार्यास मिळाला तर ह्या माणसाचें स्वार्थत्यागी म्हणून जनतेनें कौतुकच केलें पाहिजे. कांहीं न घेतां जो काम करतो तो एक श्रीमंत तरी असला पाहिजे, किंवा पोट भरण्याचे त्याचे मार्ग शिष्टसंमत नसले पाहिजेत. मोटर जशी पेट्रोलशिवाय चालणें शक्य नाहीं, त्याप्रमाणें सार्वजनिक कामें कार्यकर्त्यांना पोटापुरतें दिल्याशिवाय चांगल्या रीतीनें पार पाडणें शक्य नाहीं.

घरीं बापाची लाखों रुपये इस्टेट असतां चिटणिशीचा पगार घेण्यांत कमीपणा न मानणें ह्यांत पंडितजींच्या विचारसरणीचा स्पष्टपणा प्रतीत होतो.

*********************************************

त्याचप्रमाणें गैरसमजानें येणारे अपवाद सहन करण्यास लागणारें मानसिक धैर्य त्यांच्या अंगीं भरपूर आहे हें ह्या प्रसंगानें उघड झालें. शिक्षणमंत्र्याच्या पदाचा त्यांस ज्याप्रमाणें मोह नव्हता, त्याप्रमाणें कॉंग्रेस चिटणिसाचा पगार घेण्यांत ते कमीपणा मानीत नव्हते. मानापमानातीत होण्याचा अशा रीतीनें प्रयत्न करणारे पंडितजी हे मुमुक्षु नव्हते काय ?

## संस्थानी पाहुणचार

पंजाबांतील पतियाळा व नाभा ह्या प्रदेशाच्या संस्थानिकांमध्यें कांहीं काळ वैयक्तिक वैमनस्य माजून राहिलें होतें. त्याचा परिणाम असा झाला कीं, नाभा संस्थानच्या अधिपतींना अन्यायानें पदच्युत करण्यांत आलें व संस्थानचा कारभार एका ब्रिटिश कारभाऱ्याकडे दिला गेला. ह्या कारभाऱ्यानें शिखांच्या जेती येथील धार्मिक उत्सवाला बंदी केली. आपल्या राजाला पदच्युत केल्याबद्दल चिडलेले शीख ह्यामुळें अधिकच रागावले व त्यांनीं जेती येथें शिखांचे सत्याग्रही जथे पाठविण्याला सुरुवात केली. ह्या जथ्यांना संस्थानचे पोलिस प्रथम झोडपून काढीत व नंतर जंगलांत नेऊन सोडून देत. ही परिस्थिति समक्ष पाहून जाण्याविषयीं अकाली शीख पुढाऱ्यांकडून पंडितजींना विनंती करण्यांत आली, तेव्हां पं. जवाहरलालनीं प्रो. गिडवानी व संतानम ह्या दोन सहकाऱ्यांना बरोबर घेऊन एका जथ्यामागून प्रयाण केलें. नाभा संस्थानांत पाय ठेवितांच, "तुम्ही संस्थान सोडून आतांच्या आतां जा." असा अधिकाऱ्यांचा हुकूम पोलिसांनीं ह्या कॉंग्रिसनेत्यांवर बजावला. तो हुकूम वाचून पाहिल्यावर पंडितजी पोलिसांना म्हणाले, "संस्थानचा हुकूम मोडण्याची आमची इच्छा नाहीं, पण परत जाण्याला दोन तास गाडी नाहीं, तेथपर्यंत आम्हांला येथें थांबणें प्राप्त आहे." पण हें रीतसर बोलणें त्या अरेरावी संस्थानी अधिकाऱ्यांना कसचें मानवतें ! त्यांनीं लगेच तिघांना अटक केली व हातांत बेड्या ठोकून प्रवासांत पुष्कळ हाल करून नाभा येथें नेलें. तेथें गेल्यावर प्रो. गिडवानी, के. संतानम व स्वतः पंडितजी ह्या तिघांवर एक हुकूम तोडल्याचा व दुसरा संस्थानाविरुद्ध कट केल्याचा खटला भरण्यांत आला. संस्थानचा त्या वेळचा कारभार म्हणजे अंधेरनगरीची व्यवस्था होती. न्यायाधिशाला पोलिसच दरडावीत व कोर्टांत वकिलाच्या हातचे कागद हिसकावून घेण्याला कमी करीत नसत. एक वेळेला तर

ह्या त्रयमूर्तींस पोलिसांपासून न्यायाधिशाचें रक्षण करावें लागलें. तो पोलिसांपुढें थरथर कांपे. पोलिसांच्या सांगण्याप्रमाणें वागवें तर ह्या सुप्रसिद्ध आरोपींच्या बावतींत अन्याय केला म्हणून जगभर आपला बदलौकिक होणार ह्या कल्पनेनें मनांत न्यायाधीश घाबरे. शेवटीं पंधरा दिवस खटला चालून ह्या त्रयमूर्तींना एकंदर अडीच वर्षांची शिक्षा देण्यांत आली व नंतर लगेच सायंकाळीं पोलिस सुपरिंटेंडेंटनें येऊन तुमची शिक्षा तहकूब केली आहे असें सांगून संस्थान सोडून जाण्यास फर्माविलें.

हा सर्व प्रकार स्वप्नसृष्टींत घडावा तसा घडला. संस्थानी कारभार त्या वेळीं ब्रिटिशांच्या ताब्यांत असून हे असे अरेरावीचे व बालिशपणाचे प्रकार हिंदुस्थानांतील प्रसिद्ध अशा लोकांसंबंधीं व्हावेत हें आश्चर्य नव्हे काय? बाकी आश्चर्य कसलें? पस्तीस कोट हिंदी लोकांवर मूठभर ब्रिटिश राज्य करून एवढ्या मोठ्या राष्ट्राला दीडशें वर्षें गुलामगिरींत ठेवूं शकतात, ह्या आश्चर्यापुढें बाकी सर्व आश्चर्यें फिकीं आहेत.

## सेवादल

कॉंग्रेसकार्याला नेहमीं उपयोगीं असें अहिंसक पण शिस्तीचें शिक्षण घेतलेले स्वयंसेवक उभारावे असा प्रयत्न डॉ. हर्डीकर ह्यांनीं फार दिवस चालविला होता. नानातऱ्हेच्या शंकाकुशंका निघून कॉंग्रेसची त्याला मान्यता मिळत नव्हती. ही डॉ. हर्डीकरांची कल्पना पं. जवाहरलालजींना रुचून त्यांनीं हिंदुस्थानी सेवादलाचा पाया, कॉंग्रेसची मान्यता मिळवून कोकोनाडा कॉंग्रेस अधिवेशनाच्या वेळीं घातला. ह्या सेवादलानें पुढें मोठी राष्ट्रीय कामगिरी केलेली आहे. तिचें सर्व श्रेय डॉ. हर्डीकर व पं. जवाहरलाल ह्या जोडीकडे जातें.

## कुजलेला डाव

पंडितजींची ह्यापुढचीं कांहीं वर्षें औदासिन्यांत गेलीं. कौन्सिलप्रवेशाच्या वादावरून गांधीजी व मोतिलालजी हे एकमेकांपासून जरा दूर झाले होते. ह्या प्रकरणांत जवाहरलालजींना गांधीजींच्या कांहीं गोष्टी पसंत पडल्या नाहींत. तरी कौन्सिलपक्षाकडेही त्यांचा ओढा नव्हता. पुढें कौन्सिलपक्षांत फूट पडून तो पक्ष दुर्बल झाला. त्या पक्षाचे आधारस्तंभ व पं. मोतिलालजींचे उजवे हात जे देशबंधू दास तेही दुर्दैवानें ह्याच वेळीं दिवंगत झाले. देशांत हिंदुमुसलमानांत क्षुल्लक कारणानें तेढ उत्पन्न होऊन जातीय दंगे वाढत चालले होते. ह्या दंग्याच्या

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

मुळाशीं कांहीं विशेष मोठें तत्त्व नव्हतें. ज्ञातिनिष्ठ पुढारी कांहीं अज्ञानानें व कांहीं स्वार्थानें जातीजातींत भांडणें लावून देत होते. असा हा अनिष्ट राजकीय काल पंडितजींना निराशामयच वाटला. कॉंग्रेसच्या चिटणिसाचें काम त्यांच्याकडे येत राहून तें काम कसेंबसें ते रेटीत होते. ह्याच काळांत त्यांना विषमज्वर झाला व त्यानंतर ते बरेच दिवस अशक्त झालेले होते. पंडितजी लिहितात, "ह्या भयंकर दुखण्यांतून कसाबसा उठल्यावर, राजकारणांत अलिप्तपणें वावरण्याची मला बुद्धि उत्पन्न होऊन मी निर्विकार मनानें सार्वजनिक कामें करीत असे."

सार्वजनिक कार्य करतांना एक काळ असा असतो कीं ज्या वेळीं बुद्धि खर्चे करून केलेल्या प्रयत्नाला सारखें यश येत असतें अशा काळांत मनुष्य कर्तबगारीचा उपासक बनतो. पुढें असा कांहीं काल येतो कीं ज्या वेळीं मनुष्याच्या बुद्धीचा व कर्तृत्वाचा यशःप्राप्तीच्या कामीं कांहींएक उपयोग होत नाहीं. आपापसांतील मत्सर, गैरसमज, अहंकार ह्यांनीं राष्ट्रांत जेव्हां फूट पडते त्या वेळीं मनुष्य हतबल होऊन त्याच्यावर जितकी निराशेची दाट छाया पसरते तितकी परक्यांशीं लढतांना येणाऱ्या अपयशाच्या वेळीं पसरत नाहीं. आपला पक्ष न्यायाचा आहे, परकीय लोक अन्याय करीत आहेत, अशा भावनेंत मनुष्य असला म्हणजे त्यास कोण अवसान चढतें, त्याच्या काया, वाचा, मन इत्यादिकांच्या शक्ति प्रफुल्लित होतात व कांहीं वेळां मनुष्य अतिमानुष कर्तबगारी करून जातो. पण घरांत यादवी माजली, परकीयांवर करावयाचे डावपेच मनुष्य स्वजनांवर करूं लागला, देशाच्या रक्षणापेक्षां स्वतःच्या मोठेपणाकरितां मनुष्य करून भांडूं लागला कीं जवाहरलालसारखा अश्राप मनुष्य उदास बनतो. नित्याचें सार्वजनिक काम तर त्यास सुटत नाहीं, अशा वेळीं मी हें करतों कुणाकरितां ? परक्यांशीं लढून मिळविलेल्या सत्तेकरितां पुढें अशींच भांडणें होत राहाणार काय ? घरच्यांची माया तोडून संसारसुख दृष्टिआड करून मिळविलेली सत्ता आणि वैभव, अधिकारलालसा व अहंकार ह्यांनीं ग्रस्त झालेल्यांच्या हातांत शेवटीं देणार काय ? अशा परिस्थितींत कर्मच्युत दिलगीर मनुष्य सार्वजनिक कार्याचा तिटकारा येऊन खाजगी जीवनांत विलीन होतो. पण ज्यानें गीतेचा अभ्यास केला आहे, स्वातंत्र्ययुद्धांतील निरनिराळ्या प्रसंगांचें परिशीलन केलेलें आहे, तो मनांत म्हणतो, "ही एक लढाई आहे. येथें दिन

अनुक्रम
विभाग
क्रमांक

**************************************************

जायेंगे. " पण अशा वेळीं मनुष्यानें मन आवरून आपलें ठाण सोडलें नाहीं, तरी त्याच्यावरची औदासिन्याची छाया जात नाहीं. कर्मण्येवाधिकारस्ते ह्या मंत्राचा जप करीत तो नित्याचे उद्योग करीत, काळ कंठीत असतो. अशा तऱ्हेचा काळ पंडितजी व्यतीत करीत होते. डोक्यांत राख घालून ते कर्तव्यपराङ्मुख झाले नाहींत किंवा ध्येयावरून दृष्टि काढून यादवींत मिळाले नाहींत. दैवी संपत्ति घेऊन ते जन्माला आले होते, म्हणूनच त्यांची बुद्धि अशा काळांत स्थिर राहिली. देशाचें भाग्य ह्याला म्हणावें कीं ज्या वेळीं सत्ता, वैभव व बुद्धि ह्यांनीं युक्त असलेले देशांतील पुरुष संकटकाळीं आपली बुद्धि स्थिर ठेवून कर्तव्य करीत राहातात. आपलें स्वराज्य विलयाला जातांना त्या काळाच्या कर्तृत्ववान पुरुषांना अशी बुद्धि झाली नाहीं म्हणून त्या काळाला देशाच्या दुर्दैवाचा काळ म्हणावा लागतो. आमच्या देशाचा आजचा काळ सर्वथैव भाग्याचा म्हटला पाहिजे, कारण आमच्या देशांतील कर्तृत्ववान पुरुष संकटांत थोरपणाला साजेशी अशीच वर्तणूक ठेवीत आले आहेत.

## प्रकरण बारावें

# युरोपची यात्रा

****************************

१९२५ सालच्या मे महिन्यांत पं. जवाहरलालजींच्या पत्नी आजारी पडल्या. त्यांचा आजार येथील डॉक्टर्सकडून बरा होणारा नव्हता. शिवाय मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें येथील कुजक्या राजकारणाचा त्यांना वीट आलेला होता. कांहीं महिने हिंदुस्थानाबाहेर काढले तर आपल्या मनाला थोडी विश्रांति मिळेल व तें नवीन विचार ग्रहण करण्यास समर्थ होईल. ह्या विचारानें परदेशीं जाण्याचा त्यांनीं विचार केला. पंडितजींसारख्या प्रसिद्ध लोकांची अशी स्थिति असते कीं त्यांच्या अतिप्रसिद्धीमुळें हिंदुस्थानांतील कोणतेंही ठिकाण त्यांना पूर्ण विश्रांति देऊं शकत नाहीं. हवापालट करण्यास हे लोक जरी एखाद्या जंगलांत जाऊन राहिले, तरी लवकरच त्यांच्या विशेष तऱ्हेच्या राहाणीमुळें व नांवामुळें आसपासचे लोक कुतूहलानें आकर्षित होतात. फिरायला म्हणून बाहेर पडावें तर ठिकठिकाणीं

****************************************************

लोक जमून त्यांच्याकडे बोटें दाखवून टकमका पाहात असतात. थोड्या दिवसांतच ह्यांच्या आगमनाची बातमी आसमंतांतील राजकारणी पुरुषांना लागून ह्यांच्या व्याख्यानांचा कार्यक्रम ते ह्यांना न विचारतांच आपल्या गांवीं ठरवून टाकतात. एखादें व्याख्यान भिडेखातर द्यावें, तर लगेच ती बातमी पंचक्रोशींत पसरून इतरही ‘ झटें ’ पाठीमागें लागतात. मुलाखतीला येऊन प्रश्न विचारणारे कांहीं ताळतंत्र ठेवितात का! वर्तमानपत्रांत त्यांनीं ज्या कांहीं खऱ्या खोट्या गोष्टी ऐकल्या असतील त्याचाच उहापोह करीत बसतात. कोणी जेवणाचें तर कोणी फराळाचें निमंत्रण देतात व तेथें नको असलेल्या जिनसा खाव्या म्हणून आग्रह धरतात. भिल्लीणीचीं उष्टीं बोरें रामानें मोठ्या प्रेमानें खाल्लीं हा प्रसंग एकदाच घडला म्हणून ठीक, नाहीं तर महिना महिना दोन दोन महिने नको असलेल्या पण प्रेमानें पुढें केलेल्या जिनसा मनुष्य कसा व किती खाणार ? भेटीच्या वस्तु ज्याप्रमाणें नेहमीं येत राहाणार त्याप्रमाणें आपलीं सांसारिक दुःखें सांगून तीं निवारण करण्याकरितां पैशाची मागणी करणारे कांहीं कमी लोक येतात असें नाहीं. कोणी म्हणतात, “ तुम्ही हिंदुस्थानचे राजे आहां, तुम्हांला काय कमी आहे. कोणी म्हणणार, मोतिलालजींनीं कोट्यवधि रुपये मिळविले आहेत व तुम्ही तर देशाला वाहून घेतलेलें आहे, तेव्हां द्याना माझ्या मुलीच्या लग्नाला पांचशें रुपये. ” कोणी देवभक्तांचें शिष्टमंडळ येऊन म्हणणार, “ तुम्ही आमच्या गांवीं एवढे आलांत तर आमचें जुनें देऊळ नीट करून द्या. फार खर्च नाहीं. पांच हजारांत उरकून घेऊं, तुमचें नांव राहील. ” कोणी शाळेकरितां, तर कोणी वाचनालयाकरितां मदत मिळविण्याचा प्रयत्न करणार. गूळ कोठेंही ठेवा त्याला जशा मुंग्या लागतात तशी स्थिति आज हिंदुस्थानांतील सुप्रसिद्ध पुढाऱ्यांची होते. गाजावाजा न करतां राहूं म्हटलें तरी तार मास्तर, पोस्ट मास्तर, स्टेशन मास्तर ह्यांच्याद्वारा माहिती पसरून त्यांना विश्रांतिसौख्य मिळूं शकत नाहीं. अनेक दिवस लोकांत वावरल्यावर मनुष्याला एकांतवास हवाच असतो. तो जर देशांत मिळूं शकला नाहीं तर जवाहरलालजींसारख्या पुढाऱ्याला परदेशाची वाट धरावी लागते.

१९२६ च्या मार्च महिन्यांत आपली पत्नी व कन्या ह्यांसह स्वित्सरलंड येथें जाण्याकरितां पंडितजी निघाले. त्यांच्याबरोबर त्यांचे सुविद्य मेहुणे बॅ. पंडित व बहीण विजयालक्ष्मी ह्या होत्या. पुढें मोतिलालजी व भगिनी कृष्णा नेहरू हेही येऊन मिळाले. म्हणजे काय, सर्वच नेहरू कुटुंबानें युरोपांत प्रयाण केलें. ह्या प्रवासांत पंडितजींच्या मनाला शांति व शरीराला विश्रांति मिळाली. त्यांनीं

****************************************

बहुतेक प्रवासांतील आपला काळ स्वित्सरलंडमध्यें, जिनेवांत व मोटाना येथील आरोग्यधामांत घालविला. पत्नीला आजारीपणांत सोडून फार वेळ दूर राहाणें इष्ट नसल्यामुळें परगांवीं त्यांस फारच थोडा वेळ राहावयास सापडे. पण तिची प्रकृति बरी झाल्यावर मात्र फ्रान्स, इंग्लंड व जर्मनीमध्यें ते हिंडले. लिहावें, वाचावें, प्रसंगाशीं अनुसंधान राखावें. युरोपांतील नव्या रचनेकडे पाहावें, त्यांतील राजकारणाकडे, अर्थकारणाकडे व तेथील नांदणाऱ्या मनुष्यामनुष्यांतील अधिक मनमोकळ्या संबंधाकडे लक्ष द्यावें व त्यांतील रहस्य समजून घेण्याचा प्रयत्न करावा. हिंवाळ्यांत वर्फावरील घसरगुंडीचा कठिण खेळ खेळण्याचा त्यांस ह्या वेळीं खूप नाद लागला होता. युरोपमध्यें गेल्यावर आपणाला हिंदी माणसें फारशीं भेटणार नाहींत असें वाटतें. पण वस्तुस्थिति तशी नाहीं. दर आठवड्यास शेंकडों हिंदी लोक युरोपला हिंदुस्थानांतून आज रवाना होत असतात. त्यांतील कांहीं शिकण्याकरितां जातात, कोणी व्यापारधंद्यानिमित्त प्रयाण करतात, कोणाच्या प्रवासाचा हेतु राजकारण हा असतो. ह्यांतील सर्वच कांहीं परत हिंदुस्थानांत येत नाहींत. कांहीं लोक तेथेंच गृहस्थाश्रम थाटून राहातात. बुद्धिवान माणसाला अजूनही योगक्षेमापुरतें मिळतें. कांहीं डॉक्टर्सनीं आपली प्रॅक्टिस तिकडे चांगली वसविली आहे. कांहीं प्रोफेसरी अगर खाजगी शिकवण्या करून आपला चरितार्थ चालवितात. ह्याच्या उलट कांहीं कांहीं भावनाप्रधान राष्ट्रस्वातंत्र्याचा अखंड विचार करणारे पुरुष युरोपांत जाऊन दारिद्र्य, त्रास, अपमान सोसून गुप्त राजकीय उलाढालींत गुंतलेले दिसतात. आपला देश स्वतंत्र करावयाचा तर क्रांतीचा आश्रय करण्याशिवाय गत्यंतर नाहीं, अशी क्रांति यशस्वी करण्याकरितां इतर राष्ट्रांचें साह्य मिळवावें म्हणून ही मंडळी युरोपमध्यें जाऊन कूटमंडळें स्थापन करण्यांत गुंतलेलीं असतात. युरोपांत, विशेषतः इंग्लंडमध्यें इकडच्यापेक्षां भाषणस्वातंत्र्य मुबलक असतें. ह्यामुळें क्रांतिकारक कल्पनांची चर्चा क्लबमधून करणें अशक्य होत नाहीं. म्हणून तिकडे क्रांतिकारकांनीं किती तरी क्लब स्थापन केलेले आपणाला आढळतील. प्रत्येक देशांत प्रस्थापित राज्याविरुद्ध असंतुष्ट असा एक वर्ग असतो. ह्या वर्गाचे प्रतिनिधी अशा क्लबामध्यें नित्य येतात. मग तेथें राजकारणाची चर्चा चालतां चालतां त्याला इतके फाटे फुटतात कीं ह्या मंडळीपैकीं फारच थोड्यांचें एकमेकांशीं जमतें. थोडा वेळ एकत्र राहून नंतर हे स्वतंत्र विचाराचे लोक एकमेकांपासून स्वतंत्र होतात. ह्यांच्या डोक्यांत जी एक विशिष्ट कल्पना असते तिचा प्रसार करीत हे लोक

युरोपभर एकटे भटकत असतात. पुष्कळदा ह्यांच्याजवळ पैसा नसतो. त्यामुळें ह्यांचे फार हाल होतात. पण मनाशीं धरलेली कल्पना हे कांहीं केल्या सोडीत नाहींत. काल पालटत आहे, परिस्थिति बदलत आहे, हिंदुस्थान पूर्वींचा राहिलेला नाहीं, त्याच्या स्वातंत्र्याचे मार्ग निश्चित होऊन त्या मार्गानें त्याचीं पावलें झपझप पडत आहेत हें ह्यांपैकीं पुष्कळ मंडळींना सांगितलें तरी तें त्यांना पटत नाहीं. पं. जवाहरलालजी युरोपमध्यें गेल्यावर त्यांना असे अनेक त्रिशंकु देशभक्त भेटले. त्यांच्या त्यागाविषयीं, मातृभूमीच्या प्रेमाविषयीं आपणाला कितीही आदर वाटला तरी त्यांचे मार्ग व आयुष्यक्रम ह्याबद्दल इकडील विचारवंतांचें चांगलेंसें मत होत नाहीं. ह्या सर्व मंडळींत वीरेंद्र चट्टोपाध्याय व मानवेंद्र रॉय ह्यांच्याविषयीं मात्र पंडितजींचें चांगलें मत झालें.

## ब्रूसेल्स येथील जित राष्ट्रांची (साम्राज्यशाही विरोधकांची) परिषद

१९२६ सालीं पंडितजी बर्लिनमध्यें असतांना ब्रूसेल्स येथें जित राष्ट्रांची परिषद भरावयाची होती. तिचें निमंत्रण त्यांना आलें. परिषदेची कल्पना पंडितजींना पसंत पडल्यामुळें ते कॉंग्रेसतर्फें परिषदेला हजर राहिले. ह्या परिषदेस जावा, इन्डोचायना, पॅलेस्टाइन, सीरिया, इजित, उत्तर आफ्रिकेंतील निग्रो लोकांचे प्रतिनिधी व ठिकठिकाणचे कम्युनिस्ट उपस्थित होते. अध्यक्ष जॉर्ज लान्सबरी हे होते. त्यांचें भाषण फारच सुंदर झालें. परिषदेनंतर साम्राज्यशाही-विरोधी लीग स्थापन झाली. पण अध्यक्ष हे इंग्लंडचे मुख्य प्रधान झाल्यामुळें त्यांनीं ह्या लीगचा संबंध लवकरच सोडला. ह्या परिषदेशीं संबंध आल्यापासून पंडितजींना जागतिक राजकारणाची प्रत्यक्ष माहिती होऊं शकली. मजूर पक्षांतील विरोधी पक्षांचें अंतरंग कळलें. परिषदेंत पुष्कळ बाताडे व चऱ्हाटी ठराव येत, त्याला पंडितजी नेहमीं विरोध करीत. ठराव नेहमीं साधे व सुटसुटीत असावेत असें त्यांचें मत असे, पण युरोपांतील परंपरा निराळीच होती.

ह्या प्रवासांत त्यांचे वडील एका अपिलाच्या कामांत लंडन येथें आले होते. ह्या कामांत सर जॉन सायमन ह्यांचाही भाग होता. ह्या खटल्यांत छोट्या पंडितजींनीं पूर्वीं काम चालविलें होतें, म्हणून विचारविनिमयाकरितां पं. मोतिलाल, जवाहरलाल व सायमनसाहेब ह्यांची लंडन येथें मुलाखत झाली होती. लवकरच सायमनसाहेब हे इतिहासांत कुप्रसिद्धि पावलेलें जें सायमन कमिशन,

त्याचे अध्यक्ष म्हणून हिंदुस्थानांत आले. ज्यांनीं एका कामांत थोड्या दिवसां-पूर्वी सहकार्य केलें तेच अल्पावधींत परस्परांचे कट्टे प्रतिपक्षी म्हणून गाजणार होते. विधिघटना, दुसरें काय ?

युरोपांतून परत येतांना कॉंग्रेसच्या अधिकारपदाचा त्याग करून दूर एखाद्या खेड्यांत जाऊन तेथील परिस्थितीचा अभ्यास करावा अशी कल्पना मनांत घेऊन पंडितजी हिंदुस्थानांत आले. पण ईश्वरी योजना निराळीच होती.

## प्रकरण तेरावें

# पुनरागमन व राष्ट्राचें पुनरुत्थान

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें पं. जवाहरलाल नेहरू हे विलायतेहून परत आले. त्या वेळीं त्यांची प्रकृति व मन उल्हसित झालेलें होतें. येथून निघतांना मनावर जी निराशेची घनदाट छाया पसरली होती, ती जाऊन नवीन आशा, नवा उत्साह, नवा मार्ग ह्यांचे शुभकिरण त्यांच्या मनांत उदय पावून हिंदुस्थानांत गेल्यावर नव्या दमानें कार्यास लागायचें असा त्यांनीं मनाशीं विचार केला होता. कोकिळाला कंठ फुटून पंचम गाण्याचा त्याला जेव्हां उत्साह येतो, त्याच वेळीं सभोवतालचें वातावरणही वसंताच्या आगमनामुळें तसेंच उत्साहवर्धक असतें. पंडितजींनीं हिंदुस्थानांत पाऊल टाकलें त्या वेळीं देशांतील राजकीय परिस्थिति अशीच उत्साहवर्धक होती. १९२८ साल राजकीय घडामोडींनीं समृद्ध झालेलें होतें. सर्व देशभर धामधूम चालू होती. कांहींएक अतर्क्य प्रेरणा जनतेला पुढें ढकलीत होती. अगदीं निरनिराळ्या गटांत एकाच वेळीं नवचैतन्य दृष्टोत्पत्तीस येत होतें. कारखान्यांतील मजुरांत, शेतकऱ्यांत, मध्यम वर्गीय तरुणांत, सर्वसाधारण पांढरपेशा वर्गांत ह्या नव्या तेजोलहरीची चमक प्रतीत होऊं लागली होती. ट्रेड युनियन चळवळीची चांगली प्रगति झाली होती. संपाचें प्रमाण चढत होतें. गिरणी व रेल्वे मजूर ह्यांच्या संघटना सरस होत्या. शेतकरी हातपाय हालवूं लागला होता. संयुक्त प्रांत व विशेषतः ऊन भागांत जागृति विशेष होती. गुजराथेंत शेतकरी व सरकार ह्यांच्यामध्यें सारावाढीच्या

**************************************************

प्रकरणीं मोठाच लढा जुंपून राहिला होता. बार्डोलीच्या यशामुळें हिंदी शेतकऱ्यांच्या मनांत बार्डोली हा शब्द आशा, सामर्थ्य व विजय ह्यांचा निदर्शक बनून राहिलेला होता. हिंदुस्थानांतील ह्या वर्षांत लक्षांत येण्याजोगी गोष्ट म्हणजे युवक चळवळ. जिकडे तिकडे युवक संघ प्रस्थापित होत होते व युवक परिषदा भरत होत्या. समाजांतील जिव्हाळ्याच्या अशा सामाजिक व आर्थिक प्रश्नांचा उहापोह युवक परिषदेमध्यें होऊन सर्वसाधारणपणें समाजांत आमूलाग्र फरक केला पाहिजे असाच ध्वनि तेथें उमटत असे. राजकारणाचा विचार केला तर तें वर्ष सायमन कमिशन व त्याचा बहिष्कार आणि सर्वपक्षीय परिषद ह्यामुळें गाजलें होतें. अशा ह्या धामधुमीच्या काळांत जवाहरलालजी मायदेशांत परत आले. परत येतांच त्यांनीं स्वातंत्र्ययुद्ध संभाव्यता, साम्राज्यविरोधी लीग ह्यांच्याबाबत वर्किंग कमिटीपुढें कांहीं ठराव पाठवून दिले, त्यांचा तात्काल स्वीकार होऊन ते खुल्या अधिवेशनांत मांडायचे ठरलें व ते पुढें एका मतानें मद्रास कॉंग्रेसमध्यें पासही झाले. ह्या सालीं पुनश्च ते कॉंग्रेसचे चिटणीस झाले. कारण वरील ठरावाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी पंडितजींवरच होती. इतरांनीं त्या ठरावास नुसत्या मानाच डोलविल्या होत्या. ह्याच अधिवेशनांत सायमन कमिशनचा निषेध करण्यांत येऊन त्याला प्रत्युत्तर म्हणून सर्वपक्षीय परिषद बोलावण्यांत आली. ह्याचा अर्थ असा झाला कीं नेमस्तांबरोबर सहकार्य करावें लागून ती तडजोडीच्या घसरणीला लागणार. पंडितजींच्या मनांत चिटणीशी स्वीकारून कॉंग्रेसच्या वृत्तीचा लंबक नेमस्त वृत्तीच्या बिंदूकडे झुकूं लागला तर आपण त्याला प्रतिरोध करावा व स्वातंत्र्याच्या ध्येयापासून तिला चळूं देऊं नये, असा हेतु होता. ह्याच वेळीं लोकसत्ता परिषद भरविण्यांत आली व तिचें अध्यक्षस्थान पंडितजींना देण्यांत आलें. देशांत चळवळीचा पाऊस पडूं लागला म्हणजे खऱ्या पिकांबरोबर कुत्र्याच्या असंख्य छत्र्यांप्रमाणें लहान लहान संस्थांना व परिषदांना ऊत येत असतो. त्यांच्या अति उत्साही चालकाची भाषा आवेश व गडबड अशी कांहीं असते कीं, पहिल्या प्रतीचे पुढारी त्यांच्यापुढें फिके पडतात. अशी मंडळी मोठी गडबड करून मोठमोठ्या पुढाऱ्यांना भीड घालून आपल्या कार्यांत त्यांना गुरफटून टाकतात. पुढारी दूरदर्शी असला तर अशा परिषदांचें स्वरूप ओळखून त्यांच्याबरोबर वाहात जात नाहीं. पण त्यांतही एक अडचण असते. अशा संस्थांपासून दूर राहावें तर हे अति उत्साही लोक बहुजन समाजांत पुढाऱ्यांविषयीं गैरसमज पसरवितात. आपली

**************************************************
लोकप्रियता कायम राखून अशा पावसाळी संस्थांपासून स्वतःचा बचाव करून घेणें कठिण असतें. मद्रासेंत पंडितजींना लोकसत्ता परिषदेचा असाच अनुभव आला. ते लोकसत्तावादी असल्यामुळें ह्या परिषदेची कल्पना त्यांस ग्राह्य वाटली व ते तिचे अध्यक्ष झाले. पण पुढें त्या परिषदेच्या चालकांचा व त्यांत पास झालेल्या ठरावांचा मागमूसही राहिला नाहीं. एखाद्या परिषदेचे आपण अध्यक्ष झालों म्हणजे त्यांत पास होणाऱ्या ठरावांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी आपणांवर येते, ही जाणीव पुष्कळांना नसते. ते व्याख्यान झोडून चालते होतात. पण गांधीजी काय, पंडित जवाहरलाल काय हे असलीं उपन्यासारखीं कामें कधींच करीत नाहींत. बेळगांवास महात्माजी गोरक्षण परिषदेचे अध्यक्ष दे. गंगाधरराव देशपांडे ह्यांच्या अत्याग्रहावरून झाले होते. परिषदेचे चालक पुढें हा विषय विसरले, पण गांधीजी विसरले नाहींत: व आज तो विषय कॉंग्रेस अधिवेशनांत विधायक कार्यक्रमाचा भाग म्हणून अजूनही येत असतो. पंडितजींना पुढें ह्या लोकसत्ता परिषदेबद्दल कांहींच करतां आलें नाहीं. कारण त्या परिषदेचे सूत्रचालकच वर सांगितल्याप्रमाणें ठिकाणीं नव्हते. ह्या परिषदेचें अध्यक्षस्थान स्वीकारल्याबद्दल आपल्याला पुढें पश्चात्ताप झाला असें पंडितजी आपल्या आत्मचरित्रांत लिहितात. आपण सामान्य लोक रोज कितीतरी गोष्टी बेजबाबदारपणानें करतों व त्या विसरूनही जातों, पण थोरांचें तसें नसतें. त्यांनीं ज्या गोष्टीला हात घातला ती गोष्ट अर्धवट टाकणें त्यांच्या जिवावर येतें. एकदा दिलेलें वचन, एकदा स्वीकारलेला विचार, एकदा जोडलेला स्नेह व एकदा स्वीकारलेलें कार्य टाकून देणें हें थोरांना नेहमींच दुःखदायक होतें. मद्रास कॉंग्रेस आटोपून पंडितजी निघतात तों हिंदी राजकारणांत ज्यांचें नांव एका वेळीं विशेष चमकलें, ज्यांच्या आगमनानें बहुमोल व दुर्मिळ अशी भर पडली, जुन्या नव्या पिढ्यांचे दुवे ज्यांच्यामुळें जोडले जाऊन राष्ट्रीय कार्याच्या रथाला ज्यांनीं जुन्या पिढीची निष्ठा आणून जोडली, हिंदुमुसलमानांना निकट आणण्यांत ज्यांना बरेंच यश मिळालें होतें व जे अनेक वर्षांचे नेहरू घराण्याचे ऋणानुबंधी होते, असे हकीम अजमलखां एकाएकीं वारले. त्यांच्या मृत्यूनें देशाचें जसें नुकसान झालें, त्याप्रमाणें नेहरू घराण्याला आपला एक ऋणानुबंधी आप्त गेला असें वाटून परमावधीचें दुःख झालें. पंडितजी म्हणतात कीं, “दिल्लीला आतां केव्हांही गेलें तरी आम्हां सर्वांना तेथें चुकल्याचुकल्यासारखें होतें. कारण दिल्ली नांव उच्चारलें कीं हकिमजींची आठवण होऊन त्यांचा तो भव्य वाडा डोळ्यांसमोर उभा राहातो.”

## प्रकरण चौदावें

# सायमन कमिशन—सर्वपक्षीय परिषद

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

ह्या काळांत देशांत ज्या दोन गोष्टींनीं लोकांचीं मनें आकर्षून घेतलीं होतीं, त्या गोष्टींत पंडितजींनीं काय कामगिरी केली हें आपण आतां पाहूं. हिंदुस्थानला हप्त्याहप्त्यानें स्वराज्य द्यायचा बादशाही जाहीरनामा १९१७ मध्यें प्रसिद्ध झाला होता. त्याप्रमाणें मँटिग्यु चेम्सफर्ड ह्यांच्या सूचनेप्रमाणें द्विदल राज्यपद्धति १९१९ च्या कायद्यानें हिंदुस्थानला देण्यांत आली व दहा वर्षांनीं पुनश्च परिस्थितीचें अवलोकन करून, पुढील हप्ता केवढा द्यायचा हें ठरवूं असें सरकारनें त्या वेळीं जाहीर केलें होतें. १९२९ मध्यें दुसरा हप्ता द्यावयाचा तेव्हां त्याची चौकशी करण्याकरितां १९२७ मध्यें कमिशन नेमणें सर्वतोपरी युक्त होतें. ह्या कमिशनमध्यें युरोपियन व हिंदी लोक ह्यांची संख्या सारखी असेल अशी पुष्कळांची अपेक्षा होती. कारण १९२१ सालीं प्रिन्स ऑफ वेल्स हिंदुस्थानांत आले त्या वेळीं त्यांच्या आगमनावर जर हिंदी लोकांनीं बहिष्कार घातला नाहीं तर राउंड टेबल कॉन्फरन्स भरविण्याबद्दलचें बोलणें व्हाइसरॉय लॉर्ड रीडींग ह्यांनीं त्या वेळीं हिंदी पुढाऱ्यांजवळ लाविलें होतें. पण आतांचा काळ बदलला होता. कॉंग्रेसमध्यें पूर्वीची जूट राहिलेली नव्हती. मग ब्रिटिश मुत्सद्द्यांनीं हिंदी लोकमताची किंमत काय म्हणून ठेवावी ? त्यांनीं सायमन साहेबांच्या अध्यक्षतेखालीं अत्यंत प्रतिगामी विचाराच्या सात लोकांचें एक बादशाही कमिशन नेमलें व त्यांत एकही हिंदी माणूस घेतला नाहीं. हा अपमान हिंदी राष्ट्रानें मुळींच सहन केला नाहीं. कॉंग्रेसवाले व स्वराजिस्ट एक झाले ह्यांत नवल नाहीं. नेमस्तदेखील ह्या वेळीं जहाल लोकांना येऊन मिळाले व सर्वांनीं असें ठरविलें कीं ह्या कमिशनपुढें साक्षी द्यायला कोणीच जायचें नाहीं. ही मंडळी एवढेंच करून थांबली नाहींत, तर त्यांनीं सर्वपक्षीय परिषद बोलाविली व सर्व हिंदी पक्षांना संमत होईल अशी राज्यघटना तयार करण्याचें ठरवून, हें काम पं. मोतिलाल नेहरू व त्यांचे कांहीं सहकारी ह्यांच्याकडे दिलें. सर्व पक्षांना झेपेल असें राष्ट्राचें ध्येय ठरवावयाचें म्हणजे अगदीं मंद गतीनें चालणाऱ्या लोकांच्या चालीनें चालावें लागणार. ह्याचा अर्थ उघडच होता कीं

******************************************
साम्राज्यांतर्गत स्वराज्य हेंच राष्ट्राचें ध्येय ठरणार. ह्या समितीची चिटणिशी नेहमींप्रमाणें छोट्या पंडितजींकडे आली. कारण इतक्या तडफेनें, कळकळीनें व बुद्धिसर्वस्व वेंचून कामाचा उरक पाडणारा दुसरा चिटणीस मिळणार कोठचा ? पण ह्याच कामांत पंडित जवाहरलाल व त्यांचे वडील पं. मोतिलाल ह्यांच्यामध्यें खटका उडण्याचा प्रसंग आला.

## बापलेकाचा खटका

जवाहरलाल म्हणत, "राष्ट्राचें ध्येय आकुंचित करणें केव्हांही चांगलें नाहीं. राष्ट्राला झेपेल असा कार्यक्रम पाहिजे तर आंखा, पण पूर्ण स्वातंत्र्यावरची आपली दृष्टि केव्हांही चळूं देऊं नका. राष्ट्रांत केव्हां नवीन सामर्थ्य उत्पन्न होईल ह्याचा नियम नसतो. तरी कोणत्याही सामर्थ्यवान व्यक्तीला पुरें पडेल असेंच ध्येय हिंदी राष्ट्रानें आपलें म्हणून ठरवावें." पं. मोतिलालजी म्हणत, "बेटा जवाहर, तूं हवेंतील किल्ले बांधावयाच्या गोष्टी बोलतोस; कांहीं पायांकडे पाहून चल. आज नशिबानें हे नेमस्त आपणाला मिळत आहेत, जातीय प्रश्न सुटण्याच्या मार्गाला लागलेला आहे, हिंदी राष्ट्राचें सर्व बळ जर आज साम्राज्यांतर्गत स्वराज्यावर कां होईना, पण एकत्रित झालें, तर हिंदी राष्ट्राला पूर्ण स्वराज्य जाहीर करणें उद्यां कठिण जाईल का ?" पुष्कळ विवादानंतर बापाचें म्हणणें मुलाला पटलें व छोटे पंडित वडिलांना म्हणाले, "आम्ही तरुण मंडळी पूर्ण स्वातंत्र्याचें ध्येय कांहीं सोडायला तयार होणार नाहीं, पण राष्ट्रांतील अनेक शक्ति एकत्रित होण्याचा योग आला असतां आमच्या पूर्ण स्वातंत्र्याच्या हट्टामुळें जर सर्व बनाव फिसकटत असेल तर आम्ही आपला हट्ट चालवीत नाहीं. तुमच्या सर्वपक्षीय कार्यांत अडथळा करीत नसलों, तरी पूर्ण स्वातंत्र्यापेक्षां कमी दर्जाच्या ध्येयाला आमची संमतिही देणार नाहीं." असें म्हणून इंडिपेन्डन्स ऑफ इंडिया लीग ह्या नांवाची पूर्ण स्वातंत्र्याची घोषणा करून, तत्प्रीत्यर्थ प्रयत्न करणारी एक संस्था पंडितजींनीं आपल्या तरुण मित्रांच्या साह्यानें काढली व आपल्या ह्या कृत्यानें कॉंग्रेसच्या ह्या धोरणाला बाध येऊं नये म्हणून पंडितजींनीं आपला कॉंग्रेस चिटणिशीचा राजीनामा सादर केला. देवाण घेवाण ही बुद्धि त्या काळीं सर्वांमध्येंच उदित झाली होती. म्हणून तुम्ही लीगचे सभासद असल्यानें कॉंग्रेसच्या तत्त्वाला बाध येत नाहीं असें त्यांस सांगण्यांत येऊन राजीनामा परत करण्यांत आला. नेहरू कमिटीनें लवकरच

*******************************************

एक सुंदर योजना तयार केली. पण हट्टी ज्ञातिनिष्ठांनीं पुढें सर्वच डाव उधळून लाविला.

इकडे सायमन कमिशन आपलें काळें तोंड घेऊन देशभर फिरत होतें. जेथें जातील तेथें त्यांस " साती ग्रहांनो परता गृहाला " असा निनाद जिकडे तिकडे त्यांस ऐकूं येत होता. १९२१ सालापासून ड्यूक ऑफ कॅनॉट, प्रिन्स ऑफ वेल्स किंवा सायमन सप्तक अशांसारख्या बादशाही प्रतिनिधींचें हिंदुस्थानांत जनतेनें स्वागत म्हणून केलें नाहीं. उलट त्यांचा जिकडे तिकडे धिःकारच झाला. ह्या सायमन सप्तकाला नेहमीं गो बॅक ( चालते व्हा ) एवढे शब्द ऐकण्याची संवय इतकी झाली होती कीं त्यांना हे शब्द नाहीं तेथें ऐकू येऊं लागले. मागें मराठ्यांनीं केलेल्या स्वातंत्र्ययुद्धांत, मोगल स्वाराचा घोडा पाणी पिईनासा झाला म्हणजे तो स्वार घोड्याला विचारी कीं पाण्यांत तुला संताजी, धनाजी दिसतात का? असाच कांहींसा प्रकार दिल्लीस सायमन सप्तक गेलें असतां झाला. एके रात्रीं ह्या सप्तकांतील सभासद नव्या दिल्लीमधील वेस्टर्न हॉटेलमध्यें झोंपीं गेले होते. तों त्यांना दूरवर लोकांच्या आरोळ्या ऐकूं आल्या. रात्रींच्या विश्रांतीच्या वेळीं हे चळवळे लोक आपला पिच्छा पुरवितात हें पाहून हे अनाहूत पाहुणे संतापले व त्यांनीं चौकशीकरितां खिदमतदगार पाठविले. लवकरच त्यांना असें कळलें कीं ह्या आरोळ्या 'परत जा' अशा अर्थाच्या नसून ती ओसाड वस्तींतील कोल्हेकुई होती.

सायमन सप्तक लाहोरास गेलें. तेथें त्याच्या निषेधार्थ जे लोक जमले होते त्यांचें पुढारीपण सुप्रसिद्ध दे. भ. लाला लजपतराय ह्यांच्याकडे आलें होतें. पोलिसांनीं लोकांच्या जमावावर हल्ला करतांना वृद्ध लालाजींवरही लाठीचे सडकून प्रहार करून त्यांना जायबंदी केलें. त्यामुळें सर्व देश दुःख, संताप व क्लेश ह्या भावनांनीं भरून गेला. ही बातमी लखनौला कळल्यावर तेथें अगोदरच निषेधाची जी तयारी चालली होती तिला अधिकच उग्र स्वरूप आलें. पं. जवाहरलालजी ह्या वेळीं लालाजींप्रमाणेंच सायमन सप्तकाचा निषेध करण्याकरितां लोकसमुदयांत शिरून तेथें अग्रभागीं उभे राहिले होते. तुरुंगांत जाण्यास धैर्य आहे, पण त्यांत पुष्कळसा भाग मानसिक असतो. अनेक वर्षें हाल काढण्यांत पुरुषार्थ आहे, पण त्याची गणना चिवटपणा, सोशिकपणा ह्यांत होते.

पण लाठीहल्ल्याला तोंड द्यावयाचें, पोलिसांनीं अंगावर घोडे घातले असतां आपलें स्थान सोडावयाचें नाहीं ह्याला विशेष तऱ्हेचें जें शारीरिक धैर्य लागतें त्याची परीक्षा पंडितजींनीं ह्या प्रसंगीं दिली. त्याची किंमत आमच्या काँग्रेसच्या इतिहासांत फार फार मोठी आहे. आमच्या मतें पंडितजींवर फुलें — नव्हे मोत्यें — उधळण्याचा तो प्रसंग होता. राष्ट्रांतील सुवासिनींनीं त्यांच्यापुढें पंचारती घेऊन जाण्याची ती वेळ होती. पंडितजींनीं हा लाठीहल्ल्याचा प्रसंग मोठ्या बहारीनें वर्णन केलेला आहे. त्या वेळच्या आपल्या मनोवृत्तीच्या हेलकाव्यांचें उत्कृष्ट चित्रण केलें आहे. ज्या प्रसंगावर कवींनीं स्फूर्तिदायक पोवाडे रचावे असा तो स्फूर्तिदायक प्रसंग होता ह्यांत संशय नाहीं.

लखनौला सायमन कमिशन ज्या दिवशीं येणार होतें त्याच्या आदल्या दिवशीं निषेधाच्या सभेला जाण्याकरितां सोळा सोळा जणांचें एक एक पथक करून मंडळी चालली होती. जमावानें गेल्यास रहदारीला अडथळा आणला म्हणून पोलीस भलत्याच वेळीं अडवतील म्हणून फुटून फुटून ही मंडळी निघाली होती. एका गटाचे नायक पं. जवाहरलाल व एकाचे पं. गोविंदवल्लभपंत ( जे हल्लीं संयुक्त प्रांताचे मुख्य प्रधान आहेत ) हे होते. दोनशें यार्ड अंतर ही मंडळी राष्ट्रीय निशाणें घेऊन गेली न गेली तोंच तीस पस्तीस घोडेस्वार हातांत लाठ्या व दंडुके घेऊन आले व त्यांनीं स्वयंसेवकांस झोडपून काढण्यास आरंभ केला. एकाएकीं आलेल्या हल्ल्यामुळें स्वयंसेवक पांगले व पंडितजी एकटेच रस्त्याच्या मध्यभागीं उभे राहिले तोंच त्यांवरही हल्ला आला. क्षणभर त्यांच्या मनाचा गोंधळ झाला. पण लगेच त्या शूरानें आपलें मन आवरून आपली जागा सोडली नाहीं व जेव्हां पुन्हा दुसरा हल्ला आला त्या वेळीं लाठीवाल्या घोडेस्वाराला त्यांनीं म्हटलें, “ चालूं दे तुझें काम. ” तोंच त्यांच्या अंगावर लाठींचे रट्टे बसले. कांहीं वेळानें स्वयंसेवक मंडळी एकत्रित झाली. त्या वेळीं गोविंदवल्लभपंतांनाही खूप मार बसला असून कांहीं स्वयंसेवक रक्तबंबाळ झाल्याचें दिसत होतें. पोलिस पुढें जाऊं देईनात असें पाहून ही सर्व शूर मंडळी ठाण मांडून बसली. लाठी-हल्ल्याची ही हकीगत हां हां म्हणतां गांवांत पसरली व प्रचंड लोकसमुदाय येऊन ह्या स्वयंसेवकांना मिळाला. एका बाजूस पोलिस अधिकारी व त्यांचे गण व दुसऱ्या बाजूस अफाट लोकसमुदाय ठाण मांडून बसलेला, अशा स्थितींत अंधार पडला. मग सत्याग्रही मंडळींना ठरीव रस्त्यानें जाऊं देण्यांत आलें.

*********************************************

खरी परीक्षा सायमन कमिशनच्या आगमनाच्या दिवशीं होती. सायमन कमिशन सकाळीं येणार होतें व त्याचा धिक्कार करण्याकरितां लोकांची प्रचंड मिरवणूक स्टेशनवर जाणार होती. आदल्या दिवशींच्या लाठीहल्ल्याची बातमी तारेनें अलाहाबादला वृद्ध मोतिलालजींना कळतांच घरांत चिंतेचें साम्राज्य पसरलें. मातेच्या हृदयानें ठाव सोडला. "काय माझ्या लाडक्या जवाहरवर लाठी, ज्याच्या शरीराला वडिलांशिवाय हात लावण्याची कोणाची प्राज्ञा नव्हती, डोळ्यांत केर जाऊन त्यानें नुसते डोळे चोळले तर गुलाबपाणी घेऊन मी धांवावें, ज्याच्या अंगावर आजपर्यंतचा पडलेला मार म्हणजे फुलांच्या वर्षावाचा, त्या माझ्या जवाहरवर लाठीहल्ला! काय त्याची स्थिति झाली असेल? त्याच्या शरीराला ते घाव सहन तरी झाले असतील का? तो बेशुद्ध तर नाहीं ना झाला?" असे अनेक उद्गार ती वृद्ध माता काढीत होती. तिची सून असें विशेष कांहीं बोलत नव्हती, पण गंभीर मात्र झाली होती. डोळ्यांत येणारें पाणी लपवून आपण वीरपत्नी म्हणवून घेण्यास लायक आहोंत असें दाखवीत होती. लाठीहल्ल्याच्या वेळीं माझा पति धीरानेंच वागला असेल व आपल्या राष्ट्राला भूषणच झाला असेल, अशी मनाची खात्री तिला एकीकडे आनंदवीत होती, तर दुसरीकडे लाठीचा घाव वर्मी तर नसेल ना लागला? अशी शंका मनांत येऊन तिचें काळीज चरचरत होतें. हें सर्व अवघ्या कांहीं मिनिटांतच घडलें. लखनौला जाण्याचा बेत सर्वांनीं चालविला. पण मोतिलालजी म्हणाले, "मी स्वतः जाऊन सर्व पाहातों व मग तुम्हाला बोलावून घेतों. इतक्यांत जवाहरलालजी बरे असल्याबद्दल तार येऊन धडकली, तेव्हां सर्वांचाच जीव खालीं पडला. पण लगेच स्वरूपाराणी म्हणाल्या, "मला बरें नाहीं असें तो कधीं तरी म्हणतो का? आपलें दुःख तो कधींच कोणाला सांगत नाहीं. गेला होता कशाला लखनौला?" तोंच कमलादेवीनें नवऱ्याचा पक्ष घेऊन हळूच म्हटलें, "राष्ट्राचा पुढारी म्हणून घ्यावयाचें तर मागें कसें राहातां येईल. बाकी अंग चोळीत असतांना मी बरा आहें अशी तार त्यांनीं केली असेल." दुसऱ्या तारेनें नेहरू कुटुंबाचा जीव जरी खालीं पडला होता, तरी मनांतून काळजी नाहींशी झाली होती असें नाहीं. अशा स्थितींतच मंडळी झोपण्यास उठली. मोतिलालजी अंथरुणावर पडले होते खरे, पण मुलावर झालेला लाठीहल्ला त्यांच्या नजरेसमोर उभा राहून त्यांना कांहीं केल्या झोंप येईना. ते तळमळत होते. स्वरूपाराणींनाही झोंप नव्हती. मोतिलालजी त्यांना

************************************************

म्हणाले, "मला वाटतें लखनौला मीं जावें. उद्यांचा प्रसंग कठिण आहे. त्याच्याजवळ मी असलेला बरा." हे पतीचे शब्द ऐकून त्या अश्राप हृदयाच्या माऊलीनें धीर सोडला. पुत्राच्या रक्षणार्थ जाऊं नका असें तरी कसें म्हणावें व जा म्हणावें तर तें पतीला वृद्धपणीं खाईंत उडी टाकायला परवानगी देण्यासारखें होतें. हा संवाद मोठ्यानें चाललेला ऐकून पलीकडील खोलींत शय्येवर तळमळत पडलेली कमलादेवी उठली व सासूजवळ येऊन म्हणाली, "जाऊं द्या ना दादाजींना. आपण वीरमाता व वीरपत्नी म्हणवितां, नेहरू कुटुंबाकडे सबंध हिंदुस्थानचे आज डोळे लागले आहेत. आपण परीक्षेंत नको का उतरायला ?" इतक्यांत कळलें कीं लखनौची शेवटची गाडी निघून गेली. तेव्हां मोतिलाल म्हणाले, "तें कांहीं नाहीं, मी मोटारीनें जाणार. जवाहर तेथें लाठ्या खातो आणि मी मृदु शय्येवर पडून राहूं ?" असें म्हणून तो वृद्ध वीरपुरुष उठला व मोटारीनें एकशेंपंचेचाळीस मैलांचा प्रवास एका रात्रींत करून लखनौला आला.

## दुसरी कसोटी

**घणाखालतीं ठेवा किंवा राष्ट्रसभेच्या मुकुटांत ।**
**सत्त्व राखुनी तेज दावितो जवाहिर हा लोकांत ॥**

रात्रीं लाठीमारामुळें सर्वांग ठणकत असतां पहाट झाली. रात्रीचा प्रकार जगजाहीर होऊन असंख्य लोक दुसऱ्या दिवशींच्या प्रसंगाला तोंड द्यावयाला सज्ज झाले. हजारों माणसें चारचारांचा गट करून शिस्तीनें सुतकी सायमन सतकाचा निषेध करण्याकरितां स्टेशन-रस्त्यानें चालूं लागलीं. स्टेशनसमोर असलेल्या विस्तीर्ण मैदानाच्या एका बाजूस सरकारी लष्कर उभें होतें व दुसरीकडे कॉंग्रेसप्रेमी निःशस्त्र जनता सत्याग्रहाचें बल घेऊन सिद्ध होती. तो प्रसंग लोकांना रणाप्रमाणें भासला. सरकारी अंमलदार लोकांवर भीषण हल्ला करण्याची संधि पाहात होते, तर लोक पाशवी सरकारच्या लाठीहल्ल्याला अहिंसावृत्तीनें उत्तर कसें द्यायचें ह्याचा विचार करीत होते. वीरवृत्ति दोहोंकडे सारखीच होती, पण एक क्रौर्याच्या पोटीं जन्मास आली होती, तर दुसरी अन्यायाची जाणीव जी सात्त्विक हृदयांत उत्पन्न होते तिच्या पोटीं उत्पन्न झाली होती. एका समुदायाला प्रतिक्षणीं अन्यायी पापाचे घडे जिचे भरत आले आहेत, अशा साम्राज्य राक्षसीचा आश्रय होता, तर दुसऱ्या समुदायाला प्रतिपदेच्या चंद्राप्रमाणें

***********************************************

प्रतिक्षणीं वाढणाऱ्या कॉंग्रेसदेवतेचा आधार होता. ह्या देवतेचा आवडता पुत्र आज अभिमन्यूप्रमाणें लढण्यास सज्ज होऊन राहिला होता. अशा रणांगणांत कांहीं पराक्रम गाजवावा म्हणून नव्हे, तर कांहीं मौज पाहावी, ज्या पक्षाची बाजू घसरेल त्याची टवाळी करावी, अशा वृत्तीचे तमासगीर बघे लोक असतात. ते भर मैदानांत हळुहळू घुसूं लागले, त्याबरोबर घोडे स्वार व पायदळ ह्यांनीं समोरील निःशस्त्र लोकांवर चाल केली. हातांतील दणकट काठ्या परजित, दांत ओंठ खात ते धावून आले. शेवटच्या क्षणाला त्यांनीं घोड्यांचे लगाम खेंचले, त्यामुळें घोडे मागील पायांवर खडे होऊन त्यांचे पुढील पाय दगडाप्रमाणें निश्चिल उभे राहिलेल्या पुढारी लोकांच्या डोक्यांवर थयथयूं लागले. वाचकहो, कल्पना करा, ते लष्करी थोराड घोडे छातीवर येऊन त्यांनीं आपले पुढील पाय आपल्या डोक्यावर उभे केले आहेत, भीषण चेहेऱ्याचे स्वार हातीं दंडुके घेऊन आपल्या अंगावर उगारीत आहेत, अशा वेळीं कोणाला भय उत्पन्न होणार नाहीं ? मागें हटून देहाचा बचाव करण्याची नैसर्गिक वृत्ति कोणाचीही बळावली असती, पण आमचे पुढारी तुमच्याआमच्यासारखे सामान्य धैर्याचे नव्हते. हिंदी राष्ट्राची ती परीक्षा होती. तुरुंगांत कोंडाल तरी भिणार नाहीं, घोडे अंगावर सोडाल तरी स्थान सोडणार नाहीं असें बेदरकारपणें नोकरशाहीला बजावण्याचा तो प्रसंग होता. नशीब देशाचें कीं अशा प्रसंगीं रणावर टिकणारे पुढारीच आम्हांला त्या वेळीं लाभले. लवकरच मारपीट सुरू झाली, दंडुक्याचे तडाखे उडूं लागले; समोरच्या पोलिस अधिकाऱ्याला घोड्यावरून ओढून आपण त्याच्या जागीं स्वार होणें हें कितीतरी सुलभ होतें; पण तसें करण्यानें शिस्तीचा भंग झाला असता. आत्मसंयमन न करतां पुढाऱ्यांनीं त्या वेळीं जर चढाई केली असती, तर लोकांवर गोळीबार होऊन भयंकर प्रसंग ओढवता. पुढाऱ्याला संमयनाची संवय नसेल तर अशा प्रसंगीं लाखों अनुयायांचा घात व्हायला वेळ लागत नाहीं. हातवारे करून चार व्याख्यानें जोरदार भाषेंत देतां आलीं कीं मनुष्य खरा पुढारी होत नाहीं. धैर्य, त्याग, दूरदर्शीपणा व संकटांत संयम हे गुण अंगीं बाणल्याशिवाय पुढारीपण मिरविणें व्यर्थ आहे.

पुष्कळ मार सहन केल्यावर लोकांची रांग पांगून न जातां थोडी मागें हटली व पुन्हा शंभर फुटांवर ठाण मांडून उभी राहिली. इतक्यांत सायमन कमिशन मोटारींतून गुपचुप चोरट्याप्रमाणें चालतें झालें. जातां जातां लोकांनीं त्यांना ह्या भीषण परिस्थितींत काळीं निशाणें दाखवावयास कमी केलें नाहीं.

*********************************************

कुणी कुणी असें विचारतात कीं "तुम्हीं काळी निशाणें दाखविलींत ह्यांत काय पुरुषार्थ केलात? सायमन कमिशन देशांत हिंडावयाचें तें हिंडलेंच कीं नाहीं? साक्षी द्यायला त्यांना कांहीं लोक कमी पडले नाहींत, व शेवटीं भला मोठा रिपोर्ट प्रसिद्ध व्हायचा तो झालाच; मग हा फार्स कां? फुकट दीडदमडीच्या शिपायांकडून मार खाऊन आपली किंमत मात्र कमी करून घेतलीत." अशा तऱ्हेच्या विचारसरणीच्या लोकांना जितराष्ट्र स्वातंत्र्य कसें मिळवतें ह्याची कल्पना नसते. जितराष्ट्राला देशाचें स्वातंत्र्य एकच लढाई करून मिळत नसतें. प्रथम त्यास नैतिक विजय संपादन करावा लागतो. गुलामगिरींत जे अनेक वर्षें खितपत पडले त्यांचें धैर्य गलित झालेलें असतें. प्रतिकाराची तर गोष्ट राहूं द्या, पण झालेला अन्याय तोंडानें बोलून दाखविण्याचें धैर्य गुलाम राष्ट्राच्या अंगीं असत नाहीं. लो. टिळकांनीं जर कांहीं विशेष गोष्ट केली असेल, तर सामान्य लोकांना अन्यायाबद्दल प्रथम ओरड करावयास व शेवटीं स्वराज्य मागावयास शिकविलें. लो. टिळकांना पहिली शिक्षा कशाकरितां झाली बरें? इंग्रजांनीं केलेले अन्याय शिवाजीच्या तोंडीं घातलेल्या कवितेला प्रसिद्धि दिली म्हणून. म. गांधींनीं त्यांच्यापुढें जाऊन अन्यायी कायदे निर्भयपणें तोडून टाकण्यास जनतेला शिकविलें. ह्यानंतरची पुढची एक पायरी आज चढावयाची होती. अन्यायाचा निषेध सामुदायिक रीतीनें करीत असतां शारीरिक संकट आलें तरं तें निर्भयपणें सोसण्याची तयारी दाखविणें ही होय. तुरुंगांत पुष्कळांनीं हाल आपेष्टा सहन केल्या आहेत, पण उघड्या मैदानावर पळून जाण्याला पूर्ण सवड असतां निर्भयपणें लाठीहल्ला होऊं द्यायचा, पण अन्यायाच्या निषेधार्थ ठेविलेलें पाऊल मागें घ्यायचें नाहीं, हा धडा पंडितजींनीं राष्ट्राला शिकविला. राष्ट्रांत अशा रीतीनें धैर्य उत्पन्न झालें म्हणजे मग पुढील युद्धें सोपीं होतात. ह्या दृष्टीनें लखनौच्या लाठीहल्ल्याला महत्त्व फार आहे. पंडितजींनीं घालून दिलेलें वळण राष्ट्रानें पुढें उत्तम रीतीनें गिरविलें व स्वातंत्र्याचा मार्ग मोकळा केला.

अशा रीतीनें मोठा नैतिक विजय संपादन करून कॉंग्रेसची मिरवणूक आपल्या विजयी सेनापतीसह परतली. नंतर लोक घरोघर गेले. इकडे वृद्ध मोतिलालजी घरीं काळजी करीत बसले होते. इतक्यांत आपला पुत्र एखाद्या विजयी वीराप्रमाणें जखमी पण सुहास्य वदनानें परत आला हें पाहून त्यांना हायसें वाटलें.

**********************************************

आवेशाची वेळ निघून गेल्यावर त्या कॉंग्रेस वीरांचीं अंगेंप्रत्यंगें खूप दुखूं लागलीं. पंतप्रधानांचें आसन मंडित करणारे गोविंदवल्लभपंत ह्यांना तर खूपच मार बसला होता. कारण ह्यांच्या बुद्धिवैभवास शोभणारें त्यांचें प्रचंड शरीर अशा लढाईंत शत्रूच्या नजरेंत चांगलेंच भरलें होतें व त्यांच्यावर हल्ला चढविणें शत्रूस सोपें गेलें. ह्या लढाईंत युरोपियन सार्जेंटांनींच जास्त क्रौर्यानें हल्ला चढविला होता. इंडियन लोक हल्ला करीत, पण त्यांत त्वेष दिसत नसे आणि तेंही साहजिकच होतें. पोटाकरितां सांगितल्या हुकुमाचे ते चाकर असले तरी त्यांना स्पष्ट दिसत असे कीं, समोरचे लोक आपलेच भाईबंद आहेत. ह्या लोकांना जय मिळाला तर आपल्या कर्तबगारीला जास्त वाव मिळेल व आपलीं पोरें, लेंकरें सुखानें खातील.

घरीं आल्यावर आपल्या धीट पुत्राबद्दल मातेला, वीरपतीबद्दल कमलादेवीला व सवाई बेटा निघाला म्हणून मोतिलालजींना केवढें अभिमानाचें भरतें आलें असेल! लहानपणचा बुजरा जवाहर केवढा तरी धीट झाला व आज त्याच्या जीवावरचें केवढें संकट टळलें म्हणून त्यांच्या प्रेमळ माउलीनें त्यांच्यावरून तीनदां बोटें मोडलीं असलीं पाहिजेत.

## प्रकरण पंधरावें

# आवडतें काम

******************************

पंडितजींची इच्छा असो वा नसो, कॉंग्रेसची सरचिटणीशी त्यांना सोडून कांहीं दूर राहात नव्हती. ह्यामुळें त्यांना त्यांचें विशेष आवडतें जें सामाजिक स्वातंत्र्याचें काम–समाजसत्तावादाचें काम, तिकडे लक्ष देण्याला त्यांना फुरसतच होत नाहीं. इंग्लंडमध्यें असतां त्यांचें लक्ष प्रथम समाजसत्तावादाकडे लागलें. त्या विषयाचा त्यांनीं खूप अभ्यास केला. शेतकऱ्यांच्या चळवळींत भागही घेतला. पुनश्च युरोपमध्यें गेल्यावर ह्या विषयाची पुनरावृत्ति केली व हिंदुस्थानांत आल्यावर शेतकरी व मजूर चळवळीकडे लक्ष द्यावयाचें त्यांनीं

ठरविलें. पण त्याप्रमाणें घडलें नाहीं. तरी पण संपाविषयीं ते सहानुभूति दाखवीत, शेतकरी सभांना हजर राहात. पुष्कळशा युवक परिषदा त्यांच्या अध्यक्षतेखालीं भरत होत्या. ह्या सभांतून ते राष्ट्रवादावरून आपणाला सामाजिक सत्तेकडे जावयाचें आहे असें प्रतिपादीत. ह्याच काळांत हिंदुस्थानांत मजूर चळवळीसही जोर येत होता. मोठमोठे संप होत होते. मुंबईच्या मार्क्सवादी संस्थांतील पुढारी कॉंग्रेसवर सडकून टीका करीत. कलकत्ता अधिवेशनापूर्वीं झारिआ येथें ट्रेड युनिअन कॉंग्रेस झाली. त्यांत पंडितजींनीं कांहीं भाग घेतला होता. ह्यानंतर थोडक्याच दिवसांनीं सरकारनें मजूर पुढाऱ्यांना पकडून मिरत येथें त्यांच्यावर अनेक वर्षें लांबणारा असा खटला भरला. ह्या लोकांना सहाय्य देण्याकरितां एक कमिटी नेमली होती. परंतु आरोपींच्या विलक्षण मतांमुळें—श्रीमंतांना नामशेष करण्याच्या गप्पांमुळें बचावाकरितां पैसे मिळविणें बिकट काम झालें. ह्या कमिटीचे अध्यक्ष पंडित मोतिलालजी असून चिटणीस जवाहरलाल होते. वकिलांचें सहाय्य पुढें फुकट मिळेना, पैसा जमेना व आरोपींची बचाव करण्याची प्रत्येकाची पद्धत वेगळी. स्वतःचा बचाव करण्यापेक्षां आपल्या मताचें पुराण लिहून तेंच कोर्टांत ऐकविण्याची प्रत्येकाला हौस. अशा स्थितींत ही समिति मोडली.

नेहरू-रिपोर्टाला कलकत्ता अधिवेशनांत मान्यता मिळायची होती. मोतिलालजी व जवाहरलाल ह्यांच्यांत वसाहतीचें स्वराज्य कां पूर्ण स्वातंत्र्य ह्यावरून खटका उडायची वेळ आली होती. कोणीच मागें घेण्यास तयार नव्हतें. राष्ट्राच्या ध्येयाचा तो प्रश्न होता. तेथें वैयक्तिक व नाजुक भावनांना स्थान देऊन कसें चालेल असें जवाहरलाल म्हणत. मोतिलालजींची दृष्टि व्यावहारिक राजकारणावर खिळलेली, तर पंडित जवाहरलाल राष्ट्राच्या ध्रुव ताऱ्यावरून दृष्टि हलूं न देण्याविषयीं खबरदार. दोघांनाही एकमेकांचा दृष्टिकोण कळत होता. सर्वपक्ष अनायासें साम्राज्यांतर्गत स्वराज्यावर कां होईना ? पण एक होतात ना ? एकीचें बल मोठें. त्याची किंमत व्यावहारिक बाजारांत ध्येयवादाच्या मुदतीच्या हुंडीपेक्षां केव्हांही जास्त, ही विचारसरणी छोट्या साहेबांना पटे, पण त्यांचें ध्येयवादी मन आपलें इच्छित कांहीं सोडीना. शेवटीं कलकत्त्यास अशी तडजोड निघाली कीं, सरकारनें नेहरू-रिपोर्टाला एका वर्षात संमति दिली नाहीं तर राष्ट्रानें स्वातंत्र्याचें ध्येय मान्य करावें. पुढें खुल्या अधिवेशनांत पंडितजींनीं नेहरू-रिपोर्टाला विरोध केला, पण तो नांवापुरताच होता.

**************************************************

अशा रीतीनें ह्या अद्वितीय पितापुत्रांनीं ओढलेली कॉंग्रेसची गाडी पूर्ण स्वातंत्र्याकडे दृष्टिक्षेप करून चालविली व साम्राज्यांतर्गत स्वराज्य मान्य करा, पदरांत टाका नाहीं तर – इतकें म्हणण्यापर्यंत पाळी आणली ह्यांत संशय नाहीं.

आतांपर्यंत कॉंग्रेसनें अनेक चळवळी केल्या पण १९३० सालीं जी चळवळ झाली ती आपल्या राष्ट्राला व जगाला अभूतपूर्व अशी होती. ह्या भारतीयुद्धाकडे आतां वाचकांनीं वळून त्यांत आपल्या चरित्रनायकांनीं जी कामगिरी केली तिकडे अवधान ठेवावें.

पंडितजींचें चरित्र म्हणजे "प्रति पर्व रसोदयः" असें आहे. पण तें तसें रंगविणारा पाहिजे.

## प्रकरण सोळावें

# भारतीयुद्धाचें उद्योगपर्व

****************************

पांडवांच्या वनवासाचा काल संपल्यावर दुर्योधनाकडे पांडवांनीं निरोप पाठविला कीं, आमच्या हक्काचा राज्यविभाग आम्हांला देऊन टाक. पांडवांप्रमाणें कॉंग्रेसनेंही कलकत्त्यास अशीच मागणी केली होती कीं एका वर्षांत साम्राज्यांतर्गत स्वराज्याला सरकारनें मान्यता दिली नाहीं तर आम्ही संपूर्ण स्वातंत्र्याचें ध्येय जाहीर करूं. युद्धाशिवाय सुईच्या अग्रावर मावेल इतकी जमीन मी देण्यास तयार नाहीं असें जें दुर्योधनानें पांडवांच्या शिष्टाईला उत्तर दिलें, त्याचाच ध्वनि कॉंग्रेस शिष्टमंडळास दिल्लीच्या व्हाईसरॉयच्या बंगल्यावर प्रतीत झाला. गोलमेज परिषद बोलावून कालहरण करण्याचा त्यांचा बेत होता. पण कॉंग्रेस सरकारचे डाव ओळखून होती. सरकारशीं सामना द्यावा लागणार हें स्पष्ट दिसत होतें. ह्या सामन्याची जबाबदारी घेण्यास गांधींव्यतिरिक्त दुसरा कोणीही पुरुष राष्ट्रास दिसेना. म. गांधींना लाहोर कॉंग्रेसचें आधिपत्य स्वीकारण्याची विनंती करण्यांत आली, पण त्यांनीं स्पष्ट नकार देऊन पंडित जवाहरलालजींचें नांव अध्यक्षपदासाठीं स्वतःच सुचवून आग्रहास जागाच ठेवली नाहीं. ह्या सूचनेस ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीची अनुमति मिळून पंडितजींचें नांव नियोजित अध्यक्ष म्हणून जाहीर झालें.

## लोकप्रिय अध्यक्ष

ह्या कालांत पंडितजींची लोकप्रियता पराकोटीला गेली होती. कळकळ, धडाडी, निरलसता व निष्पाप अंतःकरण त्यांच्या गुणांची ओळख राष्ट्राला उत्तम झाली असल्याकारणानें, ह्या निवडणुकीनें सर्व लोकांस मोठा आनंद झाला. रामचंद्राला यौवराज्याभिषेक उद्यां होणार ह्या वार्तेचें अयोध्या-जनांनीं जसें स्वागत केलें तसेंच स्वागत ह्या वार्तेचें हिंदवासियांत झालें. तरुणांत नवचैतन्य खेळूं लागलें, धडाडीचा असून गांधींच्या बाहेर जाणारा नाहीं म्हणून वडील मंडळींनीं ह्या वार्तेस, योजनेस मान डोलावली. उत्तर-भारतीय शेतकन्यांचे ते तर अनभिषिक्त राजे, तेव्हां "अपना राजा कॉंग्रेसी सभापती बन गया" म्हणून तेही आनंदानें बेहोष झाले. बालसूर्य उदयाचला-वर आला म्हणजे द्विजगण आपापल्या पर्णासनांवर बसून सूक्तें गाऊं लागतात, परंतु कांहीं प्राण्यांना त्यांचें तें तेज सहन होत नाहीं, ते त्यांस शाप देत गिरिकंदरांत जाऊन बसतात. तशी स्थिति हिंदी राजकारणांत ज्यांची भूमिका दिवाभीतांची आहे त्यांची झाली. ते घूत्कार करीत राष्ट्राला बजावते झाले, "पाहा बरें, हा जवाहरलाल प्रामाणिक असला, तरी आहे अचपळ व दूरचें राजकारण ह्याला कळत नाहीं. कॉंग्रेसची नाव हा खडकावर नेऊन आदळील."

ह्या निवडीनें गांधींजींएवढा जर दुसऱ्या कोणास आनंद झाला असेल तर तो मोतिलालजींना. त्यांचें जवाहरलालशीं राजकारणांत पुष्कळ वेळां पटत नसे, पण आपल्यामागून आपला मुलगा कॉंग्रेसच्या विलोभनीय गादीवर येतो आहे हें पाहून त्यांच्या आनंदास पारावार राहिला नाहीं. ते आपला भाव वाचेनें सहसा प्रगट करीत नसत. पण तो आनंद अनेक तऱ्हेनें घरांत प्रगट झाल्या-शिवाय राहात नसे. स्वरूपाराणींना आपल्या मुलावर कॉंग्रेस आपला मुकुट ठेवणार म्हणून आपली कूस धन्य झालीशी वाटली. बहिणींना आनंद होऊन त्यांनीं पंडितजींची थट्टा सुरू केली असल्यास नवल नाहीं. कमलादेवींच्या वृत्तीचें यथार्थ चित्र कसें काढावें बरें! जनहृदयसिंहासनावर आपला पति अधिष्ठित होणार म्हणून तिच्या मनावर हर्षाच्या उर्मी एकीकडून उठत होत्या, तर तिच्या राजकारणी मर्मज्ञ बुद्धीनें हळूच सांगितलें कीं, "कमला, तुझ्या पतीला प्राप्त होणारा मुकुट सोन्याचा नाहीं बरें, तो कांट्यांचा आहे. लाहोरला जी तयारी

******************************************************

चालली आहे ती स्वागताची नसून ती बलिदानाची आहे असें समज." अशा तऱ्हेचे सुखदुःखात्मक विचार मनांत येऊन कमलादेवीची उशी कित्येकदा अश्रूंनीं भिजली असल्यास नवल नाहीं.

लाहोरला पंडितजींची मिरवणूक मोटारींतून न निघतां वीरोचित अशी अश्वारूढ होऊन निघाली. त्या वेळीं जनता हर्षभरानें नुसती वेडावून गेली होती. शेवटीं ऑल इंडिया काँग्रेस भरून नेहमींप्रमाणें मावळत्या अध्यक्षांनीं थोडेंसें भाषण करून जे शब्द शेवटीं उच्चारले ते ऐतिहासिक होऊन राहिले आहेत. "बापाचें राहिलेलें काम मुलगा पुरें करील." किती अर्थपूर्ण शब्द हे! पराक्रमी पण विलासी मोतिलालजींना उतार वयांत पदोपदीं दिसूं लागलें कीं, राष्ट्रांतील कर्तबगार पुरुषांनीं विलासी जीवन टाकून राष्ट्राच्या स्वातंत्र्याकरितां सरकारशीं निकराचे दोन हात हे केलेच पाहिजेत. सनदशीर राजकारणाला हिंदुस्थानांत वाव कोठें आहे ? सनदच जेथें नाहीं तेथें राजाशीं सनदशीर भांडण भांडावयाचें कसलें ? ह्या गोष्टीचा त्यांस प्रत्यय येऊन चुकला होता. आपण आपली बुद्धिमत्ता, कर्तबगारी पहिल्यापासूनच टिळकांप्रमाणें सरकारशीं झुंजण्यांत खर्च केली असती तर–पण आतां तो विचार करून काय करावयाचें. जेवढें आज मला सत्तराव्या वर्षी करतां आलें तेवढें मी केलें आहे व जें राहिलें तें करण्याला राष्ट्राच्या स्वाधीन माझा लाडका जवाहरलाल करीत आहें. पंतांच्या शब्दांत मोतिलालजींचे उद्गार घातले तर शोभणार नाहींत काय ?

**काँग्रेस गंगे माते, माझा नोहे तुझाचि हा बाळ।**
**जतन करी गे यातें, होउं न देई कधींहि आबाळ॥**

मोतिलालजींना वर सांगितलेले शब्द मुखावाटें काढतांना गहिंवर आला व ते आपली अध्यक्षपदाची जागा सोडून शेजारीं जाऊन बसले. दुसरीकडून जवाहरलाल उठून अध्यक्षाच्या खुर्चीवर कांहींशा संकोचानें जाऊं लागले. इतक्यांत पंडितजींची वृद्ध माता उठून पुढें आली. तिच्याच्यानें राहवेचना; तिनें घाईघाईनें मुलाच्या तोंडावरून हात फिरवला व दृष्ट लागूं नये म्हणून जुन्या पद्धतीनें बोटें मोडलीं. सर्व मंडळी तो प्रसंग मोठ्या सहृदयतेनें पाहात होती. इतक्यांत पंडितजींनीं तिचा हात झिटकारून, "ये क्या पागल जैसे करती हो" असें म्हणाले, त्यामुळें गंभीर प्रसंग उद्भवला. वृद्ध प्रेमळ

माउलीचा भर सभेंत अपमान झालासा दिसूं लागला. इकडे पंडितजींना आपलें कौतुक घरच्या माणसाकडून तेथें करून घ्यायला नको होतें. बापामागून मुलगा काँग्रेसच्या गादीवर येतो व आई गहिंवरून त्याचें अभिनंदन करते, ह्यामुळें मत्सरी दृष्टीला काय वाटलें असेल ? काँग्रेसमध्यें वंशपरंपरा निर्माण होऊन तिचें प्रातिनिधिक स्वरूप नष्ट होणार काय ? जवाहरलालजी म्हणजे पक्के लोकराज्याचे कैवारी. त्यांनीं मोतिलालजींमागून अध्यक्षपद जें स्वीकारलें तें निव्वळ कर्तव्यबुद्धीनें. अशा स्थितींत आपल्या निवडणुकीला कुलगौरवाचा वास येऊं नये म्हणून त्यांनीं आपल्या आईचा हात झिटकारला होता. आईचा अपमान करावा अशी वृत्ति पंडितजींमध्यें लवलेश नव्हती, आणि ती कशी असेल ? त्यांच्या सर्व विश्वासाचें स्थान आई होतें. मोठेपणींसुद्धा थकून भागून आल्यावर घरीं जिच्या मांडीवर लाडिकपणानें त्यांनीं लोळण घ्यावी, त्या आईचा शुभ हात पंडितजी झिटकारणें शक्यच नव्हतें. पण हात झिटकारला गेल्यामुळें वर सांगितल्याप्रमाणें गंभीर प्रसंग निर्माण झाला. कोणालाच तें कृत्य आवडलें नाहीं. मोतिलालजींचें मन आज अगदीं मृदु झालें होतें. त्यांत ह्या प्रसंगानें भर घातली. सर्व सभा तटस्थ झाली. इतक्यांत राष्ट्राच्या आणीबाणीच्या प्रसंगीं ज्यांची बुद्धि प्रसंग निभावून नेत आली, त्या गांधीजींचें सुप्रसिद्ध निर्मल हास्य ह्या वेळीं उपयोगीं पडलें. मुलानें हात झिटकारल्यामुळें माता गंभीर होत आहे न होत आहे तोंच गांधीजी मोठ्यानें हसले. झालें, जिकडे तिकडे हास्याच्या लहरी उमटल्या. पंडितजी पण खुदकन् हसले व ह्यामुळें मधुर वातावरण निर्माण झालें. समयज्ञ पुरुषाचा एक शब्द, एखादी कृति किंवा गांधीजीसारख्यांचें हास्य गंभीर प्रसंगाला कशी कलाटणी देतात ह्याचें हें एक उदाहरण आहे.

सीताशुद्धीकरितां निघालेली वानरसेना दक्षिण समुद्रावर आल्यावर शंभर योजनें उड्डाण करून परतीराला जाण्याचा प्रसंग उद्भवला, त्या वेळचें रामायणांतलें वर्णन बहारीचें आहे. कोणी म्हणे मी दहा योजनें उडी मारतों, कोणीं विसाची हिंमत केली, कोणी पन्नासावर मजल नेली, कोणीं ऐंशीचा हिय्या दाखविला, कोणीं शंभर योजनें जाण्याचा विडा उचलला, पण मग मात्र परत येण्याची शक्ति उरणार नाहीं असें सांगितलें. त्याचप्रमाणें लाहोरास सरकारशीं सामना द्यावयाचा ठरला, पण ह्या वीरोचित प्रसंगाला साजेशी योजना कोणाजवळ नव्हती. शेवटीं 'बुद्धिमताम् वरिष्ठ' अशा महात्माजींना सेनापतिपदाची सुपारी देण्याचा ठराव पास झाला.

************************************************

लाहोर कॉंग्रेसमध्यें स्वातंत्र्याचा ठराव ३१ डिसेंबरला रात्रीं बारा वाजतां झाला. शेवटपर्यंत व्हाइसरॉयचें अनुकूल उत्तर येईल अशी वेडी आशा कोणीं कोणीं धरली होती. ती फोल होतांच स्वातंत्र्याची घोषणा करून पंडितजी प्रतिनिधींसह मंडपाबाहेर आले व त्यांनीं स्वातंत्र्याचा झेंडा फडकाविला. जुनें वर्ष संपून नवें लागणार होतें, असा तो संधिकाल होता. ह्या कालाच्या वेळीं पंडितजींनीं जनतेला बजावलें कीं, "हा झेंडा उंच राखणें हें तुमचें काम आहे." गुलामगिरींत पडलेल्या एका महान् राष्ट्राला एका झेंड्याखालीं आणण्याचा कॉंग्रेसनें जो पन्नास वर्षें प्रयत्न चालविला होता, त्याची परिपूर्तता आजच्या ठरावानें होत होती. हा ऐतिहासिक प्रसंग ज्यांनीं पाहिला ते धन्य होत !

लाहोर येथें स्वातंत्र्याचा ठराव पास झाल्यावर राष्ट्राचें हेंच उच्च ध्येय ह्या अफाट देशाच्या कानाकोपऱ्यांत दुमदुमवावें म्हणून ता. २६ जानेवारीला सर्व राष्ट्रानें "स्वातंत्र्य दिन" पाळावा म्हणून अध्यक्षांनीं फर्मान काढलें. ह्या वेळेपासून मोठमोठाले दिन आसेतु हिमाचल एकाच दिवशीं एकाच वेळीं पाळण्याची प्रथा पडली. राजा कोण तर ज्याच्या एका शब्दाबरोबर दलाच्या हालचाली होतात तो. ह्या व्याख्येप्रमाणें आमच्या राष्ट्रपतीच्या हुकुमाबरोबर देशाच्या कोनाकोपऱ्यांत स्वातंत्राचा जयघोष झाला.

ह्या प्रसंगाकडे दोन व्यक्ति लक्ष लावून पाहात होत्या. एक यमुना नदीवरचे दिल्लीपति व्हाइसरॉय व दुसरा साबरमती तीरावरील "नंगा फकीर." प्रसंग एकच, पण त्यानें दोन भाव निर्माण केले. हिंदुस्थान ताब्यांत आहे तोंपर्यंतच आपलें साम्राज्य, असें मानणाऱ्या राजप्रतिनिधीला वाटलें कीं, ही स्वातंत्र्याची घोषणा म्हणजे साम्राज्याचा "राम बोलोच" होय. निराशा, संभ्रम, भीति ह्या भावना व्हाइसरॉयच्या महालांत पसरल्या. ह्याच्या उलट साबरमतीच्या आश्रमांत काळजींतून सुटल्याचा निश्वास बाहेर पडला. कारण स्वातंत्र्याचा ठराव आपण पास केला खरा, पण राष्ट्र त्याला उचलून किती धरतें हा प्रश्न महात्माजींपुढें होताच. स्वातंत्र्याच्या घोषणेचा सर्वत्र प्रतिध्वनि उमटल्याबरोबर —

"उठल्या उत्साहाच्या त्या शांत महोदधिवरी लहरी"

तो उत्साह अशातशांचा होता काय ? तो गांधींचा उत्साह होता. मेल्या मढ्यांना जीवंत करून त्यांच्याकडून शर्तींचें युद्ध करवून घेण्याचें ज्यांचें सामर्थ्य त्या गांधींच्या अंगांत उत्साहाचा संचार झाला. ज्यांनीं आफ्रिकेंत मजूर संघटित

**************************************************

केले व त्यांच्याकडून सत्याग्रह करवून तेथील सरकारला ज्यांनीं नमायला लावलें, त्या गांधींचा तो उत्साह होता. ज्यांनीं असहयोगाच्या चळवळीनें हिंदुस्थानचा भूभाग हलविला, राष्ट्रांतील विचारवंतांना ज्यांनीं भूकंपाचे धक्के दिले अशा गांधींचा तो उत्साह होता.

साबरमतीच्या तीरावर बसून आतां एक "नंगा फकीर" निःशस्त्र युद्धाची तयारी, अवाढव्य युद्धसामुग्रीनें सुसज्ज अशा जगांतील बलिष्ठ साम्राज्याशीं सामना देण्याकरितां करीत होता. जगाला हें दृश्य अद्भुत वाटलें, म्हणून छप्पन्न देशाचे वार्ताहर साबरमती तीरावर हा चमत्कार पाहाण्याकरितां जमा झाले.

एकीकडे तोफा, बंदुका, विमानें तर दुसरीकडे एकही शस्त्र नाहीं; एकीकडे वैर, असूया इत्यादि भावनांचा कल्लोळ, तर दुसरीकडे अहिंसक शमप्रधान वृत्ति; एकीकडे दुसऱ्याला लुटून त्यावर जगण्याची इच्छा, तर दुसरीकडे दरिद्री नारायणाची काळजी; असें अपूर्व युद्ध गांधी लढविणार होते. गांधींनीं पूर्ण विचार करून आपले सैनिक घेऊन व्हाइसरॉयच्या वाड्यावर चाल करून जाण्याचा आपला बेत वर्किंग कमिटीला कळविला. पण ह्या धाडशी कल्पनेला कोणाची संमती मिळेना. मग मिठाचा कायदा मोडण्याची कल्पना त्यांनीं सुचविली. पुष्कळ वाटाघाटीनंतर तिला मान्यता देण्यांत आली. थोराची गोष्ट न्यारी. ते जी गोष्ट हातीं धरतील त्यांत चैतन्य निर्माण करतील. टिळकांच्या अगोदर प्रागतिक मद्यपानबंदीची चळवळ बरेच दिवस करीत होते. पण तें सर्व सोमाळें पाणी, त्यांत कांहीं जीवन भरेना. तीच चळवळ टिळकांनीं हातीं घेतांच केवढी खळबळ उडविली, हें १९०८ सालचे दिवस ज्यांनीं पाहिले आहेत तेच सांगूं शकतील. ख्यालीखुशालीच्या गणपतीउत्सवांना हातीं धरतांच सरकारचें धाबें टिळकांनीं दणाणून सोडलें. थोरांच्या प्रकृतींतच चैतन्य असतें. ह्यामुळें ते ज्या गोष्टीला हात लावतील ती चैतन्यमय बनते. गांधीजींनीं प्रथम दर्शनीं मनांत न भरणाऱ्या मिठाच्या प्रश्नांत कल्पनातीत चैतन्य असेंच उत्पन्न केलें.

मिठाचा कायदा मोडण्याकरितां गांधीजी जे साबरमतीच्या आश्रमाचा कायमचा निरोप घेऊन बाहेर पडले ते एकटे बाहेर पडले नाहींत, तर हिंदुस्थानांतील यच्चयावत् चैतन्यमय सात्त्विक वृत्तीचा मेळा घेऊन ते बाहेर पडले व जगाला त्यांनीं सांगितलें कीं,

"गातील जिला सत्कवि, ऐशी होईल सर्वथा आजी."

प्रकरण सतरावें

# स्वातंत्र्ययज्ञाचें होमकुंड : १

******************************

लाहोर काँग्रेस आटोपून पंडितजी अलाहाबादेस आले, त्या वेळीं प्रयागास कुंभमेळ्याची यात्रा भरली होती. गंगास्नानास आलेले यात्रेकरू आनंदभवनाची यात्रा केल्याशिवाय परत जात नव्हते. ह्याचा अर्थ मनु पालटला होता. श्रीगंगेचें महात्म्य काँग्रेस गंगेला प्राप्त झालेलें होतें. लोकसमुदाय थव्याथव्यानें आनंद-भवनांत येई व पंडितजींना बाहेर येऊन काँग्रेसचा संदेश सांगावा लागे. पुढें पुढें थकवा आल्यामुळें नमस्कारावर भागवावें लागे. पण त्यालाही मर्यादा होती. नमस्कार करावयास आलेल्या कृष्णस्त्रियांना आशीर्वाद देतां देतां शेवटीं सुदामजीचा घसा कोरडा पडण्याची पाळी आली असें हरिदास जें वर्णन करतात त्याचा थोडासा अनुभव ह्या वेळीं आमच्या राष्ट्रपतींना आला.

युद्धाला आरंभ होण्यापूर्वी नमनाच्या बाणाचें पत्र गांधींनीं व्हाइसरॉयला पाठविलें. पण त्याचा उपयोग कांहीं झाला नाहीं. ह्यानंतर गांधी आपली सेना घेऊन दांडीच्या यात्रेस निघाले. अहमदाबादला ऑल इंडिया काँग्रेस कमिटीची सभा भरून अध्यक्षाला युद्धाकाळचे सर्वाधिकार देण्यांत आले. नंतर त्या समितीचे सभासद तुरुंगाच्या यात्रेकरितां वळकटी बांधण्याकरितां लगबगीनें आपापल्या घरीं परतले.

## आनंदभवनाचें स्वराज्यभवन झालें

हें युद्ध निकराचें करावयाचें ठरवून पुढारी बाहेर पडले होते. गांधीजींनीं आश्रमाचा त्याग केला त्याचबरोबर मोतिलालजींनीं "राजैश्वर्यानें नटलेलें" आपलें "आनंदभवन" काँग्रेसच्या चरणीं अर्पण करून त्याचें "स्वराज्यभवन" केलें.

काय मौज आहे पाहा, चाळीस वर्षांपूर्वी आयुष्याचें ध्येय यथेच्छ पैसा मिळवून उच्च दर्जाचे विलास भोगावे असें ठरवून आपल्या गृहाचें नांव ज्यानें आनंद-भवन ठेवलें तोच मनुष्य आयुष्याच्या शेवटीं आयुष्याचें ध्येय स्वराज्य ठरवितो.

**************************************************

ह्याला कारणें काय तर देशाची परिस्थिति, गांधीजींची मोहनी हीं आहेतच, पण तिसरें जबरदस्त कारण म्हणजे मुलाची स्वातंत्र्यलालसा. आनंदउपभोगावरून स्वराज्याच्या चळवळींत बापाला ओढणारा पुत्र धन्य नव्हे काय ? ह्या आनंद-भवनाच्या सुधारणेंत मोतीलालजींनीं कित्येक दिवस घालविले होते. किती पैसा त्यापायीं खर्चला ह्याचा हिशेब नव्हता. असें तें विलासमंदिर आपल्या विसाव्याचें स्थान पंडितजींनी देशाला देऊन टाकूनच नंतर स्वातंत्र्ययुद्धाच्या यज्ञाची दीक्षा घेतली. हौसी वृत्ति स्वराज्यनिष्ठ झाली हें दर्शविणारी म्हणून इतिहासांत ही देणगी गौरवास प्राप्त होईल.

दांडी यात्रा पुरी करून गांधींनीं मिठाचा कायदा ज्या दिवशीं मोडला व राष्ट्रला तो मोडण्याविषयीं आज्ञा केली त्या दिवशीं कदंब वृक्षाच्या कळ्या जशा एकदम फुलतात किंवा विजली घरांतलें बटन दाबतांच शहरांतले हजारों दिवे जसे एकसमयावच्छेदेंकरून लागतात, त्याप्रमाणें सर्व ठिकाणचीं जनचित्तें थरारून जाऊन कायदेभंग भराभर सुरू झाले. पंडितजींच्या घरच्या बायकांनीं स्वयंसेवकांत आपलीं नांवें अगोदरच नोंदवलीं होतीं. त्यांनीं स्वतः बेकायदा मीठ तयार करून विकलें. लगेच त्यांस अटक होऊन शिक्षाही झाली.

## पुनश्च यात्रा

मिठाचा कायदा मोडला म्हणून राष्ट्रपतींना शिक्षा झाल्यावर अध्यक्षपदाची धुरा पुनश्च मोतिलालजींना घ्यावी लागली. मोतीलालजी जरी ह्या वेळीं वृद्धत्वामुळें अशक्त झाले होते, तरी त्यांनीं कॉंग्रेसचें कार्य इतकें जोरानें चालविलें होतें कीं,

वृद्धतरुण भीष्मार्जुन परि न रणीं न्यून अधिक तें गमले।

असें तरुण पुत्राच्या मागून त्याच्या वृद्ध पित्यानें चालविलेलें दारुण युद्ध पाहून वाटलें. मध्यंतरीं त्यांनीं मुंबईची खेप केली. तेथें जाऊन थोडा ढिला पडलेला परदेशी मालावरचा बहिष्कार त्यांनीं दृढ केला. पण ते ह्या दगदगीनें आजारी पडून घरीं आले तोंच त्यांच्यावर खटला होऊन त्यांना शिक्षा झाली. पितापुत्रांची पुनश्च तुरुंगांत भेट झाली.

ह्या कालांत पंडितजींची माता व भगिनी उन्हातान्हांतून हिंडून कापडाच्या दुकानांवर निरोधन करीत. कमलादेवीनें कायदेभंगाच्या कार्याची संघटना इतकी

************************************************

सुंदर चालविली होती कीं, ती पाहून मोतिलालजींना आपल्या सुनेनें " वंश धन्य केला " असें वाटत असे. परंतु उन्हांत मुली हिंडूं लागल्या म्हणजे वृद्ध मोतिलालजींनीं गंभीर आवाजानें म्हणावें, " इंदिरा, इतक्या उन्हाच्या कोठें ग निघाल्यांत ? "

त्यांचा असा नाखुशीचा आवाज ऐकला कीं ह्या तरुण मुलींनीं भराभर घरांत कोठच्याकोठें पळून दडून जाऊन बसावें व दादाजी कोठें बाहेर गेले म्हणजे मग इंदिरेला पुढें घालून इतर स्त्रियांनीं निघावें. मंडणमिश्रांच्या घरचीं सर्वच माणसें ज्याप्रमाणें तात्विक चर्चेत गुंतलेलीं असत, फार काय सांगावें तेथल्या दासी, शुकसारिका सुद्धा " स्वतः प्रमाण, परतः प्रमाण " ह्यांची चर्चा करीत असें सांगतात, त्याप्रमाणें आनंदभवनांतील, सर्वच मंडळींनीं आज यज्ञीय दीक्षा घेतली होती. त्याग करण्यांत कोणी कोणास हार जाणार नव्हता. वृद्ध मोतिलाल इकडे युद्धाचे नकाशे तयार करण्यांत दंग, तर त्यांची सहधर्मचारिणी उन्हांत निरोधन करण्यास सुसज्ज. जें नाजुक गौरवर्ण सुंदर शरीर मोटारीशिवाय कुठें बाहेर पडावयाचें नाहीं, तें आज डोकीवर नुसता पदर घेऊन उन्हांत दुकानांवर निरोधन करण्यास जाई. कंदुकलीलेनें जिचें शरीर दमावें, त्या राष्ट्रपतींच्या पत्नीनें – कमलादेवीनें स्वयंसेवकांची संघटना करीत रात्र बेरात्र, जेवणखाण पाहूं नये. कशिदा काढण्यांत ज्यांची चढाओढ लागावयाची त्या नणंदा भावजया आज कोण स्वयंसेवक जास्त नोंदवते ह्यांत अहमहमिका करून हातपाय दमवूं लागल्या होत्या. एका काळीं दिवाळीच्या दिवसांत मोतिलालजींचें घर दिव्यांनीं पेटलेलें दिसत असे, तें आज पेटलेल्या माणसांनीं खुलूं लागलें होतें. नेहरू घरानें त्यागवृत्तीचा पेट घेतल्याबरोबर देशभर असंख्य घरें पेटूं लागलीं. हें सर्व पंडितजींना तुरुंगांत कळत असे व मग त्यांच्या वृत्ति आनंदानें, अभिमानानें बहरून जात. सुभाषितांचा खरा अर्थ समजतो तो अशाच प्रसंगीं. एका पुत्रानें सर्व कुटुंब पुनीत कसें होतें: हें पंडितजींच्या चरित्रानें कळून येतें.

वडिल तुरुंगांत आल्यावर पंडितजींनीं त्यांच्या सेवेंत आपला वेळ घालवावा. यांची खोली साफ करावी, त्यांचे कपडे धुऊन आणून द्यावे. लाडकीं मुलें आपल्या वडिलांची सेवा क्वचितच करतात. त्यांत तीं श्रीमंतांचीं असलीं मग तर विचारूंच नका. पण खरी श्रीमंती कधींही ऐदी वा अविनयी नसते. इतिहास सांगतो कीं, शहाजी महाराजांच्या पालखीबरोबर शिवाजी अनवाणी चाले. कोणीही माणूस विनयानें व सेवेनेंच खुलतो.

**************************************************

## होमकुंडावर पाण्याची धार

स्वातंत्र्ययज्ञ सुरू झाल्यावर पुष्कळदा कळत न कळत पण तहाच्या वाटाघाटी रणशिंगाच्या ललकारीबरोबरच ऐकूं येतात. हिंदुस्थानांतील दोन महान् कायदे-पंडितांनीं कॉंग्रेसचा व सरकारचा समेट करून देण्याच्या सद्हेतूनें ह्याच वेळीं प्रयत्न चालविला. ही मंडळी एकदा मोतिलालजींना तुरुंगांत जाऊन भेटत व त्यांचें म्हणणें गांधीजींना येरवड्याच्या तुरुंगांत जाऊन कळवीत. पुन्हा दोघांच्या सरकारच्या परवानगीनें भेटी घडवून आणून त्यांना समेटाच्या अटी विचारीत. वर्किंग कमिटीच्या सभासदांना एकत्र भेटून विचारविनिमयाचीसुद्धा संधि देण्यांत आली होती. पण ह्यांतून निष्पन्न असें कांहींच झालें नाहीं. कारण सरकारला कांहींएक गोष्ट निश्चितपणें कबूल करावयाची नव्हती. गांधीजींचा भर शब्दापेक्षां पदरांत काय पडतें ह्यावर होता. म्हणून त्यांनीं स्वातंत्र्याचें सार अकरा मागण्यांत सांगितलें होतें. पंडितजी म्हणत ह्या अकरा मुद्द्यांत स्वातंत्र्याचें सार येत असलें तरी स्वातंत्र्याचें ध्येय राष्ट्रासमोरून हलवूं नका. मोतिलालजी म्हणत सन्माननीय असा समेट करण्याला सरकार हात पुढें करीत असेल तर आपण हात झिडकारूं नये. ह्या तिघांचे विचार अशा रीतीनें भिन्न असले तरी तिघेही एका मतानें वागणारे होते, पण सरकारच्या भूलथापांना न फसणारे होते. ह्या वाटाघाटींत प्रत्यक्षाच्या दृष्टीनें कांहीं हातीं लागलें नाहीं, तरी नैतिक असा एक फायदा झाला. सरकार आजपर्यंत जनतेच्या पुढाऱ्यांना कस्पटासमान लेखीत आलें होतें. टिळकांना गीतारहस्य लिहिण्याला दौत टाकही मिळूं शकलीं नाहींत. पण आज तेंच सरकार स्पेशल ट्रेन सोडून कैदेंतल्या पुढाऱ्यांच्या भेटी घडवून आणीत होतें व त्यांची वडदास्त राजाप्रमाणें ठेवीत होतें. ह्याचा अर्थ लोकमताचा प्रभाव सरकारवर पडूं लागला होता. जनतेवरील सरकारचा वचक ह्या वाटाघाटींनीं पार उडाला. सरकारचें सर्व सामर्थ्य व दरारा तुरुंगांत दिसून येतो, तेव्हां अशा ठिकाणीं पुढाऱ्यांची राजकारणी खलबतें मनमोकळेपणानें होतात व त्यांची मिजास राखली जाते हें पाहातांच लोक बाहेर ओरडूं लागले " थोडे दिन में गांधी राज."

## " पुनरपि जननं पुनरपि मरणं "

येरवड्याच्या वाटाघाटीनंतर लवकरच मोतिलालजींची प्रकृति बिघडली व सरकारला त्यांना सोडून देणें भाग पडलें. ह्याच वेळीं वर्तमानपत्रांतून " मोतिलाल

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

आजारी आहेत तरी सरकारनें सोडावें" अशी सूचना आली. त्यावरोबर त्यांनीं खवळून व्हाइसरॉय ह्यांना तार केली कीं, "मेहेरबानगी म्हणून मला सोडण्याचें कारण नाहीं." पण सरकारनें शेवटीं त्यांना सोडलेंच. लवकरच पंडितजी सुद्धा आपली सजा भोगून बाहेर आले. ते जाणून होते कीं सरकार आपल्याला फार दिवस स्वातंत्र्य उपभोगूं देणार नाहीं. म्हणून करबंदीच्या चळवळीला त्यांनीं तात्काळ हात घातला.

संयुक्त प्रांतांत शेतकऱ्यांचे हाल कुत्रं खात नव्हते. त्यांच्यांत संघटना होती. त्यांचा उत्साह वाढत होता. करबंदीची कल्पना त्यांनीं तेव्हांच उचलून धरली असती. हरताळ मिरवणुकी, वगैरे गोष्टींनीं आतां लोकांत उत्साह उत्पन्न होत नव्हता. ह्या त्यांच्या नित्यपरिचयाच्या गोष्टी झाल्या होत्या. करबंदीला सरकार व जमीनदार दोघेही विरोध करतील व शेतकरी वर्गाला झोडपून काढतील असेंही दिसत होतें. म्हणून करबंदी ही शेतकरी व जमीनदार ह्या दोघांपुरती व्यापक केली गेली. आपल्या सहकाऱ्यांबरोबर करबंदीची चर्चा करून पंडितजी मसुरीला वडिलांच्या भेटीला गेले. तेथें त्यांनीं तीनच दिवस पण मोठ्या सौख्यांत काढले. वडिलांना बरें वाटत होतें. हवा आल्हादकारक होती. घरांत प्रेमीजनांचा सहवास होता. कर्तव्याच्या आखाड्यांत उतरल्यावर जे जवाहरलाल वज्रापेक्षां कठीण होत, तेच घरांत आले म्हणजे एखाद्या लहान हरिणाच्या पाडसाप्रमाणें गरीब बनत. घरांतील मंडळींनीं खुशाल त्यांची थट्टा करावी. बहिणीनें म्हणावें, "अहो राष्ट्रपति, चला कीं चहा घ्यायला." तितक्यांत दुसरीनें म्हणावें, "अग ते त्यागमूर्ति आहेत ना, ते कसचा आतां चहा घेतात." इतक्यांत कमलादेवीनें नणंदेची साथ करून म्हणावें, "जनचित्तचकोरांना चहा कशाला लागतो आहे. जनताप्रेमावरच ते जगत आहेत." अशी थट्टा सुरू झाली म्हणजे स्वरूपाराणींना राग येई व त्या म्हणत, "उगीच कां गे त्याच्या पाठीस लागतां." ही थट्टा वडिलांसमोरही चाले. मग इंदिरेनें चहाचा कप घ्यावा व म्हणावें, "आमच्या राष्ट्रपतींना मी हा स्वदेशी चहा अर्पण करीत आहें. तो त्यांनीं गोड मानून घ्यावा." मग बापानें मुलीला म्हणावें, "इंदिराबाई, चहा गोड मानून घ्यावा म्हणजे चहांत साखर घातली नाहीं वाटतें!" अशा ह्या रम्य विनोदांत मोतिलालजी फक्त मंदस्मित करून सामील होत.

ह्याच औट घटकेच्या गृहसौख्याच्या काळांत त्यांच्या लहानग्या गोड भाचीनें राष्ट्रीय निशाणाची मिरवणूक काढण्याचा हट्ट धरावा. तिनें राष्ट्रीय निशाण घेऊन

बाहेर पडावें. तिच्या मागून दुसऱ्या चिमखड्या मुलीनें बाहेर पडावें. त्यांच्या मागून जवाहरलालजी अशी त्यांची मिरवणूक मसुरी येथील बंगल्याभोंवतीं मोठ्या गंभीरपणानें "झेंडा उंचा रहे हमारा" म्हणत निघे. किती सार्थ शब्द त्या मुली बोलत बरें! नेहरू घराण्यानें आपल्या कृतीनें :खरोखरीच आपला झेंडा उंच राखला आहे. लहान लहान मुलांत उंच व पोक्त जवाहरलाल हिंडतांना खेळतांना पाहिले कीं, सर्व वनास कंपित करणारा वनराज आपल्या छाव्यासमवेत खेळतो आहे असें वाटतें. ज्यांच्या नुसत्या हालचालीनें हिंदुस्थान सरकारच्या राजकीय खात्यांत गडबड उडावी, ते जवाहरलाल सौम्य मुद्रा धारण करून बाल-लीलांत सामील झालेले पाहाणें भाग्याचें लक्षण नव्हे काय? औट घटकेचें ते स्वर्गीय गृहसौख्य भोगून पंडितजी करबंदीच्या चळवळींकरितां मसुरीहून निघाले. ह्याचा अर्थ एकदोन दिवसांत ते पुनश्च तुरुंगांत जाणार व तेंही दीर्घकालाच्या. बरेच दिवस तुरुंगवास भोगून ते स्वजनांत काय तीनच दिवस राहिले. घरची माया अशा रीतीनें तोडून पुनश्च तुरुंगांत जाण्याची तयारी करणें ह्याला केवढी कठिण कर्मयोगी वृत्ति लागते. पंडितजी मसुरीहून निघाले तो, अतिरिक्त श्रमानें थकलेली त्यांची पतिव्रता पत्नीही सावित्रीप्रमाणें त्यांच्या-समवेत निघाली. पूर्वीच्या वनवासांत पतीच्याबरोबर पत्नीला राहावयास तरी मिळे, पण आमच्या आधुनिक सीतासावित्रींना पतिसमवेत फक्त तुरुंगाच्या दारापर्यंत जावयास मिळतें. तुरुंगांत दोघांना कधींच एकत्र ठेवीत नाहींत. कांहींशी आजारी असलेल्या कमलेला जवाहरलाल बरोबर न्यावयाला राजी नव्हते, पण तिचा हट्ट पाहून सत्यवानाप्रमाणें ते म्हणाले,

"येणारचि तरी साध्वी, श्वश्रूश्वशुरांसी पूस, मग ये, तूं."

कमलादेवी सासऱ्याची अनुज्ञा घ्यावयास गेली तों ते म्हणाले, "कांहीं हरकत नाहीं, ह्या वेळीं तूं त्याच्याबरोबर असावें हें बरें." म्हाताऱ्यानें अशा रीतीनें त्यांना जावयास अनुज्ञा दिली खरी, पण मग त्यांच्याच्यानें मागें मसुरीस राहावेंच ना. मोतीलालजींची प्रकृति बरी होण्याच्या पंथास लागली होती. विश्रांतीची अत्यंत आवश्यकता होती, उत्तम हवेचा मोह सुटत नव्हता. पण राम वनवासाला निघाल्यावर दशरथ जसा वेडापिसा होऊन त्याच्या मागें धावत गेला, त्याचप्रमाणें मुलाच्या मागोमाग मोतिलालजी निघाले. मोतिलालजी अलाहाबादेस आले, त्यावेळीं त्यांना घेण्याकरितां घरून पंडितजी व कमलादेवी निघालीं, पण गाडीला

***************************************

उशीर होता म्हणून तीं दोघें एका सभेला गेलीं इतक्यांत मोतिलालजी सुदीर्घ प्रवास आटोपून घरीं येऊन पुत्रभेटीची इच्छा धरून आरामखुर्चीवर बसले होते. पंडितजींची मोटार घाईघाईनें घरीं चालली होती. घराशीं मोटार पूर्णपणें थांबण्याच्या आंत तिचें दार उघडून पंडितजी गडबडीनें बाहेर पडणार तोंच त्यांच्या हातांत एका शिपायानें कागद दिला. " क्या है जी, " असें म्हणून तो कागद घेऊन ते बंगल्याच्या आवारांत शिरतात तोंच वॉरंट आहे म्हणून त्या राजदूतानें मृदु शब्दांत सांगितलें. त्याबरोबर त्याच पावलीं विजेच्या झटक्यानें ते मागें वळून पुनश्च मोटारींत बसले. पंडितजींच्या मनाची ह्या वेळची कल्पना करावी. भावनेचे कल्लोळ त्यांच्या डोक्यांत उठले होते, पण त्यांच्या मोटारीचे ब्रेक जितके चांगले होते त्यापेक्षां त्यांनीं आपल्या मनाच्या मोटारीला संयमाचे उंची ब्रेक लावले असल्याकारणानें त्यांची मोटार ब्रेक लावल्यावर थडथडली पण, ती सीमा ओलांडूं शकली नाहीं.

मोटारींत पुनश्च बसतांना पंडितजी कमलादेवींना म्हणाले, " कमला, मला तुरुंगांत गेलें पाहिजे, तूं दादाजींना सांभाळ. " दादाजींना 'सांभाळ,' हे शब्द उच्चारतांना त्यांना मोतिलालजींची प्रतिक्षणीं क्षीण होणारी मूर्ति दिसत होती. कमलादेवी आल्या, जवाहरलाल तुरुंगात गेले आणि मोतीलालजी —!

### प्रकरण अठरावें

## स्वातंत्र्ययज्ञाचें होमकुंड : २

## मनरची कार्यार्थी

*****************************

थकलेले भागलेले मोतिलालजी जवाहरलालजींना अटक झाली हे शब्द ऐकून ताडकन् उठून बसले व त्यांनीं ओठ आवळून समोरच्या टेबलावर जोरानें मुटका मारला व गर्जून बोलले, " नाहींच आतां आजारी पडणार ! "

मनाचा शरीरावर केवढा ताबा चालतो ह्याचें उदाहरण म्हणून देतां येईल कीं हा निश्चय केल्यावर ते कित्येक दिवस आजारी पडले नाहींत. त्यांच्या

थुंकींतून पडावयाचें रक्त सुद्धा आतां थांबलें होतें. मोतीलालजींनीं आपल्या शक्तीचें जें ह्यापुढें केंद्रीकरण केलें त्यामुळें देशांत विलक्षण तेज निर्माण झालें व तहाच्या वाटाघाटींमुळें थंडावलेलें राजकारण पुनश्च रंगूं लागलें. जवाहरलालजींचा वाढदिवस जवळ आला होता. मुलगा तुरुंगांत, तेव्हां त्याचा वाढदिवस वीरोचित असा साजरा करावयाला हवा, असें ठरवून सर्व देशभर त्या दिवशीं मिरवणुकी निघाल्या, बेकायदा ठरलेलीं भाषणें वाचलीं गेलीं तेव्हां लाठीमार झाले. शेवटीं पांच हजार लोकांस हिंदुस्थानांत अटक झाली. अशा रीतीनें फटाक्याऐवजीं लाठीचे तडाके, मंगलगीताऐवजीं स्वातंत्र्याचे जयघोष, निश्चयी भाषणें हे प्रकार झाले. त्या दिवशींच्या वाढदिवसाचा हा प्रकार पंडितजींना बालपणच्या वाढदिवसापेक्षां अधिक रुचला असेल.

मोतिलालजींनीं चळवळींत रंग आणला खरा, पण शेवटीं त्यांची थुंकीही रक्तरंजित होऊं लागली. हातपायांना सूज आली. इकडे कमलादेवींनीं चळवळ इतकी तीव्र चालविली कीं सरतेशेवटीं त्यांनाही अटक होऊन शिक्षा झाली. तेव्हां त्या पतिपरायण वीरस्त्रीनें जे उद्गार काढले ते लक्षांत ठेवण्याजोगे आहेत. "पतीच्या पावलावर पाऊल टाकून जाण्याची संधि मला मिळाली ह्यामुळें मला निरतिशय आनंद होत आहे."

मुलामागून सूनही तुरुंगांत गेली तेव्हां तर त्या धीरसिंहानें आंथरुणच धरलें.

इकडे सरकारनें मंडलाकार परिषद भरवली. केवढा तो थाट. पुष्कळ प्रसिद्ध हिंदी पुढाऱ्यांस बोलावलें होतें. तेथें राजकारणी वाटाघाटी झाल्या, पण त्यांतून कांहींच निष्पन्न होईना. जोंपर्यंत गांधी व कॅांग्रेस चर्चेंत भाग घेत नाहींत, तोंपर्यंत इतरांशीं केलेल्या वाटाघाटी "लाभाच्या नाहींत" हें मुख्य प्रधानांनीं ओळखून भरतवाक्य म्हटलें व कॅांग्रेसनें वक्र मार्ग सोडून राउंड टेबलमध्यें यावें अशी इच्छा प्रदर्शित केली. प्रधानांच्या इच्छेचा विचार करण्याकरितां सरकारनें वर्किंग कमिटीच्या सर्व सभासदांना सोडलें. ते सर्व तात्काल मोतिलालजींच्या रुग्णशय्येसभोंवतीं जमा झाले. कोणी म्हणाले, "मुख्य प्रधानाच्या सूचनेचा अनुकूल विचार व्हावा." हे शब्द मोतिलालजींच्या कानांत तापलेल्या तेलाप्रमाणें पडले. ते तात्काल खवळून उठले व म्हणाले, "ध्येय साध्य होईपर्यंत लढा थांबविणें शक्य नाहीं." इंग्लंडमधील सुप्रसिद्ध युद्धमंत्री चॅथम रुग्णावस्थेंत तीव्र भाषण करतां करतां पूर्वीपेक्षां जास्त अशक्त होऊन पडला तशी आज मोतिलालजींची स्थिति झाली.

**************************************

२६ जानेवारीला स्वातंत्र्यदिन साजरा झाला आणि त्याच्यानंतर वर्किंग कमिटीच्या इतर सभासदांबरोवर पंडितजी घरीं आले. पितापुत्र भेटले, पण कोणत्या परिस्थितींत!!

## छत्र गेलें

**स्वांतत्र्याचा समर काल तो परमेशाचा काल गण।**
**अशा पूत परमेश्वर कालीं करुण मरणा करकरुणा॥**

तुरुंगांतून सुटल्याचें पंडितजींना एवढेंच समाधान मिळालें कीं, वडिलांच्या शेवटच्या दुखण्यांत त्यांची सेवा करायला मिळाली. मोतिलालजी मरणाच्या वेळीं सुद्धा भाग्यवानच ठरले. वर्किंग कमिटीचे सर्व सभासद, त्यांचे प्रिय मित्र गांधीजी, लाडका मुलगा, जांवई, मुली, नातवंडें, सून हीं सर्व त्यांच्या मरणकाळीं त्यांच्या समीप होतीं. जुने नवे सर्व मित्र त्यांना भेटून गेले. त्या वेळीं एखाद्या घायाळ व मरणोन्मुख झालेल्या सिंहाप्रमाणें मोतिलाल पडून राहात. तथापि त्या वनराजाचें ऐश्वर्य व ऐट नष्ट झालेली नव्हती. शेवटीं ता. ६ फेब्रुवारीला ते वारले. "स्वराज्याचा लढा तुम्हीं जिंकला आहे," हे त्यांचे शेवटचे शब्द. त्यांच्या शवाभोंवतीं भलें मोठें राष्ट्रीय निशाण लपेटून तें लखनौहून अलाहाबादेस आनंदभवनांत आणलें. त्यांच्या प्रेतयात्रेस लाखों लोक उपस्थित होते. शिशिरकालीन संध्येची सावली गंगातीरावर पसरत असतां ह्या राष्ट्रपुरुषाच्या चितेच्या ज्वाला भडकल्या व जवाहरलाल पोरके झाले!

पंडितजी कॉंग्रेसची धुरा जरी वाहात होते, तरी स्वतःवर कांहीं मोठी जबाबदारी येऊन पडली आहे असें त्यांस कधींच वाटलें नाहीं. वडील आहेत, बापूजी (गांधीजी) आहेत, आपल्याला काय, स्वातंत्र्ययुद्धाचा खेळ निःशंक खेळावा अशी त्यांची वृत्ति होती. सामान्यतः मुलाच्या चाळिसाव्या वर्षी वडिलांचा मृत्यु हा त्याला विरहदुःखांत ढकलील, पण निराधार झालों असें वाटूं देत नाहीं. पण प्रत्यक्ष गांधीजींना जेथें "आज आपण विधवा झालों असें वाटलें" तेथें पंडितजींना मोतिलालजींच्या मृत्यूनें पोरके झालों असें वाटल्यास नवल नाहीं!

## सरकारशीं समेट

वडील वारले, पण त्याबद्दल शोक करावयाला पंडिजींना फुरसत कोठें होती? एकामागून एक राजकीय घटना इतक्या घडून येत होत्या कीं, मनुष्याला काल

***************************************************

आपण होतों कुठें व आज आहों कुठें असें होऊन जात असे. वर्किंग कमिटीचे सभासद सुटल्यावर गांधीजींच्या व व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विन ह्यांच्या पुष्कळ वाटाघाटी झाल्या. पुष्कळ कंटाळवाणी चर्चा झाली. शेवटीं गांधी-आयर्विन करार म्हणून दोघांच्या सहीचें एक पत्रक बाहेर पडलें. त्यांत गरिबांना स्वतः खाण्यापुरतें मीठ कर न देतां जमा करावयाची परवानगी देण्यांत आली. सरकारनें कैदी सोडावे व कॉंग्रेसनें चळवळ मागें घ्यावी. दुसऱ्या राउंड टेबल परिषदेंत कॉंग्रेसनें भाग घ्यावा व पुढें होणारे व्यापारी करार हिंदुस्थानच्या हिताच्या दृष्टीनें व्हावेत असें ठरलें. ह्या करारांत पूर्ण स्वातंत्र्याचा उल्लेख कोठेंच नसल्यामुळें जवाहरलाल खूप रागावले, पण गांधींनीं ज्याला संमति दिली तो मान्य करून आपल्या पुढाऱ्याचा मान राखणें आपलें काम आहे, असें पंडितजींनीं ठरविलें. ह्या करारापासून प्रत्यक्ष फायदा असा थोडा झाला असला तरी ह्या वेळीं नैतिक लढा कॉंग्रेसनें जिंकला ह्यांत संशय नाहीं. लॉर्ड कर्झनच्या काळीं कॉंग्रेसचे अध्यक्ष वेडरबर्न ह्यांनीं व्हाइसरॉय ह्यांची मुलाखत मागितली त्या वेळीं त्या उन्मत्त राजप्रतिनिधीनें उत्तर पाठविलें कीं, " कॉंग्रेसचे अध्यक्ष म्हणून तुमची मी भेट घेऊं शकत नाहीं. अशा रीतीनें त्या वेळीं कॉंग्रेसचा अपमान झाला होता. पण आज दोन स्वतंत्र राष्ट्राचे प्रतिनिधी ज्याप्रमाणेंत तहनाम्यावर सह्या करतात तशा सह्या गांधी व आयर्विन ह्यांच्या झाल्या होत्या. ह्यामुळें हिंदी राष्ट्राचा स्वतंत्र दर्जा सरकारनें मान्य केल्यासारखें आज झालें.

सत्याग्रही कैदी जे हजारांनीं सुटले ते आपल्या गांवीं एखाद्या विजयी सेनेप्रमाणें जयघोष करीत प्रवेश करीत. ह्यामुळें सामान्य लोकांना " सरकारची जिरली " असेंच वाटलें. सामान्य लोकांना ठरावाची भाषा कळत नाहीं. त्यांना असले जयघोष व देखावेच कळतात.

ह्याच वेळीं क्रांतीकारक वीर भगतसिंग ह्यांच्या खटल्याला महत्त्व चढून देशांत पुनश्च अस्वस्थता माजली होती. सरकारी अधिकारी गांधी-आयर्विन करारामुळें मनांत जळफळत होते. गांधींना कॉंग्रेसनें दुसऱ्या राउंड टेबलकरितां प्रतिनिधी म्हणून पाठवावयाचें ठरविलें. अशा ह्या काळांत जवाहरलाल थोडे विमनस्क झाले होते. त्यांना विश्रांतिही पाहिजे होती, म्हणून त्यांनीं लंकेचा रस्ता गांठला.

अशा रीतीनें कायदेभंगाच्या महायुद्धाचा पूर्वार्ध समाप्त झाला व पंडितजींची अध्यक्षपदाची मुदतही ह्याच वेळीं संपली.

## प्रकरण एकोणिसावें

# लंकेची सफर

******************************

तुरुंगांतून सुटल्यावर एकामागून एक असे प्रसंग येत गेले त्यामुळें पंडितजींचें मन मागें सांगितल्याप्रमाणें उद्विग्न झालें होतें. अशा वेळीं पंडितजी बहुतेक एकांत स्थळीं जाऊन निसर्गाच्या शोभेचें अनुपम सौख्य भोगून आपल्या मनास ताजेतवाने करीत असतात. ह्या वेळीं नेहमींप्रमाणें हिमालयांत न जातां ते सीलोनला आपल्या पत्नीला व कन्येला घेऊन गेले. तेथें त्यांस निसर्गशोभेचें व एकांताचें सौख्य मनमुराद उपभोगावयास कांहीं काळ मिळालें. पण लवकरच त्यांची प्रसिद्धि होऊन पुष्कळ लोक त्यांस भेटावयास व दर्शन घ्यावयास येऊं लागले. बहुजनसमाजाची भाषा त्यांस कळत नसे, ह्यामुळें नुसतें नमस्कारावरच भागवावें लागे. भाविक लोक आपल्या घरची भाजी, दूध व लोणी अशासारख्या व खाद्यपेयांच्या कितीतरी वस्तु गरजेपेक्षां अधिक आणून देत. जनतानारी विचित्र तर खरीच. आपल्या पुढाऱ्याला पुष्कळ वेळां उपवास घालील आणि मग पक्वान्नांच्या इतक्या राशी त्याच्यापुढें ओतील कीं, त्याचा जीव त्या देणग्यांनीं गुदमरून जावा. पंडितजींच्या घरीं भाज्यांच्या राशी, दुधाच्या चरव्या व लोण्याचे गोळे इतके जमूं लागले कीं, त्यांचें करावें काय हेंच त्यांस समजेनासें झालें. शेवटीं ह्या वस्तूंचें सत्पात्रीं दान करावयाचें त्यांनीं ठरवून ह्या सर्व देणग्या त्यांनीं हॉस्पिटलमध्यें पाठवून देण्याचा उपक्रम आरंभिला.

## कराची कॉंग्रेस

गांधी-आयर्विन तहानंतर लगेच थोड्याच आठवड्यांत कराचीस कॉंग्रेस भरण्याचें ठरलें. पण ह्याच्या अगोदर मोठमोठे क्रांतिकारक पंडितजींना गुप्तपणें भेटून गेले. एक दिवस चंद्रशेखर आझाद ह्या नांवाचा अत्यंत तेजस्वी व बुद्धिवान् तरुण पंडितजींकडे आला व म्हणाला, “दहशतवादापासून हिंदुस्थानचें कांहीं हित व्हावयाचें नाहीं अशी खात्री दहशतवाद्यांची झाली आहे, पण सरकार त्यांस निर्धास्तपणें प्रगट होऊन आपले उद्योगधंदे करण्यास सवड देईल तर हे लोक